भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ९१

# ऐतिहासिक संकीर्ण साहित्य
## ११ वा खंड

संपादक

श्री. यशवंत नरसिंह केळकर

# Miscellaneous Sources of Indian History
## Vol. XI

*By*
Shri. Y. N. Kelkar

MR
954.792
B 469.XI A

किंमत ५ रु.
Price Rs. 5

[ A. D.
1958-59

MR
954.792
B469.XI A

CATALOGUED

# निवेदन

आपल्या मंडळाच्या त्रैमासिकाचें हें एकुणचाळिसावें वर्ष असून त्याच्या एक ते चार अंकांचा हा जोडअंक आहे. यालाच ऐतिहासिक संकीर्ण साहित्य ११ वा खंड हें नांव दिलें आहे. यांत मराठी इतिहासाचे एक आस्थेवाईक अभ्यासक श्री. यशवंत नरसिंह केळकर यांनीं जमविलेले कागदपत्र त्यांच्या संपादकत्वानें प्रकाशित केले आहेत. प्रस्तावना व पत्रांचा कालानुक्रम यांनीं त्यांची उपयुक्तता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यासकांना हा खं[illegible]च्या खंडाप्रमाणेंच उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

जुन्या ऐतिहासिक सामग्रीच्या प्राप्तीसंबंधानें येथें दोन शब्द अवश्य लिहावेसे वाटतात. इ. १९४७ मध्यें आपणांस स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या सरकारनें विविध इनामें नाहींशीं करणारे कायदे केले. असे कायदे करणें योग्य कीं अयोग्य आणि कायद्यांचे गुणावगुण इत्यादि मुद्यांची चर्चा करण्याचें हें स्थळच नव्हे, पण झालें तें झालें, हें लक्षांत घेऊन सर्व लोकांस प्रार्थना ही कीं, त्यांजपाशीं असलेलीं कागदपत्रादि साधनें त्यांनीं मंडळाच्या स्वाधीन करावीं. मंडळ तीं जपून ठेवील. म्हणजे त्यांचा त्यांना तर उपयोग करतां येईलच, पण इतरांनाहि तीं उपयोगासाठीं उपलब्ध होतील. तरी सर्वांनीं या प्रार्थनेकडे अवश्य लक्ष द्यावें.

श. १८८१ मार्गशीर्ष शुद्ध १
इ. १९५९ डिसेंबर १

चिटणीस

---

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ ओटव–प्रभुदेसाई ... | १ |
| २ कान्हूर–नगरकर ... | ११ |
| ३ चास–जोशी ... | ३० |
| ४ पुणें–जोगळेकर ... | ४४ |
| ५ सातारा–फडणीस ... | ५० |
| ६ पत्रांचा कालानुक्रम ... | ८१ |
| ७ सूची ... | ८४ |


Library IIAS, Shimla
MR 954.792 B 469 IV A-B 469 VI
00009001

आर्यभूषण प्रेस, पुणें ४]

... OF ADVANCED STUDY
Acc. No. 9001

# प्रस्तावना

ऐतिहासिक संकीर्ण साहित्याच्या या अकराव्या खंडांत माझ्या संग्रहांतील कांहीं ऐतिहासिक पत्रें छापलीं आहेत. हीं पत्रें मला १ देवगड्जवळील ओटव ( रत्नागिरी )चे प्रभुदेसाई, २ कान्हूर पठार (अहमदनगर) येथील नगरकर, ३ चास (पुणें) चे चासकर जोशी, ४ पुणें येथील नेने घाटावरील श्रीयुत जोगळेकर व ५ सातारा येथील फडणीस यांच्या दप्तरांतून मिळालीं आहेत. इतर साधनग्रंथांप्रमाणें यांतील पत्रेंही विस्कळीत, तुटक प्रसंगांची किंवा घडामोडींची माहिती देणारीं, अशीं आहेत. तथापि त्या प्रत्येकांत इतिहासोपयोगी माहितीचे सुवर्णकण सांपडत असल्यामुळें साधन म्हणून त्या प्रत्येक पत्राला कांहीं महत्त्व आहेच आहे. सातारकर फडणीस दप्तरांतील पत्रें मात्र एकाच विषयासंबंधीं असून त्यांतील माहिती आजपर्यंत बहुधा सर्व अप्रसिद्ध अशीच आहे. सातारकर छत्रपतींनीं पेशव्यांच्या कैदेंतुन मुक्त होण्याकरतां उठाव केला, पुढें पेशव्यांनीं रास्ते–पटवर्धनांकडून तो जबरदस्तीनें मोडला; त्यानंतर चतुरसिंग भोसल्याला बाहेर पाठवून त्याच्या करवीं आपलें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं छत्रपतींनीं खटपट केली व पुनः उठाव केला, त्याची हकीगत या पत्रांत सांपडेल. बापू कान्हो फडणीस हे छत्रपतींनें मुत्सद्दी म्हणून चतुरसिंगाबरोबर दिले होते. यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी करून दुसऱ्या बाजीरावाचा व दौलतराव शिंद्याचा पराभव केला, त्या वेळीं सातारकर छत्रपतींना मुलूख तोडून देऊन स्वतंत्र करण्याचा मनसुबा होळकरांच्या छावणींत बापू कान्हो फडणीस कसे शिजवीत होते त्यासंबंधीं विश्वसनीय अशी हकीगत येथेंच प्रथम वाचावयास मिळेल. दुर्दैवानें तें कांहींच साधलें नाहीं व चतुरसिंग आणि बापू कान्हो फडणीस यांना देशोधडी होऊन उत्तर हिंदुस्थानाकडे पळावें लागलें. त्यांतही अखेर त्रिंबकजी डेंगळ्यानें मालेगांव मुक्कामीं दग्यानें चतुरसिंग, बापू कान्हो आणि त्याचे सर्व लोक पकडून कैद केले. चतुरसिंगाला कांगोरी किल्ल्याची हवा पहावी लागली तर बापू कान्होला जिवधन किल्ल्यावर कैद करून ठेवण्यांत आलें. बिचाऱ्या चतुरसिंगाची सुटका इंग्रजांनीं खडकीच्या लढाईनंतर थोडेच दिवसांनीं केली. परंतु किल्ल्यावरून चतुरसिंगाचें प्रेतच खालीं आलें! तो आजारी होऊन त्याच सुमारास मृत्यु पावला होता. बापू कान्हो मात्र सुदैवी. त्याची सुटका इंग्रजांनीं करून पुनः पूर्वीप्रमाणें त्याला, साताऱ्यास स्थापलेल्या प्रतापसिंह छत्रपतीच्या दरबारीं जुन्या दरकावर कामास पाठविलें.

या बापू कान्होनें पुढें आपलें तपशीलवार आत्मचरित्र, बाक्याच्या रूपानें ग्रँट डफला लिहून दिलें तें प्रसिद्ध आहे. पण त्यांतहि नसलेली चतुरसिंगाच्या खटपटीची किती तरी नवी माहिती पुढें दिलेल्या बापू कान्होच्या पत्रव्यवहारांत आढळेल.

हीं पत्रें मला बापू कान्होचे वंशज कै. अनंत वासुदेव उपाख्य अंतूकाका फडणीस यांनीं त्यांच्या मृत्यूच्या आधीं अवघी दहापंधरा दिवस मोठ्या प्रेमानें मला दिलीं.

असो. पुढील साधनें छापतांना मंडळाच्या पद्धतीनुसार करावयाचे सर्व तांत्रिक संस्कार, पत्रांचा कालानुक्रम व सूची हीं कामें मंडळानें माझेकरतां उरकलीं यासाठीं मी त्याचा मनःपूर्वक आभारी आहे.

ता. १।१२।५९ य. न. केळकर

---

# अनुक्रमणिका


| विषय | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ ओटव–प्रभुदेसाई | ... | ... | ... | १ |
| २ कान्हूर–नगरकर | ... | ... | ... | ११ |
| ३ चास–जोशी | ... | ... | ... | ३० |
| ४ पुणें–जोगळेकर | ... | ... | ... | ४४ |
| ५ सातारा–फडणीस | ... | ... | ... | ५० |
| ६ पत्रांचा–कालानुक्रम | ... | ... | ... | ८१ |
| ७ सूची | ... | ... | | ८४ |

भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक
३९ वें वर्ष

# ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

## ११ वा खंड

### १ ओटव–प्रभुदसोई

| | | |
|---|---|---|
| ले. १. रा. श. ११ क्रोधन वैशाख वद्य २ रवि सु. १०८५ जखर १५ | १ श्री | श. १६०७ वैशाख वद्य २ इ. १६८५ मे १० |

[ डाव्या अंगास बहुदली मुद्रेत* ] श्री । शंभुभज । नोल्कंठ मोरे । श्वरसुत नी । ठकंठ

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ११ क्रोधन संवत्सरे वैशाख बहुल द्वितीया रविवासरे राजश्री देवाजी विठल देशाधिकारी व लेखक प्रांत राजापूर यासी राजाज्ञा येसी जे रागदे प्रभु व चांद प्रभु देसाई ता। सालसी यासी गोविंद प्रभु याचा वारिसदार याच्या तक्षिमा पहिल्याच जाहाल्या आहेत येसियासी गोविंद प्रभु कथला करून जाजती हक तक्षीम मागतो म्हणून हुजूर कळो आले त्यावरून तुम्हास आज्ञापत्र सादर आसे याच्या तक्षिमा पहिल्या जाहाल्या असता जो कथला करील त्याला ताकीद करून हालखुद ठेवणे ज्याजती करू न देणे सालाबाद भोगवटा चालत आला असेल तेणेप्रमाणे चालवणे नवा जिकीर करू न देणे छ १५ जमादिलाखर सु।। खमस समानिन अलफ [ नि* ] निदेश समक्ष [ चौ* ] मर्या । देयं वि । राजते

सुरू सूद

---

| | | |
|---|---|---|
| ले. २. सु. १०८६ साबान २ | २ श्री | श. १६०७ आषाढ शुद्ध ४ इ. १६८५ जून २५ |

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये राजेश्री गंगाजी बाबाजी देशाधिकारी व देसलेखक प्रांत राजापूर गोसांवी यासी

स्नेहपूर्वक कवि कळश छांदोगामात्य आसीर्वाद सु।। सन सीत समानीन अलफ रागदे प्रभु व चंद प्रभु देसमूख तपे सालसी याच वारिष गोविंद प्रभु म्हणून आहे त्यांचे याचे वृत्तीचे निवाडे पूर्वीपासून होऊन चालिले आहे त्यास हाली गोविंद प्रभु मजकूर

ज्याजती हकाचे विषी कथला करितो म्हणून हुजूर विदित जाहाले तरी सालाबाद भोगवटा चालिला असेल तेणेप्रमाणें हर दू जणास ताकीद करून चालवणें गैरमाकूल कथला करील त्यास ताकीद करणे ज्याजती नौ जिकीर होऊ न देणे रवाना [ नि* ] छ २ साबान पा। हुजूर [ वा* ] राजते । लेखनावधि

सुरू सूद

---

ले. ३. सु. ११०६ जिल्हेज २५

३

श्री

श. १६२८ चैत्र वद्य १२
इ. १७०६ मार्च ३०.

सिका तालीक

दं मो। अनाम मादो परभू यासीं परशराम त्रिंबक प्रतिनिधि आसीर्वाद सु॥ सीत मया व अलफ रुष्णो परभू याणीं हुजूर येऊन विदित केले की आपण जमावानिसी परलीच्या वेड्यांत गनिमासी जुजभाडण शर्तीनिसी केले याबद्दल स्वाम रुपाळू होऊन मौजे बादिवडे ता। सालसी या गावी दोनशे लारीची इनामत करून दिल्ही ते आपले बंधु मादो परभ वडील म्हणोन याचे नावे सनद घेतली ते सनद मादो परभ आपणापासी घेऊन इनामतीचा ऐवज बलकाऊन आपणास काही देत नाही म्हणोन याणी सांगितले ऐसियासी रुष्णे परभ याणे परलीच्या वेड्यांत करस्त करून इनामतीचे सनद तु वडील भाऊ म्हणोन सनद तुझ्या नावे करून घेतली असता यासी काही लागो देत नाही सारी इनामतीचा ऐवज तुच खाऊन थोतांडी करतोस यावरोन तुज काये म्हणावे याउपरी अशी वर्तणूक करावयासी गरज काये तकसीमेप्रमाणे ऐवज निमे तु खाणे निमे यासी देत जाणे फिरोन बोभाट हुजूर येऊ न देणे जाणिजे छ २५ जिल्हेज परवानगी हुजूर [ मोर्तब आहे ]

---

ले. ४. रा. श. ३४ सर्वधारी वैशाख वद्य ११ सौम्य

४

श्री

श. १६३० वैशाख वद्य ११
इ. १७०८ मे ५

[ डाव्या अंगास वाटोळ्या मुद्रेंत* ] श्री । शिवनृपति ह । र्पनिधान मोरेश्वर । सुत भैरव मुख्य । प्रधान

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारी संवत्सरे वैशाख बहुल येकादसी सौम्य वासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती याणी पारपत्यगार व लेखक ता। सालसी यासी आज्ञा केली ऐसी जे गणेश प्रभु दिमतदार यांचे जमावास मौजे वोंदु ता। मा। खासगीकडील दूर करुन हाली याकड करार करून दिल्हे असे मौजे मजकूरचा आकार होईल तो मशारनिलेकडे पाववणे दुसरियाकडे उसूल येकंदर न देणे [ नि* ] निदेश समक्ष [ वा* ] मर्या । देयं रा । जते

[ पाठीवर* ] बार सुरू सूद बार

---

५
श्री

ले. ५. रा. श. ३७ विरुति भाद्रपद वद्य ९ सौम्य

श. १६३२ भाद्रपद वद्य ९
इ. १७१० सप्टेंबर ६

देशकानी व कर्णिक व देशकुलकर्णी व नाडगौडा ता। सालसी यांचें पत्र मिरासी गांवकरानी देहाय यासी भोगवटे पूर्ववतप्रो पत्र

१

किता गांवगना ताकीदपत्रे

१ बाग दर सवद आडवली व वतुसाडवे व जिरायत घर व दुकाने मौजे श्रावण व मार्ग बेले बुा छ मजकूर

१ मौजे मालडी पो इनाम जमीन कुडो ८१५

१ मौजे गोटणे कुडो ८१५

१ मौजे पलसंचा कुडव ८१५

१ मौजे श्रावण कुडोव ८१०

राजश्री रामचंद्र नीलकंठ अमात्य याचे कारकिर्दीमध्ये पत्रे सन आर्बा तिसैन की माणकोजी व हिरोजी व बापूजी व प्रतापजी साम नाइकवाडी ता। सालसी यांणी हुजूर येऊन विनंति केली याजवरून पत्रे वर्षे ६५

रामाजी अनंत सभासद नामजाद व कारकून वर्तमान भावी सुभा प्रांत राजापूर यासी अमात्यपंताचे पत्र सन आर्बा तिसैन आा छ १७ रासर हकभोगवटा अली इदल शाहा पाहातशाहाप्रो चालवणे म्हणोन सनद १

माहालची ताकीदपत्रे गांवगना छ ७ जासर छ मार

१ मौजे श्रावण इनाम जमीन कुडो ८१० व गाद्दी तंबाखू सालाबाद चालत आल्याप्रमाणे चालवणे

१ मौजे कोईल इनाम जमीन कुडो ८१५

१ मौजे मालडी इनाम जमीन कुडो ८१५

१ मौजे गोठणे जमीन कुडव ८१५

१ मौजे बांदिवडे खुर्द जमीन कुडव ८१५

१ मौजे बांदिवडे बुा रोवक ।·

१ मौजे त्रिंबक जमीन कुडो ८१५

१ मौजे पलंसबा जमीन कुडव ८१५

८

लक्षुमण रंगनाथ [ फाटलें आहे* ] ता। सालसी यासी रामाजी [फाटलें आहे*] सुभेदार सुभे मार याचे पत्र हकभोगवटा पूर्ववतप्रो छ ४ जासर छ मार

हुजूरचे नेमणूक प्रो गांवगना जमीनी आहेत त्याचे नेमणूकेची पत्रे ठिकाणावर

१ मौजे श्रावण

१ मौजे त्रिंबक

१ मौजे बांदिवडे बुा

१ मौजे कोईल

४

४ खासगी गाव

१ मौजे बांदिवडे खुर्द

१ मौजे पलसंचा

१ मौजे मालडी

१ मौजे गोठणे

४

८

१ ताकीदपत्र ठाणे पाा मार्गसांडवे व
बेले व बाग नारगील दर सवद आड-
वली छ जाासर सन आर्बा तिसैन

---

२

श्रीदेव मौजे आडवली हीविसी पत्र राजश्री लक्षुमण रंगनाथ नामजाद व कारकून तपे सालसी यासीं पत्र परशराम त्रिंबक प्रतिनिधि सन आर्बा मयां व अलफ छ वर्षे ५६ हिराजी नाईक व बापूजी नाईक व प्रतापजी नाईक साटम याणी विनंति केली त्याजवरून देवस्थान ज्यागृत देखोन मौजे मार पाा दाभोली लाहारी ३०० तीनसे साल दर साल धर्मादाय करून पेशजीचा धर्मादाय दूर करून हाली तीनसे लाहारी गांव पाा चालवणे म्हणोन सनद कलम १

किता राजश्री परशराम त्रिंबक प्रतिनिधि यासी गणेश माहादेव हवलदार ताा सालसी यासी ताकीदपत्र ऐसाजे हिरोजी साटम व बापूजी साटम व प्रतापजी साटम नाईकवाडी ताा सालसी येथील पटी पासोडी पुरातन चालत आल्याप्राा चालत नाही व वाडी सांडवे इदलशाहीचे कारकिर्दीपासून चालत आहे ती चालवावयाविसी हुजूर विनंति केली त्याजवरून हे या राज्यासी बहूत येकनिष्ट याची वतनबाब चालवावी लागत्ये याकरितां पटीपासोडी राजश्री तान सावंत भोसले नाइकवाडी ताा मार यासी हाली चालते त्याप्रमाणें यासी चालवायाचे करार केले आहे व वाडी साडवे इदलशाहा कारकिर्दीप्रमाणे करार केले असे पुत्रपौत्रादि वशपरंपरेने चालवणे म्हणोन ताकीद त्याप्रमाणे माहालची ताा मार ताकीदपत्रे २

सदरहू पत्रे सन इसने मियां व अलफ वर्षे ५८ छ २४ रमजान हुजूर माहाल छ २७ सवाल

सदरहू पटीपासोडी [ फाटलें आहे ]
ताकीदपत्रें कारकिर्द सरखेल
१ छ ४ रोवल मुाा विजयदुर्ग प्रतापजी
नाइक कालेगुडे सन तिसा अवल
१ सन सबा सलासीन कारकिर्द छ २३
मोहरम राजश्री संभाजी आंगरे
१ सन खमस सलासीन कारकिर्द
संभाजी आंगर छ २३ जाासर

सदरहू आज्ञेप्रमाणे माहालातुन पटी करून दिल्ही आहे ते दाखलेयासी विल्हेस लाविली असे

---

३

कारकिर्द महाराज छत्रपति महाराज राजे सिव

सके २८ वृश नाम संवछरे अस्विन बहुल सप्तमी भानुवासरे इनाम पत्रे

राज्यपत्राप्रमाणें गणेश महादेव हवलदार व कारकून ताा सालसी यासी

राजश्री सूर्याजी बिन हिरोजी साटम व संताजी बिन बापूजी साटम यासी दिल्हे इनाम पत्रे ऐसीजे तुम्ही पुरातन राज्यातील सेवक तुमचे वडिलापासून स्वामीस संतोसी करून रुपा संपादून घेतली आहे.

तावजी नाईक जगताप या .... सन इसने मयां व अलफ व हदू गांवास ताकीदपत्र मजकूर बरहुकुम राजपत्र पत्रे छ ५ जिल्हेज

[ पुढें फाटलें आहे. पत्राचे पाठीवरील वरचा मजकूर फाटला आहे पुढें खालील मजकूर आहे* ]

यशवंतराव साटम व सूर्याजी व रुष्णाजी साटम हे हुजूर पाटगावचे मुकामी येऊन विदित केले की आपणास पूर्वीपासून इनाम गांव व जकाती विस्वा चालत आहे

| इनाम गांव | जकात घाट फोंडा व आडमार्ग विस्वा |
| --- | --- |
| | १ |
| १ मौजे आइनल येशवतराव व सूर्याजी साटम | |
| १ मौजे चूस रुष्णाजी साटम | |
| २ | |

ल बाब दिल्हा असे शके ३७ विरुति संवत्सरे भाद्रपद बहुल नवमी सौम्यवासरे पुतलाजी सावंत याचे भाऊ बाब सावंत व हीर सावंत दोघे भाऊ नानाचे चौकीवर स्वामी कार्यावरी चीत जाहालें म्हणोन याचे चालवणें स्वामीस अगत्य म्हणोन याजवरी स्वामी रुपाळू होऊन यासी इनाम मौजे फोडे ता। सालसी येथे इनाम जमीन लाहारी दाभोली १५० दंडिसेयाची देविले असे तरी हाली धा। रपाज मडपूमे (?) नेमून देणे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे म्हणोन पत्र सन इहिदे अशर येकूण वर्षे ४९

१

पत्रे ४

जमावाचे बेगमीस मुकासे गांव वगैरे ठिकाणे शके ३४ सर्वधारी संवछरे

कितापत्र दि॥ हिराजी नाईक साटम व प्रतापजी नाईक साटम व संताजी नाईक साटम यांजकडेस जमावाचे बेगमीस ता। मारचे गांव व वाडिया व बाग पेशजी पासून चालत आहे त्याजप्रमाणे हाली करार केले असत व नकत यैवज गावगना नेमणूक पेशजीप्रो गांव मोकासे नकत नेमणूक लाहारी

१ आडवली ९७२॥ का आचर्रे
१ वांदिवडे खुर्द ६०० इतलाख
१ पलसंबा ३७२॥ कदमी
१ श्रावण ९७२॥
१ गोटणे २०० कुणकेश्वर पो
१ कोईल ३२५ पाणेरी कामते
१ अुव कोईल १५०० जकात घाट
१ मालड फोंडा तर्क्षीम
१ सिरगांव पाचर्वा
१ वरेरी ६७॥ कुलयाच व
१ हडपीड १.ऊडवाडी पा।
१ पाहरे ३०६५
१ भरणी मिठागर मिटयाव
१३ पो ठिकाण चिखली
१

२ वाड्या
१ तारसेले
१ चांदोसी
२

२ बागा
१ बाग तळवडे
१ बाग कुडादी
२

१७

येणे प्रो मुकासे गाव तेरा व दोन बाग व दोन वडिया येक ठिकाण मिठागर येथील येवज नेमणूक मुकासयाचेकडे करार कलम किता पत्र ता। मार पो

१

खासगीकडे गांव ठेविले होते ते हाली दूर करून साटमाकडे करार करून दिल्हे आहेत

येणेप्रो च्यार गांव मुकासा करार

कितापत्र जमाव यशवंतराव साटम याजकडे पेशजी मुकासे गांव आहेत

मौजे माईण १
मौजे आंबेल १

येकूण दोन गांव मुकासा करार केले असे सदरहू गावचा येवज होईल तो मार निल्हेस वसूल देणे कलम

१

बिा

| | |
|---|---|
| हिरोजी साटम व | येशवतराव साटम |
| प्रतापजी साटम | याजकडेस मोजे |
| व संताजी साटम | मुणगे १ |
| १ मौजे वांदिवडे | दादजी नाईक |
| खुा | साटम याजकडेस |
| १ हिपले | मौजे शेवरे १ |
| २ | |

१ मिटागर गाउडवाडी पाो

३

येकूण गांव पांच पाो दोन गांव भोगवटा नाही ते

मौजे हिपले १ मौजे मुणगे १

२

बाकी गांव तीन व याचे मोबदला ताा खारेपाटण येथे तीन असत भोगवटा असे येणे प्राो मुकाशा गांव करार १

मुकास बाब पत्रें ४

---

ले. ६. सु. ११२३ जखर ३ } ६ श्री { श. १६४४ फाल्गुन शुद्ध ५ इ. १७२३ फेब्रुवारी २८

[डाव्या अंगास वाटोळ्या मुद्रेत*] श्री श्रीशाहुनृपतिप्रि । त्या कान्होजीतनुजन्म । नः कान्होजी सरखे । लस्य मुद्रा जय । ति सर्वदा ।

मशुल अनाम गणेश प्रभु देशाई ताा सालसी यासी कान्होजी आंगरे सरखेल सुाा सलास अशरीन मया व अलफ नुकसानाचे वसुलाकरिता रयेत तजावजा जाहाली म्हणोन विदित जाहाले त्यावरून वसूल मना केला असे हिसेब राजश्री अंताजीपंत मनास आणितील तुम्ही रयतेचा दिलासा करून कशास लावणे राा छ ३ जमादिलाखर [वा*] मोर्तब सूद

---

| | | |
|---|---|---|
| ले. ७. सु. ११३२ शव्वाल २६ | ७ श्री[नि*]रामचंद्र | श. १६५४ चैत्र वद्य १३ इ. १७३२ एप्रिल ११ |

[वा. शि.*] ० ~ । श्री । श्रीरामचं । द्र चरण नील । कंठ सोनदे । व...

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधरविस्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराऊ रामचंद्र आमात्य हुकुमतपन्हा ताहा गणेश प्रभु बिन रागदे प्रभु गोत्र भारद्वाज सूत्र अस्वलायेन देसाई ता सालसी सुहूर सन इसने सलासीन मया अलफ तुम्ही किले गगनगडचे मुकामी हुजूर येऊन विनंति केली कीं मौजे वोंटु ता सालसी हा गाऊ आपला वतनी इदलशाही कारकिर्दीस गाव आपणांस चालत होता अलीकडेस चालत नाही येसियासी आपण वतनदार कुटुंबवत्सल राजश्री स्वामीच्या राज्यात येकनिस्टपणे यापूर्वी शेवा केली आणि पुढेही करीत आहो येसियासी स्वामींनी रुपालू होऊन मौजे मजकूर इनाम करून द्यावा म्हणोन विनंति केली त्यावरून मनास आणिता तुम्ही वतनदार आणि प्रामाणिक कुटुंबवच्छल येकनिस्टपणे वतनप्रसंगे शेवा करीत आहा तुमचे चालवणे अवश्यक याकरिता मौजे वोंटु ता सालसी हा गाऊ पूर्वमर्यादेप्रमाणे सेरींज हक्कदार व इनामदार करून तुम्हास इनाम करून दिल्हा असे तरी सदरहू मौजे मजकूर इनाम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे जाणिजे [*नि] छ २६ सोवाल [नि*] निदेश समक्ष [लं. व*] लेखन । सीमा समु । लसतं

[पाठीवर*] बार सुरू सूद बार

---

| | | |
|---|---|---|
| ले. ८. सु. ११५८ जखर ५ | ८ श्री तालीक | श. १६७९ माघ शुद्ध ७ इ. १७५८ फेब्रुवारी १४ |

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो त्रिंबक गोसावी यासी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ समान समसैन मया व अलफ नारो विठल याणी हुजूर विदित केले कीं आपली वतने तपे सालसी येथे आहेत चि॥

मौजे करूल
 १ खोती मिरास
 १ कुलकर्ण
 २

मौजे फोडे येथील माहाजनकी १

तपे सालसी येथील कर्णिकी जिवाजी बापूजी व नारो विट्ठल यांचे हक व इनामती १

मौजे कर्जे येथील कुलकर्ण १

तपे सालसी येथील जकातीचें पतक व कुलकर्ण येसाजी तुकदेव व गणेश राम निमे व नारो विठल निमे १

मागर्जी (!) दादाजी माहाबाद (!) इनामत कलम १

येकून कलमें साहा येथील वतनें पुरातन आहेत म्हणऊन त्यावरून हे पत्र सादर केले असे तरी मशारनिलेची वतनें व इनामत कानोजी आंग्रे व संभाजी आंग्रे

यांच्या कारकीर्दीपासून सुदामत भोगवटा मनास आणून वाजवी चालत असेल त्या प्रो चालवणे जाणिजे [नि*] छ ५ जमादिलाखर [नि*] बहुत काय लिहिणे

---

ले. ९. सु. ११५९ } जखर ४ } ९ श्री { श. १६८० माघ शुद्ध ६ { इ. १७५९ फेब्रुवारी ३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो त्रिंबक गोसावी यांसी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा तिसा खमसैन मया अलफ रा फट सावत व राम सावत व तान सावत व लक्षुमण सावत भिरवडकर याणी हुजूर येऊन विदित केले की सालसी प्रांती आपले पाटिलकीचे गांव व मागांचे हक व इनामत जमिनी व गावखोती व सरपाटिलकीचे वतन येणेप्रमाणे पूर्वी इदलशाहीपासून चालत आले अलीकड काही चालते काही चालत नाहीं ते चालते करावे म्हणोन त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केले असे तरी भिरवडकर सरदार याणी राज्यात कष्ट मेहनत बहूत केली याचे वतन व गांवसीव वगैरे जे सुदामत अंगारकाचे कारकिर्दीत चालत आले असेल त्याप्रमाणे तुम्ही चालवणे नसेल चालले त्याची तहकीकात करून पूर्वील दाखले दुमाहाले मनास आणून हुजूर लेहून पाठविणे पेस्तर विदित जाहाल्यावरी आज्ञा कर्तव्य ते केली जाईल जाणिजे [नि*] छ ४ जमादिलाखर [नि*] बहूत काये लिहिणे

---

ले. १०. } १० { श. { इ.

[पत्राचे शेवटीं डावे अंगास अकरा दली मुद्रेत*] श्री । राजारामचरणी दृढभाव । वीठोजीसुत । चांदोजी घाटगे झुंझारराव

राजश्री संभाजी आंग्रे सरसुभेदार आरमार गोसावी यांसी

ई सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नेहांकित चांदोजी घाटगे झुंजारराऊ नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिले पाहिजे विशेष सालसी प्रांती जंजिराचे लोक साठ सत्तर माणूस पर्यंत नामजाद ठेविले असे त्यास सांप्रत सावंताची स्वारी ता मजकुरी गेली तेव्हा तुम्हाकडील स्वारी धावली ते समयी जंजिराकडील लोक होते तेही धावले त्याचा याचा युद्धप्रसंग जाला सावंताकडील मोड जालियावरी ज्याणे आपले मर्दाईन फौजेमध्ये जाऊन सिलेभाले मेळविले जंजिराकडील राजश्री त्र्यंबक प्रभू यांचे दिमतीचे दोघेजण सिपाये यास बंदूख येक व तरवार येक ऐसे सापडले ते जंजिरा घेऊन आलियावरी त्यास बदल मुशाहिरा दिले हे वर्तमान तुम्हास कोणी सांगेल तेव्हा विशम वाटेल याकरिता लिहिले असे [नि*] बहुत काये लिहिणे हे विनंति

[म*] मोर्तब सुद

---

ले. ११. } ११ {
जानेवारी १५ }

सेवेसी देसाई व नांडकर्णी जमीदार तर्फ सालसी तालुके जजिरे सिंधुदुर्ग विज्ञापना तागायेत तारीख १५ ज्यानेवारीपावेतों तर्फ मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष तारीख मजकुरी हुकूम सादर जाहाला तेथे आज्ञा की तर्फ मजकुरी सयाद्रि लगत उतरेकडून दक्षणपर्येत घांट किती व दर घांटाचे कोश किती व दर घांटाचे नांव काय त्यांत येकमेका घाटास अंतर किती व घोडी बैल जाण्याजोगे घाट कोणते कितीक व फख्त माणूस जाण्याजोगे किती व माणूस वगैरे जात नाहीत असे किती वगैरे चाबाबत रपोट कर्णे म्हणोन त्यास तर्फ मजकूरचे सयाद्रीस उतरेपासून दक्षणे परयेत घांट व पाजा नाव कोश वगैरे येणेप्रमाणे

१ घांट सिवगड मौजे घाणसरी तर्फ मजकूर येथून पाया तोवर मौजे कुरली ता। खारेपाटण या गांवातून वर गेला चडाव अजमासें पायापासून माथेपर्येत दीड कोश घोडे बैल माणसें वगैरे रहदारी त्या घाटाने होते

१ सिवघांटापासून दक्षणेकडे येक कोशावर मौजे फोडे तर्फ मजकूर येथे नाव घांट फोडा बहूत दिवस बंद होता साल गु॥ सरकार अमलात चालता जाहला त्या घाटाने बैल घोडी हत्ती तोफा गाडे वगैरे रहदारी सिवघांटपेक्षां सुगम आहे घाटतला-पासून माथे पर्येत चडाव अजमासें येक कोश आहे.

१ तेथून दक्षणेकडे मौजे हरकुल खुर्द व मौजे भिरवडे या दों गावातुन पाज आहे ते वाटेने घोडे बैल जात नाही फख्त मनुश गांवगुडे जातात येतात फोडे घांटापासून पाज लांब अजमासे दीड कोश नाव भिरवडेची पाज वर पेंठ वलिवंडे कोश ६

१ तेथून दक्षणेकडे दोन कोशांवर नाटल व कुंभवडेची पाज हेच नाव डोई ओझ्याचे माणूस जाते येते अंन्येत्र रहदारी नाहीं वर गुडा बांबरडें कोश २

१ तेथून दक्षणेस अडीच कोशांवर नरडवेची पाज हेंच नांव पायापासून माथेपर्येत चडाव दीड कोश डोईओजेचे माणूस व खबरदार बैलगुरू असल्यास सांभाळून नेल्यास रिकामे जाईल येईल वरकड रहदारी नाही वर पेंठ आजरे पाजेपासून कोश ९

५

येकूण घांट दोन व पाजा तीन तर्फ मजकुरी आहेत यासिवाई नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

सई

१ गणेशप्रभु देसाई ता। मा॥र
१ राघो गोपाल नाडकर्णी ता। मा॥र
१ सदासीव अनंत नाडकर्णी ता। मा॥र

# २ कान्हूर-नगरकर

ले. १. | १२ | श. १६७३ ज्येष्ठ वद्य ३
सु. ११५२ रजब १७ | श्री | इ. १७५१ जून ३

राज्यमान्य राजेश्री फतेसिंग भोसले यासी आज्ञा केली येसीजे रा गणेश माहादेव दिा वाकेनीस याजकडे पूर्वीपासून पाा आकलकोट येथे मौजे बोरगांव व मौजे मिरवल येकून गाव दोन यास मुकासा होते त्यास त्याचा मक्ता रुपये ७०० सातशे माहाराजानी करार करून दिल्हे होते तेणे प्राा तुम्ही चालवीत आला त्यास मारनिलेचे पुत्र रा माहादाजी गणेश याजकडे करार आसे तर तुम्ही पुढे सालदरसाल देत जाणे याचे चालवणे आम्हास आहे व तुम्हास आहे तर अवशक जाणोन चालवीत जाणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप करीत न जाणे जाणिजे छ १७ रजब सुाा इसने समसेन मया अलफ [नि*] सुदामतप्रा याचे चालवणे सूज्ञ असा

---

ले. २. | १३ | श. १६८७ आषाढ वद्य १
सु. ११६६ मोहरम १४ | श्री | इ. १७६५ जुलै ३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो बाबाजी कादार पाा पारनेर गोसावी यासी सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुाा सीत सितैन मया व अलफ रुाो

उधो नारायेण यासी पाा मजकूर पैकी सालाबाद प्राो

२५ वर्षासन

२५ विठोजी गायकवाड सिलेदार याचे दिमतीस मशारनिल्हे याचे नावे

५०

येकूण पंनास रुपये पावत आले आहेत त्यास हे मृत्य पावले बहुत दिवस सेवा केली साा मशारनिल्हे याचे पुत्र राा कृष्णाजी उधव याचे नावे सेत सनद सन समस सितैना करार करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे तरी पेशजी प्रमाणे सदरहू रुपये ५० पंनास सन समस सितैनापासून पाा मजकूरपैकी चालवणे जाणिजे [नि*] छ १४ मोहरम [नि*] बहुत काय लिहिणे [वा*] लेखन सीमा

---

ले. ३. | १४ | श. १६९७ मार्गशीर्ष वद्य १२
सु. ११७६ सवाल २५ | श्री नकल | इ. १७७५ डिसेंबर १९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जिवाजी गणेश स्वामी गोसावी

पोा माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणे विशेष नारोबाबाजी यास मौजे कोथरूड ताा कर्यात मावल येथे मला

व शेत खेरीज तेनात सेत सनद जमीन शंभर रुपयाची नेमणूक होती त्यास ते मृत्य पावले सा। त्याचे पुत्र रा। महादाजी नारायण याचे नावे करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी मौजे मार पो सेत सनद खेरीज तेनात जमीन शंभर रुपयाची याजकडे चालऊन सदरहू आकार मा। निल्हेचे नावे खर्च लिहीत जाणे जाणिजे [नि*] छ २५ सवाल सु॥ सीत सबैन मया व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे [नि*] हे विनंति

---

ले. ४.
सु. [११]९९ मोहरम १८

१५

पौ छ १९ मोहरम सन तिसा तिसेन

श. १७२० आषाढ वद्य ५
इ. १७९८ जुलै ३

आशीर्वाद उपरी आज भोमवारी लहिताहून वोतुरास मुकाम जाणार पेशजी राजश्री नरसो विश्वनाथ याजबरोबर सागून पाठविले होते त्याप्रो केले की न केले हे काहीच नाही त्यास त्याप्रो जराबाजरा घडावे बरोबर स्वार प्यादे यावे राजूरासही लिहिले आहे कीं पचवीस माणूस रवाना करावे म्हणोन सिवाजीपंतास सांगितले आहे सारांष येविसी मी तीन च्यार वेल लिहिले आहे व नरसोचाबरोबर निरोपही पाठविले परतु कालहरण होते हे ठीक नाही मो येथे बरोबर तुम्ही तेथे तेव्हा ही गोष्ट नाहीं बुधीस वैर करू नये सकटसमय आहे सकटेकरून पार पाडावा लागतो सकट आणि सुख दोन्ही साधत नाहीत आपणही न राहावे पुण्यास पनास हजार रुपयांच्या वराता पा। पारनेरचे ऐवजी जाल्या आहेत ते वरातदार कान्हुरी येणार तुम्ही तो तेथून निघत नाहीं तेव्हा काय करावे सिदे पुणे लुटणार होते परंतु येक दोन दिवस राहिले पंत प्रधान यांचे मनात रक्षावे श्रीमंत रावसाहेब याचा हेत कीं देह वा पातयेत् अथवा अर्थ वा साधयेत् याप्रो आहे आपण वस्तवानी मुले लेकरे सुधा यावे हे बरे इतक्यावर मर्जी रा। छ १८ मोहरम हे आशीर्वाद

---

ले. ५. सु. ११९९
रबिलोवल १३

१६
श्री

श.१७२० श्रावण शुद्ध १५
इ. १७९८ ऑगस्ट २६

पैवस्ती छ, १४ रबिलोवल मुकाम कान्हूर सन तिसा तिसेन

आसीर्वाद उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले मजकूर सविस्तर समजला दुर्जन कैद केला म्हणोन काल डाकेबरोबर येथेही वर्तमान आले परंतु यातील परिणाम कसे काय न कळे इंग्रजांची जात बहूत हरामी आसती राजश्री रामाजी सदाशिव याचे पत्राची नकल पाठविली ती पावली त्याणी लिहिले की परमारा जातात खर्चासही पावते जाले म्हणोन त्याणी विस्तारे लिहिले ते समजले त्यास आद्याप कोण्ही तिकडे गेला नाही खर्चास पावले म्हणोन लिहितात त्यास ही गोष्टही लटकी आणक

आतपणा दाखवावयाचे कारण आहे त्यास वारंवार पत्र दस्ताऐवजी लिहिणेही ठीक नाही गोमाजीपंताची गत्य व्हावयाची नारो गणेश यकुर्णास हजार रुपये पाठवावे म्हणोन लिहितात येविसीचा विच्यार ल्याहावा म्हणोन लिहिला त्यास त्याजकडील झाडा तुम्हाकडे आलाच आहे या विसी दोन पत्रे मजलाहि त्याची आली होती झाडा पाहून रसदेच्या भरण्यास ऐवज पडला असेल तो पाठविला पाहिजे राजश्री आपाजी गेले येविसीचा मजकूर श्रीमंत दादानीही तुरुयाचे कानावर घालण्यास राजश्री गोविंदपंत सिंत्रे येथून काही कामानिमित्त पुण्यास गेले त्याजवलही सांगितले आहे व हरी गोपाल यास मी लिहिले आहे की हा मजकूर कानावर घालावा त्याचेहि उत्तर आले की दक्षणेची गडबड (दूर) जाली म्हणजे कानावर घालून उत्तर घेऊन लिहून पाठऊ म्हणोन च्यार पाच दिवस जाले पत्र आले होते त्याचे पत्र आले म्हणजे लिहून पाठऊ येथून सदाशिव पाटील ढेपे व आन्साबा वाकलीकर यासी येशवंतरायाकडे पाठविला आहे की पारने[रा*]स माहालास उपसर्ग नसावा म्हणोन पाठविले आहेत बाराभाई याणी बक्षीसही पत्र लिहिली आहे व दादानी गोविंदपंत सिंत्रे यास बक्षीसी बोलोन महालास उपसर्ग न होय असे करण्याविसी लिहिले आहे काय होईल ते पाहावे सदाशिव पाटील तेथे तुम्हाजवळ उदेक येईल त्यास जागा दाणा वैरण जेवावयाची स्वस्थता करून लावावा वर्तमान लिहीत जावे रवाना छ १३ रचिलोवल हे असीर्वाद.

---

| | | |
|---|---|---|
| ले. ६. श. १७२२ }<br>माघ शुद्ध ४ पूर्वी } | १७<br>श्री | { श. १७२२ माघ शुद्ध ४<br>{ इ. १८०१ जानेवारी १८ |

पैवस्ती माघ शुद्ध ४ शके १७२२

चिरंजीव राजश्री दादा यासी कृष्णाजी भैरव आसीर्वाद उपरी तुम्ही राजश्री मोरोबादादा यास मेजवानी नगरकराकडेस जाहली त्यास तुरे व गजरे फुले गुंडाजी माली याजकडील तुम्ही घेतलीत म्हणून तो आज पैका मागावयास आला होता त्यास १० ची फुले कोणाकडे घेऊन दिल्ही त्याचा पैका कित संडला आहे तो तुम्ही घरीहून द्यावा की कसे हे तपसीलवार लिहून पाठवावे मायनी माळणीकडे गुलाबाच्या फुलांची बाकी काये आहे त्याची यादी कोणापासी आहे ते तपसीलवार लिहून पाठवावे तटू येथून नेला त्यास डागला तो बरा जाहला किंवा नाही आपल्या उपयोगी पडावयाचा आहे किंवा नाही हे तपसीलवार लिहून पाठवावे मजसिवाय माहेनीकडील जिन्नस तुम्ही आणिला असल्यास यादीवरून परत पाहून लिहून पाठवावे म्हणजे तिजला मुजरा देऊन बाकी पैका आपला गुलाबापैकी निघेल तो तिजपासून घेऊ बहूत काय लिहिणे लोभ करावा हे आसीर्वाद

ले. ७.
जिल्हेज १० भौम

१८
श्री

शा. १७२४ चैत्र शुद्ध ११
इ. १८०२ एप्रिल १३

राजश्री आणा स्वामीचे सेवेसी

विनंति विशेष कालचे बोलण्याचे पर्याय सर्व राजश्री सिवाजीपंत याणी लिहून पाठविले त्याजवरून कलले त्यास रायगडचा संशय त्यास असला तर वसईस जावयाचा बेत करावा या उपरी दिवसगत लाऊ नये कारण गोमाजीपंत तह्यागिन्याच्या सनदा घेऊन आले मागाहून विठुराकडील दोन हजार फौज येत आहे म्हणोन आवई आहे हीं गोष्ट लांबणीवर पडली असता फार कठीण पडेल आजपर्यंत जे मिळविले ते व्यर्थ जाणार असा प्रसंग बेतला आहे आम्हाविसी त्याची खातरजमा न पडे तर आपलेकडील राजश्री बालकृष्णपंत व पनास मागूस समागमे यावे आपण अनमान करू नये त्याजकडील फौज येऊन पावल्यावर परम विलग पडेल याजकरिता विनंति लिहिली आहे कसेहीं करून उद्या निघावयाचे करावे आम्हाविसी पाहिजे तसी खातरजमा आपण करावी आणि सत्वर निघण्याचा बेत करावा दिवसगतीवर गेले असता जन्माचे अपेश पदरीं येते याचा विचार आपण करून लिहून पाठवावा आपले भेटीसि बहूत दिवस जाहले जवल पाच कोस आज तीन दिवस आहे परंतु दर्शनाचा योग घडत नाही तस्मात आमचा दैवयोग म्हणावा पूर्वरूपेत अंतर नसावे आणा! मी माजलो नाही जो पहिला तोच आता आहे भेटीचा योग ईश्वरे घडविल्यास कलेल सूज्ञास विस्तारे काय लिहू जसे बनेल तसी खातरजमा करून देऊन निघण्याचे करावे तथा ठेऊ नये वसईस नेण्याविसी सरकारची आज्ञा नाही परंतु श्रीमंताचे मर्जीकरिता मी आपले तर्फेने करितो चिंता नाही मी दादाचे आज्ञेसेरीज चालणार नाही येविसी आपण वच्यन द्यावे मी तसाच वर्तेन राा छ १० जिल्हेज भौमवार दोन प्रहर लोभ करावा हे विनंति

---

ले. ८. सु. १२११
रमजान २४

१९
श्रीराम

शा. १७३२ आश्विन वद्य ११
इ. १८१० आक्टोबर २४

नकल

राजश्री त्रिंबकरा[व] शंकर ठाणे पेमगिरी गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [ मो. जा. ] राजश्री रूपराम चौधरी रामराम विनंति उपरी तालुके रतनगड वगैरे माहाली चोरटे लोकाचा वगैरे उपद्रव होतो त्यापैकी पेमगिरीचे गावी येक दोघे चोरटे आहेत म्हणोन राजश्री रामचंद्रराव आणा नगरकर त्याजकडून याद आली त्याजवरून हे पत्र लिहिले असे तर चोरट्यास धरावयास त्याजकडून स्वारी येईल त्याजला तुम्ही अडथळा करू नये ते चौकसी करणे ती तिथे पाहूनच करतील रवाना छ २४ रमजान सुा इहिदे अशर मयातैन व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति

---

ले. ९.
जिल्हेज १५ गुरु

२०
श्री

श. १७३२ पौष वद्य १
इ. १८११ जानेवारी १०

चिरंजीव राजश्री भाऊ व शिवराम यासी प्रति रामचंद्र माहादेव आसीर्वाद उपरी आम्ही पुणियाहून पौष शुा ८ बुधवारी निघालो ते दरमजल शुा १५ मेस बुधवारी प्रातःकालचे च्यार घटका दिवसास गुहागरास दाखल जालो ते श्रीमंत राजेश्री यजमानस्वामी स्नानसंध्या करीत होते तेच समयी दर्शन घेतले मर्जी प्रसन्न होती मार्गाचे वगैरे वर्तमान पुसोन आज्ञा जाली की तुम्ही मंडलीसुद्धां भोज्यनास वाड्यात येणे त्यावरून सर्व मंडलीसुधा वाड्यात भोजनास गेलो तुम्ही चिमाजी गाडीवान याजबरा(बर) पोथ्या नग व आरसा येक व वो राा देवराव भाऊ वैद्य याणी पाकाच्या वड्या वजन साडेतेरा टाक दिल्या त्या तुम्ही लिहिल्याप्रमाणे पावल्या यजमान स्वामींचे स्वारीचा कूच येथून वाा ५ इंदुवारीं किंवा वाा ७ बुधवारी होणार याप्रमाणे नेम आहे कळावे तुम्ही लिहीत पढत जाणे वरकड अधिकोत्तर वर्तमान लिहावेसे नाहीं रवाना छ १५ जिल्हेज गुरुवार आस्तमान हे आशीर्वाद

राजश्री घोंडोपंत यास नमस्कार चिरंजीवास लिहिले आहे त्यावरून कलेल तुम्ही येणार किंवा नाहीं हा मजकूर यजमानादेखत मंडलींनी काढला तेव्हा आम्ही सांगितलें की चौ रोजाचे आवकाशाने तेथून निघाले येथे येईल तो स्वारीचा कूच होणार तेव्हा येऊं नये म्हणोन मी सांगितलें वरकड अधिकोत्तर लिहावेसे नाही राजश्री देवराव भाऊ याचे मर्जीचे संरक्षण तुम्ही करालच परंतु सूचनार्थ लिहिले आहे हे विनंति वो राजश्री देवरावभाऊ यास साष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा

पैवस्ती छ १६ जिल्हेज मंदवासर

---

ले. १०. सु. १२१४
रवल २

२१
श्री

श. १७३५ फाल्गुन शुद्ध ३
इ. १८१४ फेब्रुवारी २३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री आपाजीपंत व भिकाजीपंत स्वामींचे शो

पो रामचंद्रराव माहादेव साा नमस्कार विनंति उपरी तालुके मुल्हेर येथील सालम्जारचे ऐवजी राजश्री सदाशिवपंत अभ्यंकर निाा सरकार याजकडे फौजेचे खर्चा बाा राजश्री बापूजीपंत गोडबोले व भिकाजीपंत वाघ याणी देविले ते चांदवड छापी रुपये ५००० पाच हजार मारनिल्हे तुम्ही मरणा करून पावती व भरपाईचे पत्र पाठविले त्याप्रो सदरहू पाच हजार रुपये स्वारीपोत्याकडे जमा असेत मुाा कोपरगाव राा छ २ रोवल सुाा आर्बा आशर मयातैन व अलफ बहूत काय लिहिणे हे विनंति

---

ले. ११. श. १७३५ श्रीमुख फाल्गुन वद्य ११ | २२ श्री | श. १७३५ फाल्गुन वद्य ११ इ. १८१४ मार्च १७

श्रीमंत राजश्री आणासाहेब नगरकर स्वामिचे सेवेसी आज्ञाधारक टिकाराम बिन चेतनराम गवडी व देवींदास बिन जनूदास गवडी पेठ शुक्रवार राम राम विनंति विशेष ल्याहावया कारणे असी जे पेठ शुक्रवार येथील सरकारवाड्याचे गचीचे कामाकरितां चुन्याबद्दल यावयाचे रुपये सहाशे त्यापैकीं रुपये ३०० तीनशे तुम्हीं आम्हास दिल्हे ते आम्ही भरून पावलो हे पावती लिहून दिल्ही सही मिति शके १७३५ श्रीमुख नाम संवत्सरे फाल्गून वा। ११ हस्ताक्षर सदाशिव व्यंकटेश बेल्हेकर

निशाणी गज

---

ले १२ सु. १२१५ रमजान २२ अ. भाद्रपद वद्य ७ बुध | २३ श्री गजानन | श. १७३६ अधिक भाद्रपद वद्य ७ इ. १८१४ सप्टेंबर ७

याद वाडा सरकार शुक्रवार याचे उतरेकडील सोप्यावरील जुनी गची काढून नवी करावयाची सबब गची खणोन त्याजवरील मलामा निघेल त्यातील कामाचे उपयोगी वीट निघेल ती निवडून ठेऊ बाकी मलामा भाऊ सरंजामी याचे सेजारी रामचंद्र महादेव याणी आपले जाग्यात चुन्याचे दंग लाविले आहेत तेथे आणून टाकावा त्याची व खणावल व वरून मलावल उतरणावल सुद्धा देखील उपयोगी वीट निवडून ठेवणावल मिळेल. मजुरी यावयाची त्याची... ते सु॥ खमस अशर मया तैन व अलफ १५० रुपये येकूण दीडसे रुपये करार केले असत वर लिहिल्याप्रमाणें मलामा काढावा लाकडास इजा देऊ नये येणेप्रमाणें करार असे सदरहू लिहिल्याप्रमाणे रुपये पावतील छ २२ रमजान अधिक भाद्रपद वद्य ७ बुधवार रुजू बालाजी रामचंद्र वामन देशमूख रुजू आनोजी गोविंद साक्ष नि॥ जनार्दन नारायण देशपांडे रुजू रावजी कृष्ण आवलेकर मर्त्री बालाजी

---

ले. १३. सु. १२१५ सफर २४ | २४ श्री | श. १७३६ पौष वद्य १२ इ. १८१५ फेब्रुवारी ५

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र माहादेव स्वामी गोसावी यासी

पोष्य बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहिणे विशेष माहालानिहाय प्रा चागलाण पैकीं गाव तालुके मुल्हेर येथील बेगमीस आहेत तेथील मोकासा छत्रसिंगराव टोके विश्वासराव याजकडे जातीस व स्वाराचे बेगमीबद्दल सरंजामास होता ते

४२ पो जेतापूरपैकी
३ पो कोराळीपैकी
१ का पानखेरे
―――
४६

येकूण शेचाळीस देहे येथील मोकाशाचे अमलाचे जप्तीची कमाविस त्रिंबकजी डेंगळे याजकडे होती ते दूर करून साल मजकुरी तुम्हाकडे सांगितली असे तरी इमाने-इतबारे वर्तोन सदरहू माहालचे गावचे मोकाशाचा अमल चौकसीने करून जमाखर्चाचा अजमास आलाहिद्रा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणे वर्तणूक करणे साल मजकूरचा वसूल माजी कमाविसदार याजकडे पडला असेल त्यापैकी माहाल मजकूर नेमणुकी खर्चाची हिस्सेरसीद मुदतमाफक होईल ते रवाना करून बाकी ऐवज राहील तो त्याजपासून माघारा घेऊन मोकाशाचे आमलाची बाकी येथे असेल ती रुजू करून घेणे जाणिजे [नि*] छ २४ सफर सुा समस अशर मयातैन व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे [नि*] हे विनंति

---

| | | |
|---|---|---|
| ले. १४. <br> सु. १२२१ | २५ <br> श्री | श. १७४२–४३ <br> इ १८२०–२१ |

यादी राजश्री रामचंद्राव महादेव सुा सन इहिदे असेरीन मयातैन अलफ कसबे कान्हूर पाो पारनेर हा गांव आमचे तीर्थरूपास बदल मुशाहिरा सरकारातून दिल्हा होता ते तीर्थ[रूप] यात्रेस गेलेयावर वडील बंधू येशवंतरावदादा व आम्ही वेगळे जालो तेव्हां लक्ष्मणराव नागनाथ व नारोपंत लिमये व पांडुरंग रामचंद्र व मल्हारजी पाटील दुबे कान्हूरकर या चौघा तिराइताचे विद्यमाने वाटणीची याद केली त्या यादीस गावाविसी कलम लिहिले आहे की गावाविसी सरकारांत विनंति करावी आज्ञा होईल त्याप्रमाणे चालावे त्या यादीवर आमचे बंधूची व आमची मान्यता आहे ती याद त्याजवळ आहे पुढे काहीं एका दिवसानी वडील बंधू निवर्तले त्याजवर सरकारातुन लोकाकडील गांव गैरसनदी निवडून त्याजवर वराता होणार असे समजण्यात आले ते समयी बंधूचे चिरंजीव राजश्री निळकंठराव यास सांगितले कीं गावाविसी सरकारात विनंति करून सनद घ्यावी वरात जाल्यावर जड पडेल तेव्हा त्याणी सांगितले कीं आम्हास बोलावयाचे नाहीं तुम्ही हा मजकूर चौघा तिऱ्हाइतास जाहीर करून विनंति केली कीं पूर्ववतप्रमाणे गाव करार करून दिल्हा पाहिजे त्यावरून आज्ञा जाली कीं निळकंठराव याजपासोन चाकरी घ्यावयाची नाहीं गाव त्याजकडे चालवावयाचा नाहीं तुम्ही त्यांजविसी बोलू नये हा मजकूर चिरंजिवास कळविला त्याजवर सन असेर मयातैनात दरोबस्त गाव आमचे नावे करार सनद करून दिल्ही त्याप्रमाणें

ऐ. सं. सा. सं. ११–२

गावाचा अनुभव करीत आलो गाव वडिलोपार्जित हा उभयतानी घ्यावा म्हणोन चिरंजीवानी मजकूर समजाविला त्यास आमचे तीर्थरूप व आमचे चुलते विठ्ठलराव विभक्त जाहले ते समयी गावची सनद तीर्थरूपाचे नावे होती गांव तीर्थरूपाकडेसच सरकारांतून चालविला हली आमचे बंधूचे चिरंजीव जिकर करतात त्यास वाटणीचे यादीवर कलम लिहिले आहे त्याप्रमाणें सरकारांतून सनद आमचे नावे जाहली वेहिवाटहि त्याप्रमाणें सरकार कुंपणीचे आमलापर्यंत जाहली पूर्वीपासोन सरकारातोन आम्हास प्रपंचबेगमीस गावावेगळ नेमणुका होत्या त्याची यादही पाहावयास पाठविली आहे.

---

ले. १५. } २६ {
श्री

[ पहिला बंद गहाळ* ]

पुरवणी स्वामीचे शेवेशी

व त्याजकडे सिबंदीचे लोक आहेत त्याणी चाकरीस धुलपाकडे राहू नये याजकरिता त्याचे मुलामाणसास तगादे होतात ते होऊ नयेत याचा मात्र आपण बंदोबस्त करावा त्याजकडून याजपुढे सरकारतालुक्यात गैरवर्तणूक होऊ नये असा बंदोबस्त आम्ही करवितो म्हणोन बापू बोलले त्यावर मी त्यास सांगितले कीं आमचे मनांत हेंच आहे की त्याचा आमचा खटला वाढो नये सरकारकामे निर्वेध होत असावी आपण धुलपास पत्र पाठविले त्याची नकल पाठविली तीहि बापूस दाखविली त्यावरून त्याची खातरजमा जाली हली पत्र पावताच धुलपाकडील चाकरमाने आहेत त्याचे घरी उपद्रव होत असेल तो मना करवावा येथे जाबसाल ठरण्यांत येईल त्याप्रमाणे बाबाचे विचारे पत्रे लिहून राजश्री बापू सोहनी याजकडे पाठवितो व आपले कडेहि लिहून पाठवितो बाळा गोगावला व पदू अद्याप येऊन पोहोचला नाहीं पत्र पावताच ऐवजाचा मार लिहिला आहे त्याचा बंदोबस्त होऊन सत्वर उत्तरे पाठवावी तूर्त पो सांगोल्यापैकी दोन हजार रुपये गोखल्याकडे भगवंतराव याजकडून देववितो आपलेकडून मार लिहून येईल त्याशी बोलेण आमदाबादेचे बाकीचाहि मार बापू [नीं] काढिला होता त्यास मी सांगितले की आमचेकडून गुता नाही आपण मात्र बाकीचा उलगडा करून घ्यावा त्यावर उगेच राहिले प्रसंग पडल्यास पेशजी मार लिहून आला आहे त्या (?) बोलतो शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना

---

ले. १६. सफर २३ } २७ श्री { श. इ

शेवेसी विनंती शेवक रामचंद्र विठल व सखाराम विश्वनाथ सां नमस्कार विज्ञापना तागाईत २३ सफर पावेतो स्वामीचे रुपेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष प्रां कल्याण येथील माहाली कोल्यांचा दंगा मनस्वी होऊन वसूल दरोबस्त बंद जाल्याचा प्रकार स्वारी येथे असता कल्याणाहून लिहोन आला त्यावरून सरकारात विनंती करून तीनसे लोकाची परवानगी घेतली त्याप्रो लोक स्वारीतून जावे असा बेत जाह्ला होता त्याचे काय जाह्ले हाली कल्याणाकडून माहालकरी वगैरे याची पत्रे परभारे आली कोल्याचा दंगा फारच वाढला आहे लौकर लोक गेल्यास परिणाम नाहीतर रयत तजावजा होऊन वस्ती फुटेल याजकरिता मागती लोकाविसी परवानगी घेऊन राजश्री सदाशिव वामन याची रवानगी कल्याणास लौकर होय ते केले पाहिजे नारलींचे झाडाचा बंदोबस्त यथास्थित आहे राजश्री नारोपंत नाना जोसी यास रोजीना खर्चाची वगैरे वरदी समजाऊन काही वाट चालविली आहे बंदोबस्तास लोक जाण्याची त्वरा जाली पाहिजे स्वारी गेल्यावर कल्याणाहून व डबईहून पत्रे आली नाहीत बहूत काय लिहू शेवेसी श्रुत होय हे विज्ञापी

---

ले. १७. सफर ३ बुधवार } २८ श्री { श. इ.

पौ छ ५ सफर

चिरंजीव राजश्री भाऊ सिवराव यासी प्रती रामचंद्रराव माहादेव आसिर्वाद उपरी आम्ही तेथून निघाल्यातागाईत आजपावेतो तुम्हाकडून व घराहून व राजश्री धोंडोपंत याजकडून पत्रे आली नाहीत श्रीमंत राजश्री यजमान स्वामीजवल येखाद वेळ गोष्टी निघतात तेव्हा लटकेच उतर करावे की याणी मजला पत्र पाठविले त्यात लिहिले आहे की आपणच तेथे आहा त्यापेक्षा आम्ही महाराजास पत्र काय ल्याहाचे आहे आमच्या वारवार गोष्टी काढीत जाव्या आसे मी बोलतो परतु तुम्हा सर्वास पत्र लिहावयाचे आसेल किंवा नसेल याचा विच्यार तुमचे तुम्हास ठाऊक स्वारी लौकरच येणार वास्तव आता पत्र पाठवावयाचे प्रयोजन नाही कैलासवासी तीर्थरूप बाबाचे श्राध आज सरकारचे वाड्यांत जाले श्रीमत राजश्री यजमानस्वामी व राजश्री आणा ढमढरे वगैरे मडली वाड्यांतीलच भोजनास होती रा छ ३ सफर सौम्यवार बहूत काय लिहिणे हे आसिर्वाद

---

ले. १८. | २९ श्री | श. इ.

विज्ञापना असी जे आपलेकडे साल मजकूरच्या वराता जाल्या त्याविसी आकळूजचे मुकामी राजश्री बापू गोखले याणी दोन आसामी ब्राह्मण तगाद्यास पाठविले होते दुसरे दिवसी त्याणी द्वाही दिल्ही त्यावरून बापूचे डेन्यास मनाकरता गेलो त्याणी सागितले की किती दिवसात भरणा करिता हे यादीवर लिहून द्यावे म्हणजे तगादा मना करितो त्यास मी सांगितले कीं याद लिहून देणार नाही यजमानास लिहून पाठविले आहे आज्ञा येईल त्याप्रो करीन तरी न ऐकत भोजनही ते दिवसी तेथेच जाले नंतर ते बोलले कीं परभारा तगादा तिकडे पाठवितो येथे बल घडत नाही परंतु आणाचा शब्द लागेल मी त्यास येकच सांगितले की आशा दिवसात पैसा यावयाचा नाही परंतु त्याचे मनात येत नाही हली त्याचे म्हणे तगादा पाठवावयाचे आहे यास्तव आपलेकडून यादी सत्वर याव्या म्हणजे बंदोबस्त होईल नाहीतर होत नाही हे विज्ञापना

---

ले. १९. रखर २४ | ३० श्री | श. इ.

पौ छ २६ राखर

शेवेसी धोंडो विश्वनाथ सा॥ नमस्कार विज्ञापना ता छ २४ रबिलाखर पावेतो मु॥ क्षेत्र माहुली येथे स्वामीचे रुपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे यानंतर आज्ञा घेऊन निघालो ते श्रीमंतांचे खासा स्वारीबरोबर बुधवारी पाच घटका रात्रीस मुकाम मारी पावलो ते दिवसी बारा घटका रात्रीनंतर पर्जन्य मोठा पडला च्यार साहा घटकापर्यंत सरीवर सरी येत होत्या दुसरे दिवसी अनुष्ठानप्रसंग करण्यास पर्जन्यामुळे अनमानच होता शुक्रवारी उघाड पडली यामुळें अनुष्ठान प्रसंग करावयाचा तो केला आपली गोष्ट निघाली त्यातील अन्वय ज्वरांश जाला त्यास येकदो दिसानी प्रकृति चांगली होईल परंतु येण्याचा कंटाला असे बोलणे जाहाले वाईस येतील अशाही कोणी गोष्टी काढल्या त्याजवरून कोणी न येतील असेही बोलले मुख्यांनी भाषण केले नाही हासून उगेच राहिले आपल्या येण्याची खुशीच यावे हे युक्त परंतु येण्याजाण्यामुळें शरीरप्रकृत नीट राहाणार नाही व उंटे तटेही जिकडे तिकडे गेली असतील पुन्हा आणून बेत करण्यास अवसर थोडा स्वारी ज्येष्ठ शुद्ध सप्तमी अष्टमीपर्यंत या प्रान्ती राहील असें वाटते पुढे पंढरपुरची स्वारी आहे तेव्हा गेलेच पाहिजे त्यापेक्षां हाली येण्याची सोय नसल्यास राहणें जालेच आहे मर्जी चांगली आहे येथे आलो ते दिवसी मजल लांब घाट चढून येण्यामुळे माणूस घोडे थकले म्याना मागे राहिला यामुळे बहुत बेमर्जी होऊन राजश्री चिमणाजी नारायण याजवर नाखुषी जाली म्यान्यात दागिने होते परंतु सुखरुप दुसरे दिवसी आल्यामुळे चिमणाजीस जवल येऊ दिले कळावे

आपण आल्यास वर कोणास आणे तर आपले खुषीने आणावे असे बोलण्यात आले वा। रा। नाना दिक्षीत आज मंदवारी आले त्याणी कस्तुरीच्या गोल्या वा। राजश्री भाऊजवळील अथवा आपणाजवळ असिल्यास पा। म्हणोन जरूर सांगितले त्यास गोल्या पा। माझी प्रकृति चांगली आहे आपणाकडील वगैरे अधिकोत्तर ल्याहावयास आज्ञा होत जावी महाराजासही पत्र पाठवावे मर्जी पाहून देईन प्रकृतीमुल पाये अंतरून सगलेच राहाते यास उपाय नाहीं खावंद कृपा करितात यामुले सर्व निर्वाह आहे अशा मजकुराचे पत्र युक्तिसीर थोडके [अपूर्ण]

---

ले. २०. सु. (११९) ८१ } ३१ { श.
माघ शुद्ध ४ सोम } श्री { इ.

पौ। छ ८ रासर सनसमान मंदवार दोन प्रहर

विज्ञापना ता। माघ शु। ४ इंदुवासर प्रातःकाल मु। अकलूज येथे सुखरूप असे यानंतर तालुके अंजनवेल व ता। विजेदुर्ग येथील रसदेचे ऐवजाच्या वराता जाल्या तो मा।र पेशजी लिहून पाठविला त्यास एक महिना होत आला परंतु आपलेकडून जमेचा व खर्चाचा सूड येऊन सरकारची समजूत होऊन ठरण्यात येत नाहीं हली राजश्री बापू गोखले यानी काल यायास कारकून पाठविले होते मनाई मागितली त्यावर त्यानी उत्तर केले कीं तुम्हास सांगून एक महिना जाला परंतु कोणताहि जाबसाल नेमांत येत नाहीं हली काही ऐवज घेतल्यावेगळ तगादा उठत नाही त्यावरून बहुत पर्याये बोलण्यात आले महाराजहि दुरोन ऐकत होते वराता जाल्यावर मी विनंति केली कीं तेथील खर्च होऊन ऐवज वराते अन्वये कसा येतो आज्ञा जाली कीं तेथील व्यवस्थेच्या यादी आणोन नेम ठरवावा त्याप्रो। ऐवजाचा भरणा करावा त्यास येथे तर फौजेचे खर्चाचा गोंगटा(?) आपलेकडून तरी यादी येऊन मा।र समजत नाही यास्तव हली लिहिले आहे तरी पत्र पावताच दोही तालुक्याच्या यादिया वरा (वराता?) व सालमा।र पो। थोडा बहुत ऐवज सातान्यात राजश्री विनायकपंत वाघ याजकडे द्यावा म्हणजे येथे प्रसंगी बोलावयास ठीक पडेल ऐ[व]ज न देता उगीच बोलणे तूर्त येथे गोड वाटत नाही सालमा।र पो। काहीतरी ऐवज द्यावा लागेल यास्तव पत्र पावताच लिहिल्याप्रो। सरबरा व्हावी व राजश्री बाळोबा बाबाकडे पाचहजार रुपये देविले आहेत ते त्याजकडे द्यावेत व येशवंतराव नि॥ गोखले याजकडे ऐवज किती पावला त्याची याद पाठवावी बाबाकडून राजश्री राघोपंत थथे दोही तालुक्याचे चौकशीस आले होते त्यास आपण सांगितले की सरकारची सनद अथवा माझे पत्र आल्यावेरीस तुम्हास व्यवस्था समजावीत नाही त्यावरून त्याणी बाबास मजकूर लिहून पाठविला त्याप्रो। बाबानी मला सांगितले मी महाराजास विनंति केली आज्ञा जाली कीं त्याकडे कोकण प्रांताचा बंदोबस्त आहे त्यापेक्षा त्यास चौकशी करणे प्राप्त आहे तुमचे तालुक्यात

कोणी कारकून आल्यास व्यवस्था समजून द्यावी त्यावरून अलाहिदा पत्र बाबास लिहून दिल्हे आहे राघोपंत येऊन चौकशी केल्यास त्यांत आपला उपयोगच आहे व सरकारची आज्ञाहि आहे त्यापेक्षा आपलेकडून गुंता पडू नये धुलपाकडून पत्रे सरकारात व राजश्री बापू गोखले यास आली त्यात मजकूर आपले कडील कारकुनाचा गिला बहुत लिहिला होता त्याचे माणसाबरोबर राजश्री बापू साहेबांनी याणीहि पत्र पाठविले होते राजश्री वासुदेवपंत मामा याचे बंधू राजापुरास आहेत व तिकडील माहितगारी मशारनिल्हेस आहे त्यावरून धुलपाकडील पत्रे आली त्याचा व आपली पत्रे आली त्याचा मार समजून घ्यावा म्हणोन महाराजासमक्ष बापूनी मामास सांगितले त्यावरून आजपावेतो इस्तकबल ता मार तेथे होऊन लिहून आला तो सविस्तर मामास सांगितला त्यावरून त्यार्ची खातरजमा जाली व त्याणी बापूची खातरजमा केली त्यावरून बापूचेहि मनात धुलपाचे करणे असंगत वाटले परंतु देशकाल एक प्रकारचा धुलप याजपासी हली लोकाचा जमा(व) आहे व लढवई सामानाचीहि तरतुद केली आहे त्यापेक्षा एकोपा करून घ्यावा आणि त्याचे जंबुरे व चोपदाराची काठी आणिली आहे ती परत द्यावी [ अपूर्ण* ]

---

ले. २१. } ३२ श्री { श. इ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत स्वामी गोसावी यांसी—

सेवक लक्ष्मवा व हणमंत गौडा बहादुर देसाई परगणे गुतल व सरकार बसवापटण वगैरे माहालानिहाये कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम जाणोन स्वानंद लेखन करून मन प्रमोधविले पाहिजे विशेष प्रस्तुत स्वामियाचे आगमन किले बंकापुरास जाहले ते सुवार्ता ऐकून परम संतोष पावलो आपण छत्रभूत होऊन आले उपरांतिक सर्वत्राम धीर भरवसा आहे अमित्राचे लेक फौजसुद्धा येऊन आमचे अगडी गाव दग्याने मारून निराश केलेचे पत्री लिहिल्याअन्वये राजश्री नरसिंगराव धायगुडे व राजश्री आपाजीपंत यानी फौजेसह चारी पाच कोसात होते काही धाशत करविले तरी बरे होती त्याणीहि अगडी मारून सवेच निघून गेला त्यावरी आता फौज तोफ व बार सर्वहि साहित्य सिद्ध करून चौकडून पाळत आणऊन दगे करावे म्हणोन बैसले करिता रयत लोक घाबिरा होऊन चौकडे फुटाफूट जाहले लावणी समग्र राहून गेली श्रीमंत स्वामीनी हा प्रांतचे साभिमान स्वकीये समजोन कृपापूर्वक रखवालीस फौज नेहमी सवणुरात ठेविले आहे यैलीकडे राा उभयताचे र... जाहली सर्वापेक्षा आपले आगमन जाहलेच केवळ बळकट विना दुसरे विचार नाही आपणास श्रीमंत स्वामींच प्रत्यामनये समजिलेस पुढे दक्षिणच उपद्रव न लागता राज्य स्वस्थ होऊन निश्चिंत राहे व बेहबुद्ध ...... येश प्रचये करणेस अभिज्ञ असा हे संस्थान पूर्वीपासोन श्रीमंत स्वामीचे पदरचा

असोन आज्ञानुसार वर्तत येतो स्वामींनी पूर्ण ममता ठेऊन कृतोपकार घडऊन कीर्ती घेणेस सकल भार कमीलचे असता पत्री विशेष उपचार लिहिणे काये .असे सदैव पत्री तोषविले पाहिजे अजि सोमवार दुसरे प्रहरास हावनूर वगैरे स्थळचे बातमी आणि अमित्राचे लेक फौज व प्यादे तोफा जमा करून आठ दिवसाचे बेगमी रोटी वगैरे करून मासूर जवळी मुकदकवीस येऊन उतरले आमचे स्थळावरी लक्ष ठेऊन दगा करणेमधे आहे म्हणोन तेथून आप्त परिचित लोक हलीरकारास सांगून पाठविलेवरून त्याणी लिहिले आहे आजी कोठे येऊन उतरतात की त्याचा भंवसा नाहीं कटाक्ष फार आहे आपण छत्रभूत असणे सावतेच हिंमत जाणतो...येलीकडे फौज येऊन राहिले तरी शाब्दी होऊन अमित्रास सांदेश पडेल सर्वविशयी उपराळा पुरवणेचा भार स्वामींस मिळले आहे हे विनंति

---

ले. २२. रखर २७ मंगळ | २३ श्री | श. इ.

पैवस्ती छ २९ रबिलाखर

शेवेसी धोंडो विश्वनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २७ रबिलाखर भौमवार अस्तमान पावेतो मुकाम वाई येथे स्वामकृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे यानंतर रविवारी श्रीमंताची खाशा स्वारी मुकाम मजकुरी आली काल इंदुवारी मेणवलीस जाऊन दोन प्रहरची भोजने जाहल्यावर सायंकाली धोमास श्रींचे दर्शन घेऊन मणंवलीस रात्रौ भोजने करून आले आज तीर्थविध करून उपोषण केले उदईक सौम्यवारी श्राद्ध होईल वरकड विशेष ल्याहावे असे नाही दस्तकावर सिके अद्यापी जाले नाहीत विनंती येक दोन वेल केली कळले पाहिजे पाा आकोल्यापैकी गाव राजश्री नाना ओटी याजकडे आहे ते आपल्याकडे करून घेतो अडूर वगैरे माहालचे बोलणे मी बोललो परंतु वोक याचे आम्हासी बोलणे बहुत जाले त्यामुळे तो नाद सोडला बिमरित्ती कोठे वगैरेयाच्या सोडचिठ्या द्यावयाच्या ठरल्या पाा डचईची वरात तेथे वैशाका अखेरची त्रिंबकजी कडून येईल त्यास ऐवज देण्याविसी राजश्री रामचंद्रपंत यास आज्ञा जाली पाहिजे दातार याजकडे ऐवज आहे त्यास सिका मोडण्याची सोय जाल्यास मोडावा नाहीतर चांदवड ऐवज आपले सिलकेस असल्यास तूर्त देवावा सिक्याचे व्याज सध्या येते चांदवड उगाच सिलक ठेऊन सिक्याचे व्याज कमी होते जसे ठीक दिसेल तसी आज्ञा व्हावी आठच्यार मुकाम होतील असे वाटते आपले पत्र यावे व श्रीमंत सौभाग्यवती जानकीबाई अन्नपूर्णाबाई यांचेहि पत्र व मुलाच्या पुस्त्या व पत्र यावे आपले पत्रात प्रकृतीचा मजकूर आणोन आणिक गोड मजकूर यावा राा गंगाधरपंत यास आपले वगैरे पत्रे यावी त्यातहि गोड मजकूर असावा शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

ले. २३. } ३४ { श.
सफर ८ } श्री { इ.

नकल

राजश्री कृष्णराव धुलप सुभेदार गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [ मो. जा.* ] राजश्री गंगाधर बाळकृष्ण रामराम विनंती येथील कुशल तागायत छ ८ सफर पो जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष किले विज्यदुर्ग येथील मामलत सरकारातून राजश्री रामचंद्रराव आणा नगरकर योजकडे आहे त्यास हली त्या प्रांती इंग्रजांकडील पलटणे येऊन सिलसिला लागला आहे त्यास सरकारची आज्ञा जाली आहे की जंजिरे विज्यदुर्ग येथिल बंदोबस्त आणांचे विच्यारे यथास्थित राखावा सरकारचा नक्ष राही: ते करावे बहूत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

---

ले. २४. } ३५ { श.
रखर १६ नंतर } श्री { इ.

राजश्री सयाजी जगथाप गोसावी यांस—

स्नेहांकित नारो बाबाजी आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष पेशजी सेतसनदी प्यादे गदग येथील असामी ९३ याची बेगमी छ १ रबिलाखर पावेतो करून पुढे छ १६ रबिलाखर पावेतो आगाव १५ रोजा बेगमी देऊन तुम्हास रवाना केले होते त्यास पोटाची बेगमी सरली याजकरितां चौदा रोजा पोटास देऊन पाठविला आहे त्याची सनद अलाहिदा आहे त्याप्रमाणें वर्तणूक करणे तुम्हास नाववाला नदीस पोहोचे तोपर्यंत जितके दिवस लागतील तितक्या रोजाचे पोटास देणे ज्याजती पोटास न देणे नावेकडील कामकाज जाहल्यानंतर बाकी ऐवज राहील तो व प्यादे ऐसे घेऊन सुभा येणे सुभा येई तोपर्यंत जितके दिवस लागतील तोपावेतो पोटास देणे कल्याटगीस जाणे म्हणोन सांगितले होते त्यास कल्याटगीस न जाणे सुभा येणे बहूत काये लिहिणे हे विनंति

---

ले. २५. } ३६ { श.
} श्री { इ.

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री फत्तेसिंग भोसले यासी

प्रति [ मो. जा* ] आशीर्वाद उपरी रा। गणेश माहादेव याकडे मौजे बोरगांव व सिरवल पा। अकलकोट हे दोनी गाव आहेत तेविसी तुम्हास लिहिले होतें त्यास तुम्हीं गणेश माहादेव याचे पत्रीं लिहिलें कीं गुदस्ता गाव खराब पडिले त्यास कौल

देउनू वसात कराविली आहे तुर्त सनद देता येत नाहीं येशास याचे चालवणे स्वामीस आगत्य येसे असता तुम्ही न चालवावे उचित नाही याउपरी येसी गोष्ट न करणे त्या गावचे सातसें रुपये यास देतो म्हणोन तुम्ही स्वामीचे पायावरी हात ठेविला आहे त्याप्रों सातसे रुा देणें नाही तरी गाव याचे स्वाधीन करणें [ नि* ] याच गाव दोन सुदामत-प्रमान चालवन नाहीतर तहाप्रमान यास पइका पावन याच आत्र अम्हास व वाडियात अहे व तुम्हासहि अहे हे जानतच अहा तर तहास अंत्राच न करन इ ट ल का म्हे [ !* ] निमित्त हे तुम्ही जानतच हा बहुत काय लिहिन असीरवाद

---

ले. २६. सफर ११ } ३७ श्री { श. इ.

नकल

राजश्री कृष्णराव धुलप सुभेदार गोसावी यास

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री गंगाधर बालकृष्ण रामराम विनंती येथील कुशल ताा छ ११ सफर जाणुन स्वकीय लिहित असावे विशेष किले विज्यदुर्ग राजश्री आणा नगरकर याजकडे आहे तेथे बंदोबस्ताविसी कारण लागल्यास आणाकडून तुम्हाकडे सूचना येईल त्याप्रमाणे लोकसुध्दा किले मजकुरी जाऊन आणा सांगतील त्याप्रमाणे बंदोबस्त यथास्थित राखावा म्हणोन आपणास लिहून पाठविण्याविसी श्रीमंत महाराजाची आज्ञा जाहली आहे त्याजवरून लिहिले आहे तर मारनिल्हेकडून पत्र येताच लोकसुद्धा आपण जातीने जाऊन किल्याचा बंदोबस्त यथास्थित राखावा कोणे गोष्टीविसी सरकारात बोभाटा येऊ देऊ नये आपले वडील परंपरागत सरकार-चाकरी सर्वोत्कृष्ट करीत आले आहेत त्याचे रक्षण करणे आपणाकडे आहे बहूत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

---

ले. २७. माघ शुद्ध १२ } ३८ श्री { श. इ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री आणा स्वामीचे सेवेसी

बालाजी लक्षुमण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा माघ सुाा १२ पावेतो मुकाम सोलापूर येथे आपले कृपाकटाक्षे करून येथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपण छ २९ रबिलौवलचे पत्र पाठविले ते पावले संतोष जाला विजयदुर्गास धुलपाचा व आम्हाकडील कारकुनाचा खटला वाढला समेटाचा प्रयत्न बहुत करीत आहे परंतु मिटत नाही याजविसी राजश्री कुशाबा नानास लिहिले आहे सविस्तर बोलतील त्याचा बंदोबस्त होऊन बइदा उठे असे करावे

म्हणोन लिहिले ते कलले त्यास धुलपाचा व बापु सोवनी याचा कलह विजयदुर्गास वाढला याचा मजकूर आपले पत्रावरून व कुशाबा नानाचे सांगितल्यावरून कलला व धुलपाकडील मजकूर त्याचे पत्रावरून कलला या दिवसात परशत्रूचे वेंध कोकणास किती आहे त्याचे बंदोबस्ताचे मनन करावे ते येकीकडे राहून घरातच कलह उत्पन्न होऊन घरचेच कलहामधी दिवस गुजरतात याचे आश्चीर्यं श्रीमंत महाराज करीत होते आसी गोष्ट आपलेकडून होऊ नये हली श्रीमंतानी आपणास पत्र लिहिले आहे व धुलपास पत्र लिहिले आहे आपण राजश्री बापूजी लक्ष्मण यास निक्षूण ल्याहावे की कलह अगदी वाढवू नये राजश्री राघोबादादा थथे यास विजयदुर्गास पाठवून उभयताचे वास्तविक मनन करून समजूत पाडोन कलह मोडावा असे जाले पाहिजे याजकरिता राघोबादादास पत्र लिहिले आहे आण त्याची रवानगी करून द्यावी या कामास येका क्षणाचा विलंब नसावा वरकड सविस्तर राजश्री कुशाबा नाना लिहितील त्याजवरून कलेल बहूत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

राजश्री धोंडोपंतदादा स्वामीचे सेवेसी साष्टांग नमस्कार विनंती उपरी आपण बंद भरून पत्र पाठविले ते पावले अक्षरशा मजकूर समजला सालमजकुरी आमची ग्रहदशा काय वाकडी असेल त्याचा अंत लागत नाही सर्वासी स्नेह मेलविला तितक्यासी विरोध यावा आणि त्याच घोरांत काल घालवावा असा दिवस प्राप्त आहे आपणाकडे कोणेविसी दोष नाही परंतु कर्नाटक प्रांतीचे मामलतीचे समक्ष सरकारचे आपले बोलण्यात आले की मामलतीची घालमेल जाली असता मागील बाकी बुडती यांजकरिता मामलत कायेम ठेवावी साल मजकूर बिन आहुत पैका देतो व मागील बाकी उगऊन घेऊन ठाणी अवलसाली हवाली करतो असे बोलण्यात सचित आल्यावरून तगिरी पाहून बापली(?) जाली हा मजकूर सचित मनात भरला याजकरिता बाकी राहिली असेल ती द्यावी म्हणजे कोणते खटले नाही याजमुले आम्हाकडूनच हा उद्योग नवा सरकारात वाकडे कोणतेहि नाही यास्तव आपण सरकारावरी दोष न ठेविता आम्हास फौजेची अडचण जाणोन रुपा करून पैका द्यावयाची संजल काढण्याविसी राजश्री कुशाबा नानास ल्याहावे सारा वेंधा ठेविला आहे सविस्तर कुशाबानाना लिहितील त्यावरून कलेल बहूत काय लिहा लोभ करावा हे विनंती

---

| | | |
|---|---|---|
| ले. २८. जिल्हेज १० भानु | ३९ श्री पैवस्ती छ १९ जिल्हेज | शा. इ. |

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री धोंडोपंत स्वामी

सेवक रामचंद्रराव माहादेव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणे विशेष श्रीमंत महाराज राजश्री यजमान स्वामीचा कूच इंदुवारी पंचमीस होणार माहाडावरून स्वारी येणार तेथे गेल्यावर रायगडासहि जावे असा विच्यार

आहे परंतु मुकामी गेल्यावर काय ठरेल ते पाहावे आम्ही परभारे येणार होतो परंतु आज्ञा जाली की महाडास येक मुकाम आहे तेथे तुम्ही येऊन भेटावे तेथून पुण्यास बरोबरच जाऊ त्या बेताने आम्हीहि येऊन मकरसंक्रातीचे दिवसी येजमानास तील तुमचे व मुलाचे व घरातील प्रविष्ट केले मर्जी बहुत प्रसन्न आहे आम्हास नेसावयास दोन धोतर-जोडे कोरे महेश्वरी दिल्हे गुदस्ताचे रवानगीचा ऐवज तोा रतनगड पोा द्यावयाचा त्यापोा आज्ञा जाली की आडीच हजार रुपये खाजगीकडे द्यावे व अडीच हजार रुपये वस्त! करावयास घरात थतेलीस(?) देणे म्हणोन आज्ञा जाली दोन तीन नेचे करवावे म्हणोन आज्ञा जाली आहे त्यास कारेगर चागला असेल त्याचा ठिकाण लाऊन ठेवावा म्हणजे स्वारी आल्यावर काम करावयास लाऊ घरात दागिने करावयास रुपये दिल्हे तेन्हा धाकटीच्याहि गोष्टी निघाल्या होत्या ती काय म्हणेल त्याप्रमाणे व्याख्या चाल्या होत्या सागुरणाचे शेहावर सरकारचा मुकाम होणार त्यास तुम्ही तेथे यावे आम्हाकडील मकरसंक्रमणाचे तील देवास व घरचे भिक्षुक मंडलीस व मुलास व बायकास व तुम्ही कारकून मडळी सर्वास देऊन तुम्ही भक्षावे वो राजश्री देवराव भाऊ यास आलादा पत्र पाठविले आहे ते व तील प्रविष्ट करावे ग्रहस्त मंडलीची याद आलादा लिहून पाठविली आहे त्याप्रमाणे तील तुम्ही प्रविष्ट केलेच असतील नसिले केले तर हली प्रविष्ट करावे नेच्यास जस्ताची ता(र) लागते त्यास कारेगर बोलाऊन तार काढवावी भुजपत्र पाहिजे त्यास पुण्यास मिळत असल्यास उतम नाहीतर कल्यानास लिहून ममईहून आणवावे रवाना छ १० जिल्हेज भानुवार अस्तमान कल्याणचे हमाचा ऐवज सरकारात द्यावयाचा होता तो माघपर्यंत जमेस केला पुणियास स्वारी आल्यावर पोता भरणा करावयाचा डबईचाहि ऐवज स्वारी पुणियास आल्यावर मागतील यास्तव सिद्धता असावी बहुत काय लिहिणे हे विनंती.

---

| | | |
|---|---|---|
| ले. २९. जिलकाद १८ | ४० श्री | श. इ. |

सेवेसी विनंती सेवक येशवंतराव माहादेव साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १८ जिलकाद पावेतो स्वामीचे रुपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे यानंतर छ ८ जिलकादचे आज्ञापत्र सादर जाहले तेथे आज्ञा कीं तुम्हावर संरजाम-पटीची वरात जाहली आहे त्यास सदरहु वरातेप्रमाणे ऐवजाचा फडशा करून सरकारातुन कारकून व गाडदी आसामी पंचवीस रवाना केले आहेत तरी याजबरोबर हुजूर येणे म्हणोन आज्ञा त्यास संरजामपट्टीचा वगैरे ऐवज भाद्रपदमासी सरकारात घेतला व फत्तेसिंगराव मान्ये याणी कान्हुरी राऊत पाठऊन पंचवीस हजार रुपये खंडणी घेतली येविसी जोरव्याचे मुकामी राजश्री माधवराव पोतनीस यास विनंती करण्याविसी पत्र

पाठविले त्याणी विनंती केली पुढे खासा होळकर याची स्वारी पुण्यास येता कान्हूरगाव दरोबस्त घरसुद्धा खाणोन वस्तानी व गुरेढोरे सर्व लुटून नेले व गावचे पुढे डोंगरावर पळोन गेले तेथे स्वार जाऊन वस्त्राहरण करून गरती बायकादेखील नेल्या वडिलोपार्जित सरकार चाकरी करून घरेदारे प्रपंच केला तो सर्वस्वी हरण होऊन आंन्नास वजिन जाहालो यावेगल पुण्यातील घर खाणोन लुटून नेले व खंडहि घेतला व नगर दौलताबाद येथील व माहालची वगैरे फाजिले सरकारात येणे व साठ हजार रुपये कर्ज म्हणोन घेतले हे सर्व स्वामीस श्रुत आहे पुढे मुलामाणसास आन्न आछादन पोहोचोन प्राण धारण होऊन स्वामी चरणाची शेवा घेऊ ते करणार स्वाम आहेत कान्हूर गाव तैनातीत लाऊन दिल्हा तेथील सात आठ वर्षे पैसा नाही हली तरी अमलादाखलच सिंदे याजकडील व्यव्हार चालला आहे असा चौहुकडून ईश्वरी क्षोम शरीरप्रकृतीनेहि हैराण आहे घरात फिरण्याची शक्ती नाही कारकून गाडदी पाठविले आहेत याजबरोबर हुजूर येणे म्हणोन आज्ञा त्यास मी चिठीचा चाकर मजला उजूर नाही परंतु शरीरसामर्थ्य नाही यामुळे निरूपाय आहे शरीरप्रकृती बरी जाली म्हणजे सेवेसी येतो स्वामीचरणासिवाय त्राता दुसरे कोण्ही नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

ले. ३०. } ४१ श्री { श. इ.

विज्ञापना ऐसि जे इंग्रजाची पलटणे हली वाई प्रांती जमली आहेत साताऱ्याचा किला गेल्याचे वर्तमान आहे व अवचितगड गेला म्हणोन वार्ता आहे तालुक्याचे जमाखर्चाच्या यादी सत्वर याव्या महाराजाचीहि आज्ञा जाली आहे रा॥ बाळोबाबाचा कडून रा॥ राघोपंत थथे किल्याचे चौकसीस गेले आहेत त्यास किले विजयदुर्ग व अंजनवेल येथे जातील त्यास आपलेकडून गुंता नसावा सरकारातुनहि त्यास चौकसीची आज्ञा आहे त्याविसी मजकूर पेशजी लिहून पाठविला आहेच हली प्रसंग त्या प्रांती गडबडीचा आहे बहूत सावधपणे राहिले पाहिजे व स्थळाचाहि बंदोबस्त चांगला राखण्याविसी ताकीद जाली पाहिजे श्रुत होय हे विज्ञापना रा॥ बाळाबाबाचा याणी आपल्यास पत्र पाठविले आहे पावेल हे विज्ञापना

---

ले. ३१. } ४२ श्री { श.
साबान २५ } { इ.

पैवस्ती छ २७ साबान मु॥ गोकाक

श्रीमंत राजश्री सुभेदार स्वामीचे सेवेसी

पोष्य बापूजी वामन कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता॥ छ २५ साबान मिनहू येथास्थित असे विशेष राजश्री धनसिंग जमातदार या प्रांतांत बहूत दिवस

राहतात राजश्री येसोजीपंत आपानी ठेविले होते यापूर्वी राजश्री विसाजी कृष्ण यानी वालेगावात होते हुजरातीमध्यें सुमेरसिंग गाडदी आहेत त्याचे मेहुणे या प्रांतात लौकिक याचा चांगला आहे चाकरी केलेले आहेत याजकडील गाडदी चांगले आहेत आपले खातरेस आल्यास जामीन घेऊन ठेवावे उपयोगी आहेत आम्हाजवळहि चाकरीस आहेत हिकडील माहितगार आहेत आपल्याबराबरहि माहितगार या प्रांतातील आहेत तेंहि सांगतील मर्जीस आल्यास ठेवावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना राऊतहि याचे चांगले करोले आहेत [ मो. जा.* ] पाहोन सामान चांगले असिल्यास मन लागल्यास ठेवावे उपयोगी पडतील वालचे आहेत कलावे हे विज्ञापना

---

ले. ३२. जिल्हेज ४ } ४३ श्री { श. इ.

विज्ञापना ताा छ ४ माहे जिल्हेज पावेतो वर्तमान यथास्थित असे यानंतर स्वामींनी पत्रे पाठविली ती रविवारी तिसरे प्रहरी पावली लिहिला मजकूर कळला श्रीमंत राो यजमान स्वामीची स्वारी वांईस जाणार आम्हास बराबर गेले पाहिजे त्यास कान्हुरी तटे आहेत ती सरंजामसुद्धा पाठऊन देणे व मेखा राहुटीच्या व घोड्याच्या व आंबाडीची चऱ्हाटे वगैरे रवाना करणे स्वारीचा कूच बुधवारी होणार तरी तटे मंगळवारी तिसरा प्रहरपर्यंत येऊन पोहोचत अशी रवाना करणे असी आज्ञा त्यास तटे रास

१ काश्या
१ सारंगा
१ नवा खरेदी कुमईत खोलपा किंमत रुा ४५ पंचेतालिसास घेतला आहे तटू तरणाच आहे निभावेल मजबूद आहे

---
३

सदरहू तटे तीन वल्या व खोगरे वगैरे सरंजाम नवा आहे तटाचा सरंजाम बदलू नये येविसी ताकीद असावी कलम १

आंबाडीची चऱ्हाटे हात सुमार २७५ येकूण आंबाडी वजन ८८५ शेर पक्के येकूण किंमत ॥ रु.

धाकटा मोनाच्या तटू राो राघोपंत याणी येथे आणून ठेविला आणि येथा तटू येथें होता तो घेऊन गेले त्यास तटू पाठीस लागला होता तो महिनाभर बांधून ठेविला पाठ थोडीसी बरी व्हावयाची राहिली आहे याजमुले पाठविला नाही कलम १

तीळ केली ८। तीन पायली पाठविले आहेत किंमत मागाहून लिहून पाठऊ कलम १

मेखा बाभळीच्या सुमार
६५ राहुटीच्या
७५ घोड्यांच्या

---
१४०

येणेप्रमाणे पाठविले आहेत कलम ०
तयार होत्या त्या पाठविल्या आहेत

सदरहू लिहिल्यावरून कलेल तटावर राजगिरा पाठवावा तर तटे निकडीने जावयाची मेखाचे वगैरे ओझे जास्त राजगिरा पाठविला नाही तटास मार्गी चंदी केली तीन पायली व वैरणीस खर्चास रुपया १ दिल्हा आहे जमाखर्च करून ध्यावयास आज्ञा करावी सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

| | | |
|---|---|---|
| ले. ३३. साबान ४ | ४४ श्री | श. इ. |

विज्ञापना ता। छ ४ साबान पावेतो वर्तमान येथास्थित असे यानंतर राजश्री दौलतराव शिंदे याची स्वारी जामगावी शनिवारी पहाटे उज्याडता रविवारी येऊन दाखल जाली इकडे दंगा बहूत आहे नवरत्न घोडा बसावयासी टेविला वाघीण घोडी व जानोची शिंगी व कोल्हाटणीची शिंगी ऐशी दोन्ही घोडी राजूरास समागमे पदू खास बा[र]दार व खंडोजी घुले देऊन पा। आहेत पुढे इकडील दंगा निवारल्यावर मागती आणावयासी येतील पदूस जिवाजी येशवंत याचे लष्करात काही कामकाजाकरिता पा। आहे त्यास आठचार रोज अधीक लागतील हे विज्ञापना

---

## ३ चास–जोशी

| | | |
|---|---|---|
| ले. १. जवार श. ३८५ मार्गशीर्ष [शु.*] ५ | ४५ सिका नकल | श. १६५० मार्गशीर्ष शु ५ इ. १७२८ नोव्हेंबर २४ |

राजआज्ञा राजश्री विक्रम पतंग[रा*] व राजे प्रांत जवार सा। ३८५ वर्षे ल्याहावया कारणे राजश्री कृष्णाजी महादेऊ जोसी याही हाजूर येऊन अर्ज केला की पेशजी मा। घाटानिहाय जकातीकडे दर बैली रुके ३ तीन दिल्हे ते खर्चास पुरत नाही म्हणोन बराया अर्ज मंजुर केला तो अर्ज खातरेस आणून राजे मेहेर होऊन मा। घाटानी जकातीकडे सरपाटिलकीचे वतन नूतन करून दिल्हे असे चितपसील येणेप्रा।

| | | |
|---|---|---|
| १ घाट गोचे | १ मा। गौरापूर चैत्रा मेट | १ घाट तल तथर्डी ( ताथर्डी ? ) |
| १ मा। देहेज चैत्रा | १ मा। कोहज | १ घाट हार |
| १ घाट चोडा | १ घाट मालसेज | फगाले ( बस्फगाले ? ) |

येकूण प्रांत मजकुराकडील माहाल घाट ९ येथील नूतन सरपाटिलकीचे वतन रुसूम करून दिल्हे असे ते हिसे येणेप्रा। घाट गोचे दर बैली टका ॥। आर्धा मा। देहजे रुपयास टका १ यक मा। गेरापूर चैत्रामेट टका ॥। प्रो। प्रत टका रुपयास ॥॥। पाऊण प्रत टका रुपयास ॥। आर्धा व प्रत टका रुपयास

·।· पाव येणेप्रो व मा। कोहोज रुपयास टका १ येक व घाट तल थर्डी रुपयास टका ·।।। पाऊण घाट बोर घाट फगाले दर रुपयास टका १ बाकी सरकार टके तीन व घाट चोडा टके येणे प्रो प्रत टके रुपयास ·।। अर्धा व प्रत टका ·।।। पाऊण प्रत टका ·।· पाव येणेप्रो व घाट मालसेज टके येणेप्रो दर रुपयास टका पाव व रुके ३ टका अर्धा येणेप्रो प्रांत मजकुराचे जकातीकडे ठिकाणे ९ व (म्हणजे नव) सरकारातुन दिल्हे असे यासिवाय मोकासे देहे प्राणे कोहज देहे २ व काणे पाऊलचोरे देहे १।। येकूण साडेतीन गाव दिल्हे असे

मौजे खरिवली देहे १ व पाडे सुमार ३ कुलबाब कुलकानू १ आपटी १ टकली १ खुर्टी

मौजे हांबरापूर व मालपाडा कुलबाबन कुलकानू मौजे आंबडे देह १ निम कुळबाब कुलकानू

मौ अमरभुई देहे १ कुल बाब कुल कानू

येकूण जकातीकडे मा। घाट नऊ व माकासे गांव मौजे खरीवली व हांबरापूर माल पाडा व मौजे आवडे निमे व मौजे अमरभुई येकूण साडे तीन गांव कुलबाब कुलकानू दिल्हे असे यांस सरकारातोन तुम्हापासोन ३००१ येक साली नजर तीन हजार येक रुपाया घेऊन वतन नूतन सरपाटिलकी व गाव लेकराचे लेकरी अवलादी अफलादी असे आनभव घेऊन सुखी असने पुढे मागे वौशात हिल्ला हरकत करील त्यास श्रीसदानंदाची शपत असे येणेप्रो खुदखत सनद करून दिल्ही असे नकल माहाली देऊन असल फिरोन घेणे [ पुढील मजकूर गिचमिडीमुळे कळत नाही* ]

बार मजमू रुजू सुरनीस

---

| | | |
|---|---|---|
| ले. २.<br>श. १६५८ आषाढ अखेर | ४६<br>श्री | श. १६५८ आषाढ वद्य ३०<br>इ. १७३६ जुलै २७ |

हिसेब राजश्री रुस्णराव माहादेव कर्ज निा राजश्री सदासिवभट पटवर्धन सुहूर सन सबा—

रुपये

२२२४८    १९७०५    यैन मुदल शके १६५६

१०००० खत श्रावण शुा १ दर सदे ·।। प्रा व्याज

९७०५ खत रु. २०००० पैकी हिसेब रुजू होऊन बाा पौष शुा १ व्याज दर सदे ·।।·॥ (?)

रुपये

१९७०५

२५४३ व्याज

१२३३ खत रुा १०००० ह्मा श्रावण
शुा १ शके १६५६ ता अखेर
आषाढ शके १६५८
२४ मुा रुपये
॥५ अधिक रोज २०

२४॥५ दरसदे ॥० प्रा येकूण रुपये
१४१८॥= खत दाहाहजार पैकी पौष शुा १
शके १६५६ ता अखेर आशाढ
शके १६५८ मुद्दती
१९ रुपये
॥० अधिकाचे रोज १५

१९॥
दरसदे ॥॥० प्रा येकूण

२६५१॥=
वजा सूट २२०॥= बाकी रुपये
यैन —— २४३१
व्याजास व्याज १२२। रुपये
७३ प्रा १२३३
बारमाही
४९। रुा ८७३
जोडयाही (?)

१२२।०
वजा सूट १०। बाकी रुपये

२५४३

२२२४८

११ यैवज गुा अंताजी दादाजी
सालगुा वा रुपये २२११ पैकी
हुंडिया उतरून घेतले रुपये
११०० हुंडी सातारेबराबर
सिवबा ब्राह्मण
६०० ५००
११०० रोख पोता जमा
वैशाख मास शके १६५७

२२००

सदरहूचा जमाखर्च-पोता तपसीलवार असे बाकीचे

जमा रुपये

१५०० हस्ते सदाशिव गोविंद वैशाख शुा ९ शके १६५८

१००० बाळाभट मोघे वैशाख वा १० शके १६५८

३००० हस्ते दादो नरहरी जागीर नासीक पैकी शके १६५६ फालगुन मास रुपये

२७७५९

वा (१) पावला कृष्णरावजीस रुपये

३००० पौष वद्य शके १६५६ देणे बाबूजी नाईक कर्जदादन राजश्री पंतप्रधान बारा हजार पैकी रुपये

२०० हुंडी सातारांची वैशाख वा शके १६५७

३०० शके १६५७ श्रावण वा १३ धर्म सिवरामभट्ट चित्राव

३४ वरात संतावा बारामा मार्गस्वर वा १ शके १६५७

५०० मार्गस्वर वा १ लशकरास जाता त्रिंबक सिवदेऊ यापासून घेऊन चिठी दिली शके १६५७

५००० मार्गस्वर वा १२ रामाजी मल्हार यापासून घेतले आणि प्रधानपंतास दिल्हे त्याचा मुचदला शके १६५७ रुपये

२५०० अस्वीन वा ८ शके १६५७ कर्जदादन पंत प्रधान देणे धापूजी मेघशाम रुपये

११५ शके १६५६ ताट रुप्याचे भार ११५

४७। वरात विसाजी भिकाजी कापड माघ वा शके १६५६

५००० वैशाख शुा १ देणे रामाजी मल्हार यापासून दक्षणा द्यावयासी आणिला ऐवज त्याचा मुचदला शके १६५८ रुा

६३३ खरीदी तूप शके १६५८

५७५ ता गणचा मुंजी चईत्र शुा ७

५८ जुनरास लागवेगाचे मेजवानी वैशाख वा जोडी १

६३३

११०० का मागील हिसेब मजुरा दिल्हे रुपये

४०० कार्तिक वा १४ शके १६५६

७०० आषाढ वा १४ शके १६५८

११००

३२९॥= शेके १६५८ आषाढ असेर

१३१८= खरीदीपत्रक देणे गोसावी रुपये ०३५

वजा जकाती कोलवणचे बाकीकडे रु. २०३॥~

१९८॥ ता सदासिव ब्राह्मण सौ बगुबाई रद कर्ज वोवालणी

१४८॥ मोहरा १२ दर १२।= यते

५० रोख

१९८॥

१८७५८।॥=

० खरीदी कापड शके १६५८

८५९।≡ मुंजीस जकुमुचा ( ! ) रु

४७। आहेर चिमाजी आपा तो माधवराऊ सालगुा यास

१७॥= तिवटे २

२७।= पातळ १

२। खण १

४७।

२७।= आहेर पंतप्रधान श्रा ग्रा १३ शके १६५७ रुपये

२६॥ सेला १

॥= खण जरी १

२७।=

४०। फालगुन वा शके १६५६

३७ पासोडी दादो हरीस १

३। धोत्रजोडा माधवराऊ जंगी

४०।

३७॥= वैशाखमास शके १६५७ सवाई बाबूराव
२८॥ पासोडी १
९४= तिवट १

३७॥=

५३ शालाजोडी देणे हरभट कासीकर कार्तिक वा १४ शके १६५७

१०५४॥= सदरहू पनगर (?) मुजरा देणे सबब हाली वजा रुपये.

५८८ व्याज बा हिसेच अलाहिदा देणे दीक्षिताचे मितीचे रु.

४ हस्ते बालाजी महादेऊ भाडे व्रतबंधाचेसमईचे रु॥

३०० चिठी राघो दामोदर पौस सुध ६ शके १६५७ लशकरातुन माघारे येतां खर्चास घेतले अणी हुजविली (?) रु.

१०० आषाढ वा ५ शके १६५८ पो जमा रुपये

२११४॥= आषाढ वा ८ रद कर्ज बाबूजी नाईक जोसी शके १६५८ माधवराऊ गोविंद याणी लशकरात रु॥ घेतले होते ते दिल्हे रु.

२००० मुदल
१११४॥= व्याज दर २

२११४॥=

३०० शके १६५८ आषाढ वा ९ खरीदी मोते गु॥ खरगसिंग जोहरी रु. ५०८॥ पैकी विठलपंतावर चिठी ॥॥ बाकी २०८ येवज देविले रुपये

२५०० अशाढ वा ११ शके १६५८ रदकर्ज लक्ष्मण विस्वनाथ मार्गेस्वर मासी प्रधानपंताचे भरणियासी घेतले ते हली दिल्हे रु॥
२००० चैन मुदल रु.
५०० देणे बंदात दिल्हे (?)

२५००

२४६६५॥॰

३०९३॥ बाकी येवज येणे कृष्णराऊ यांचा नि॥ सदासिव भट रु

१०००० का येवज आषाढ शु १४ पंत प्रधान याकडून सवतस (?) हजार रु॥ आले त्या येवजी पैकी दिल्हे शके १६५८ रु॥

१३०९३॥

पैकी सला इजारा जकाती कोलवण बा। पैकी परभारा वसूल अला हुजाा व कर्जे रुा ६००।॥·

पैकी गैर मुजरा वजा केले रुा २५० येन इजारिया पैकी बाकी

१०० मनोती

६७॥ बटा दर सदे १ प्रा

१५ गोविंदभट जोगलेकर रुा ३०० पैकी

४३२॥

बाकी फाजील वसूल अला.म्हणून मुजरा देणे रुा १६८।

बाकी सदाशिवभटाकडे येवज येणें ता। अखेर आषाढ रुपये १२९२५।·

बारा हजार नव शत सवा पंचवीस रास असे

---

ले. ३ } ४७ { श.
सफर २ } श्री { इ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कृष्णराव माहादेव स्वामी गोसावी यांसि

पो सदासीव चिमणाजी नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले लिहीला मजकूर सविस्तर कलला ऐशास येविसीचे उत्तर तीर्थरूपानी लिहिले आहे त्याजवरून कलेल [नि*] जाणिजे छ २ सफर [नि*] बहुत काये लिहिणे हे विनंति

---

ले. ४ } ४८ { श.
} श्री { इ.

तीर्थस्वरूप मातुश्री मामी वडिलास सा।

आपल्ये रघुनाथ दिक्षित मनोहर कृतानेक सा। नमस्कार विनंति आपण श्रीसोमेश्वरची शाळुंका पाशाण पूर्वी कोणत्या खाणीवर काढून घडविला त्यास आम्हासहि पाशाण महादेव घडवावयास पाहिजे त्यास येथून बहिरजी वाडकर पा। आहे आपल्या तेथून खाणीचा वाकफकार व पाथरवट देऊन खाण दाखवावयाची आज्ञा केली पाहिजे मग पाषाण काढून घडऊ यास्तव आपणास लि। आसे [नि*] तरी खाण दाखवावयास माणूस देऊन दाखवावयाची आज्ञा करावी बहुत काय लिहिणे हे विनंति

---

| | | |
|---|---|---|
| ले. ५. हि. १२३१ सफर २९ मंगल | ४९ नकल | श. १७३७ माघ शुद्ध १ इ. १८१६ जानेवारी ३० |

आखबार श्रीमंत प्रधान माहे सफर सन १२३१ हिजरी... वर्तमान रात्रीचे संध्या करून दिवानखान्यात बसले भिकाजीपंत वाघ व आपाजीपंत आगासे व विनायेक चिंतामण वगैरे हाजर होते मोठे कुटुंब बाईसाहेब पुन्यास आहेत त्यानी पत्र व तीळाची थयेली हालकारे समागमे पाठविले ते हालकान्याने रोबकार गुजरोन पत्र वाचून हालकारेस पचवीस रुपये इनाम दिला बापू गोकल्याचे पत्रे आली की सिंदि बाहादराकडून च्यार हाती वगैरे सरंजाम पुन्यास आला ते पत्र दरयाफ्त करून फरालास गेले फराल करून साहा घटका रात्री बावरचीखान्याचा सरंजाम गोहागरापासून दीड कोसावर पाहाड आहे तेथे भोजनाचे तयारीकरिता पाठविलेवरी विसालगडकर पंतप्रतिनिधि यानी तिलाच्या थयेल्या व आरजी पाठविली होती ते वकिलानी गुजरानले पत्र वाचून दरजवाब लिहून दिला नंतर बरखास होऊन आराम केला

छ २६ रोज शनवार मुकाम गोहागर प्राथकाली उठून स्नानसंध्या देवपूजा दाहा घटका करून राघोपंत सागिर्द यास दुशाला देऊन समुद्रस्नानास आले वीस मोहरा व तीस रुपये आंत पुरऊन आघोली करून पूज्या करून स्वार होऊन किनारे किनारे सेयेर करीत पहाडावर भोजनास गेले भोजन करून स्वार जाले रसत्यांत पिस्तमजीसेट याचा सलाम जाला हावेलीस येऊन आराम केला मागील सा [ घटका* ] दिवस राहता उठून मुकाम पुन्याकडील नेमून भोजनखर्चाचा ऐवज पुढील मुकामाचा लोकाचे स्वाधीन केले पइला मुकाम छ २९ मंगलवारी चिपलोनास त्याचे खर्चाचे रुपये दोन (हजा,र धोडो[पंत (कृष्णास)] दिले व चिपलोनाहून बारा कोस पालगड तेथील मुकामचे रुपये राघोपंत वोखास दिले व पालगडापासून पांच कोस ×× वन तेथले मुकामाचे रुपये जनार्दन भट व भाऊ (महाजन) भट व कटवनापासून आपटेचे मुकामचे रुपये वामनराव आपटे यास दिल्हे आयेसे मुकाम नेमून आस्तमानी उठून संधेस गेले रामचंद्र गोसावी संधेस हाजर होते संध्या करून दिवानखान्यांत बसले महाजनकीचे वतन हजार रुपयास विकत घेतले म्हनून विठ्ठलराव परचुरे (?) यास बोलावून सागितले की या वतनाचे सनदेवर देशमूख व देशपाडे वगैरे वतनदाराची ग्वाही करून घेने नतर कृष्णराव कारकनवीस पिस्तमजी कडील यासी येक घटका बोलून बापू गोडबोले व आपाजी आगासे व विनायक चितामण वगैरे खाजगी मुतसदी यानी जमाखर्च दाखविले ते पाहून फरा[ला*]स गेले फराल करून आराम केला

छ २७ आदितवार मुकाम मजकूर प्राथकाली उठून स्नानसंध्या देवपूजा दाहा घटका करून समुद्रस्नानास आले वीस मोहरा व तीस रुपये आत पुरवून आघोली करून पुज्या करून हावेलीस आले दरषश्राद्धाचे सात ब्राह्मण जेऊ घालून दाहा दाहा रुपये दक्षेणा देऊन आपन भोजन करून दिवानखान्यात आले कागद पाहात बासले रामचंद्र

गोसावी बरयाब होऊन...कार आला येक घटका बसून आस्तमानी उठून सन्धेस गेले गोसावी मजकुरासही सध्या करावयास आंत नेले व गोसावी सध्या करून घरास गेले व आपनहि दिवानखान्यांत बसले

ता। छ २७ वामनराव हजर होते पा ...चा विपर्यी बोलने जाले व दोनसे स्वार...बर(तरफ) करविले नंतर भिकाजी वाघ व बापू गोडबोले व आपाजी आगासे व विनायेक चिंतामण व दाजीबा जोसी यासी मामलत प्रकर्णी बोलनें होऊन उठून फरालास गेले फराल करून आराम केला

छ २८ सोमवार प्रातःकाली उठून स्नानसध्या देवपूजा दाहा घटका करून दिवानखान्यात बसले बालाजी लक्षुमन व आन्याबा मेंदल्याचा नमस्कार जाला मेंदल्यानीं बालाजीपंतास जामीन सरकारांत दिले पंत मजकुरानी जामीनकतबा लिऊन दिला यावर हजार रुपये मेंदल्यास लग्नाकरतां इनायत करून सांगितले कीं गाहोगरास राहून लग्न करून यावे राघोभट कासीकर यास बारासे रुपये लग्नाकरिता दिल्हे. उपरातिक देवरसीचे चवघे पुत्रास चाकर ठेवून जनोबा देशपांडे यास सागितले की याचे ताबेदारीत आसावे नतर समुद्रस्नानास आले वीस मोहरा तीस रुपये आत पुरऊन आघोल करून पूज्या करून हावेलीस आले सरकारचा पाहेरेकरी याने समुद्रा[तील] मोहोरा काहडून घेतल्या ते दुसऱ्याने श्रीमंतास सागितले त्याजवरून त्यास पाहाऱ्यात ठेवले नतर स्वार होऊन पाहाडावर भोजनास गेले भोजन करून स्वार होऊन हावेलीस येऊन दिवानखान्यात बसले वामनराव व जनोबा देशपाडे व भिकाजी वाघ वगैरे याजजवल XXX बदोबस्ती करिता सागितले की उदईक कूच आहे बदोबस्त करने व फरासखाना चिपलोनास रवाना करावा ऐसे सागून आराम (करून) मागील सा घटका दिवस राहाता [उठून] बसले मोर दिक्षीत व रामचंद्र गोसावी व देशपाडे व बालाजी लक्षुमण सर्वत्राचा नमस्कार जाला आस्तमान पावेतो दरबार करून उठून सधेस गेले सध्या करून बसले खासगी मुतसदी यानी कागदपत्र दाखविले पाहून उठून फरालास गेले फराल करून आराम केला

छ २९ मगलवार प्राथकाली कूचाची नवबत करून स्नानसध्या देवपूजा दाहा घटका करून पाहेरेकरी यास आजनवेलीचे किल्यास पो। नतर भोजन करून दिवानखान्यात बसले धोंडोपत जोसी मामलतदार आंजनवेली यानी पोशाक नजर केला पाहून दोन प्रहरा कूच पुन्याकडे करून स्वार जाले शंभर रुपये रामजी हुजऱ्यास कर्जाऊ दिल्हे रसत्यात सर्वांचा सलाम जाला चिपलोनापासून कोसावर गाव आहे कृष्णभटानी ज्याफत केली तेथे उतरून भोजन करून च्यारसे रुपये सिका देऊन तेथून स्वार होऊन चिपलोनचे मुकामी बारा घटका रात्री दाखल वाडियांत जाले नंतर आराम केला

ले. ६. ५० शा.
श्री इ.

यादी स्मरणार्थ

१ माहादाजीपंतास देवआज्ञा श्रीकासीमध्यें जाली ते समई समागमे मातुश्री सिऊबाई व कृष्णराव होते तेथून अले तेव्हा रामचंद्र महादेव दुखणाईत होते त्यास तीचौ वर्षांनी मृत्ये पावले त्याजवर कल्याणचा सुभा चार वर्षे कृष्णराव आपानी केला तेथून सुभा टाकल्यावर चासेस आले कुटुंबसुधा आले मातुश्री सिऊबाई लोहगडास होती चासेस येत जात असे हेही येत जात उपरी अपा औरंगाबादेस [ गेल्यावर ] मातुश्री सिऊबाई रामचंद्रपंत [ वारल्यावर ] दाहाबारा वर्षे वर्तमान होती नंतर बरे वाटेनासे जाले ऐसे कलल्यावर रखमाबाई तेथे गेली उपरी सिऊबाईस देवआज्ञा जाली अपा औरंगाबादेहून आले त्याजवर तीचौ महिनियानी नारो रामचंद्र याची वाटणी जाली ते समई गृहस्त

१ भिकाजी नारायेण भानू
१ शंकरराव पाटणकर
१ गोविंदभट जोगलेकर
१ मोरो गोपाल गोले
१ नारो त्रिंबक सोमण
५

सिवाये आणिखीहि होते परंतु स्मरणात नाहींत.

सदरहू वाटणीस वर्षे आजमासे ३६।३७

१ रामचंद्रपंत वारले ते समई नारोपंत दिढा वर्षाचे होते ते मातुश्री सिऊबाईस देवआज्ञा होईतोपावेतो बाईजवल च होते लग्न बाईनीच केले. बाई मेली ते समई पंधरा सतरा वर्षांचे नारोपंत होते

१ महादाजीपंताची प्रथम स्त्री गोविंदभट कर्वे कवाडकर याची बहीण दुसरी स्त्री सिऊबाई गोऱ्यांची कन्या

१ माहादाजीपंत बालाजीपंतास सुरनिसीवर ठेऊन इकडे आले कुंभारलीस उदीम करून होते ते मोगलाने धरून नेले तेथे खंड घेतला मकाजी ठाकूर नासिककर याचे वगैरे सावकाराचे कर्ज घेऊन दिल्हे ते समई महादाजीपंत व आणखी येक दोघे बालाजीपंताकडे गेले होते तेथे यैवज मागितला त्यास मशारनिलेनी साफ उत्तर केले कीं आम्हाजवल काही नाही तुम्ही मिलविले तेहि नको व गमाविले हेही नको तेव्हां पंतानी दोन तीन उपास केले आणि उठोन इकडे आले त्यावर सिऊबाईची क्रिया बालाजीपंतानी केली ते समई वाटे नारोपंताचे व अपाचे जाले मागे येक वेल मातुश्री सिऊबाईसी व आपासी बालाजीपंत बोलले पुणियामध्ये कीं आम्हांस वाटा देणे त्याजवर मातुश्रींनी उत्तर केले कीं तुजला वाटा मागावयासी प्रयोजन नाहीं तुम्हाजवलून

घरधणी आले तेच समई तुमचे आमचे तुटलें खंड पडला तो तुम्ही दिला नाहीं तुमचा आमचा कांहीं राहिला नाहीं ते समई ग्रहस्त

१ विठलभट जोगलेकर
१ त्रिंबक गणेश पिंपलखरे
१ रामजोसी नेरेकर
―
३

अणखी दाहापाच ग्रहस्त होते ते समई रावसाहेबास वर्तमान कलले त्याणीहीं सांगितले की वास्यासी तुमचा संबध नाही तेव्हा मारानिले बोलिले की आम्हास खावयासी पाहिजे त्यावर राव बोलिले कीं आम्हाजवल मागावे त्यावर दोन गाव इनाम व धर्मादाव गावगना रुा १ येणे प्रा करून दिल्हे येणेप्रो वर्तमान स्मरण जाले तें सांगितले. रावसाहेबानी गांव इनाम व धर्मादाव करून दिल्हे त्याजवर काही कोण्हीं बोलले नाही चिरंजीव मोरोबा दरबारात[गेले] होते × × × × × नाहीत अलीकडें मोरोबा गेल्यापासून मेघश्यामपंत मात्र बोलू लागले येणे प्रो वर्तमान

---

ले. ७. } / ५१ श्री { श. इ.

[ चासकर दप्तर ]

यादी दास्त खर्ते झाडा उगवावयाची

रुा

| | | |
|---|---|---|
| वसूल | १००० | माहादेवभट फाटक |
| वसूल | १००० | चिमणाजी सिधोरे |
| वसूल | ५० | राणोजी तनपुरा बिबवीकर |
| वसूल | ५३०० | केशवभट करवे |
| वसूल | २२८५ | भगवंत भैरव |
| वसूल | ५००० | विठल जोसी |
| वसूल | २४५० | शंकराजी नाा आठवले |
| वसूल १३६१ | १५२५ | बाळंभट वझे |
| | ७०० | रामभट वझे खत ८०० पैकीं मातुश्रीनें वसूल घेतला रु. १०० |
| वसूल | २००० | मोरो कृष्ण |
| वसूल | १००० | मोरो गोपाल |
| वेणूबाईस दिले | २००० | बाबूजी नाा ओंकार |
| कुसाबाईस दिले | २००० | विसाजी भिकाजी |
| नजर केली | १३००० | श्रीमंत राजश्री पंतप्रधान खर्ते २ |
| | ३९३१० | |

ले. ८. ५२ श.
श्री इ.

यादी दास्त ता राजश्री नारो रामचंद्र याजकडे रुपये

७००० गला दास्तानें पा। खवली व माहागांव व सिलटणें व ठाकवे व अवढे बा। याददास्त

१२०० खुर्दा अजमासे रु॥

२००० गंधक व सिसे खरेदीपैकीं

१०२००

---

ले. ९. ५३ श.
श्री इ.

नगोटी नि॥ राजश्री नारो रामचंद्र सोने रुपे येकून किमत रु॥

| सोने येकून रु॥ | रुपे येकून रु॥ |
| --- | --- |
| ३६० वेला नागमोडी जोडा लाहन १ वजन σσ१ | १२० सासल्या जोड १ σσσ५ |
| | १५० तार्टे २ |
| ७२० वेला साध्या जोडा वजन σσ२ | १०० थाल्या २ |
| २५ गल्याच्या पुतल्या ५ | २४ घुंगुर जोडे १ |
| १८० वाघनख सासली वजन σσ॥· | ३६ वाट्या ३ |
| ४० मणगट्या σσσ२ | १० तबकड्या २ |
| १२० गोप लाहन σσ१२ | ५० संपुस्ट जोडा १ |
| ९० कंठी बारीक मणी वजन σσ।· | ६ पळी |
| ७॥ हुली σσσ॥· | ८ हलकारती २ |
| १५ मोटले σσσ१ | ६ आरघ्या |
| ७५ पवित्रकें १० σσσ५ | ५० तला जोड १ |
| १०५ जोडवी २ येक वजन σσ।१ | ५० थाली १ |
| ६३० आंगठ्या येकूण रु॥ | ५० संपुश्ट पात्रें २ |
| ४०० हिऱ्याच्या ४ | ५० वाट्या २ |
| १५० माणकाच्या ३ | ६ पळी १ |
| २५ पन्हा १ | १०० तबक १ |

२५ चुणी १
३० रामनामी २
६३० ११
६० गोमगलाची एक
१५ लड कंठ्याची गल्याची १
६० पोहची जाळागिरी(?) १
१०० पदक एक
३० वाल्याचा जोड १
१५ रामनामी आंगठी येक १
३६ पुतल्या ९
५ आंगठी फुलाची १
१८० बाजुबंदाच्या पेट्या ००॥०
१५ वाल्याचें सूत
४ होन १
३० दुलडीचे मणी व पेट्या ०००२
४ आंगठी लाहन बाललेणें १
१८० कडी जोडा लहान १ ००॥
१० रेजगी पुडी १
१० चुपी(?) पुडी १
७२० बाकी जोडा १००२
३६० गोठ सुमार २ ००१
१९४४ पुतळ्या सुमार ४८६ दर ४
६३ मोहरा ४॥०
४ होन १
७५ आगठ्या ५
२०० पदक १
३० तानवडी १०००२
१५ कुड़िी ०००१
१००० मोत्यें चार ४
३६४० माला येकूण रुा ३६० चंद्रहार सात पदरी ००१ ३६० सासली तिपदरी ००१
३६० सासली दुपदरी ००१

२५ संद कुकाची
५ संद तबकीर
२५ ताटली १
१३ नक्त रु॥
२ रुप्याचे रज पुडी १
३ वाले तांबे रुपें
८८९

तेरीज
९१७२॥ नग सोनें
८८९ नग रुपे
१००६१॥

१०० कंठा पाचपदरी ८८११
१०० कंठी रुद्राक्षाची १
३६० कंठ्या ३८८१

१६४०    ८

९१७२॥

या खेरीज नगोटी नारोपंताचे आंगावरील त्याचे स्त्रीचे आंगावरील आलाहिदा आसन

साखली तीनपदरी १
मोत्याची जोडी कानची बाळाची १
कडी हातची जोडा १
पाटल्या जडीत १
वाकी जोडा १
तानवडे जडीत बाल्यासमेत मोर्त्ये जोडी ३
कडी आयानत (!) पैकी हाती घातली जोड १
कि॥ जोड नवा दिल्हा १ कुड्याचा
सला जोड गोपाचे वजा रुप्याचा १

---

ले. १०. } ५४ श्री { श. इ.

याददास्त नेमणूक खा॥ पैकी ऐवज रुपये

८००० मातुश्री ताई
५००० मातुश्री वेणूबाई
५००० सौभाग्यवती कुसाबाई
२००० सजूबाई
१०००० मातुश्रींचे गयावर्जनास

३००००

१८५०० श्रीमंत् राजश्री पंतप्रधान
    ३५०० हती
    २००० पोहची हिऱ्याची
    १३००० खते २

    १८५००

४८५००

# ४. पुणें–जोगळेकर

५५

ले. १. } श्री { श. १७२६ चैत्र शुद्ध २
सु. (१) २०४ जिल्काद ३० } { इ. १८०४ मार्च १३

यादी दामोदर जोसी नासी(क)कर आश्रीत श्रीकाश्मीरीलिंगाकडे पुजेस आहेत त्याची दक्षणा सरकारांत येणे राहिली ती

१८१५ हा छ १४ जमादीलाखर सन सबा तिसैन मार्गशीर्ष वा १ ता छ २८ रजब सन इसने मयातेन कार्तीक वा ३० पावेतो मुा माहे ६१८१५ पौ. वजा येकूण तीसे रो ३० बाकी माहे ६०८१५ येकूण दररोज रुपया येक प्रो.

३० माहे रमजान पौषमास सन इसने मया तेन

५३१ हा छ १ जमादिलाखर आश्वीन मास सन सलास मयातेन ता ३० जिलकाद फालगुन मास सन आर्बा मयातेन माहे १८ पैकी वजा येकूणतिसे रोज ८९ बाकी माहे १७८२१ येकूण दररोज रुपया १ प्रो.

२३७६

---

ले. २. } ५६ { श. १७३६ पौष वद्य १२
सु. १२१५ सफर २५ } श्री { इ. १८१५ फेब्रुवारी ६

आसल बा नकल

राजश्री विनायक धोंडदेव गोसावी यांसी

सुा समस आशर मयातैन व अलफ तुम्हाकडे पो उमरखेड येथील मामलत होती तेथील साल गुा सन आर्बा आशर मयातैनचे रसदेचा पोते चालीचे बट्यासुधा ऐवज सरकारांत पावयाचा करार केला त्यापो बदल देणे ब्राह्मण यांस वर्षासने हा सन समान मयातैन तागाईत साल गुा सन आर्बा आशर मयातैन पावेतो सात साला रुा

३५० वो विश्वनाथभट उर्फ बाळंभट बिन बाबुभट बापट कासीकर यांस दरसाल रु. ५० प्रो रु

८४० वो बाळदीक्षित केळकर यांस दरसाल रु
११०
१० कापड आस
१२०
सातसाला

७० वाो विश्वनाथभट लेले यास दरसाल कापड आख ५० प्राो
सातसाला आख ३५० दर रुपयास आख ५ प्राो नख्त रु

१४०० वाो केशवभट जोगलेकर यांस दरसाल रु. २०० प्राो रु

७०० वाो परशरामभट जोगलेकर यांस दरसाल रु. १०० प्राो रु

२५२० वाो विनायकभट साठे यांस दरसाल रु. ३६० प्राो रु

१५०५ वाो विठल दीक्षित खरे पर्वतीकर यास दरसाल रु

२०० ऐननख्त

१५ कापड आख ७५ दर रुपयास आख ५ प्राो नख्त रु

२१५

७ सात साला

११६ वाो चिंतामण दीक्षित दाते यास दरसाल कापड आख ८३ प्राो सातसालाचे
आख ५८१ दर रुपायास आख ५ प्राो नख्त रु

१८९० वाो विनायकभट पाटणकर वांईकर पुराणिक यास कापडाचे नख्त सुध्धा
सात साला प्राो.

९३९१

येकूण नऊ हजार तीनसे चेक्याणव रुपये देविले असेत तरी पावते करून पावलि-
याचे कबज घेणे जाणिजे छ २५ सफर मोर्तब

सदरहु वराते प्राो ११६ येकसे सोळा रु. चादवड भरून पावलो हस्ताक्षर चिंतामण दिाा दाते मिाा मार

सदरहू वराते प्राो रु. ७० सतर भरून पावलो हस्ताक्षर रामचंद्र भट लेले मिाा मार

---

ले. ३.
सु. [१२]१६

५७
श्री

श. १७३७
इ. १८१५–१६

आर्बा समानीन शके १७०५ शोभाकृत नाम संवत्छरे माहे सवाल छ २१ रोज गणेशभट जोगलेकर यास धर्मादाय सालाबाा रुपये २०० पावत होते ते मारनिलेचे पुत्र केशवभट जोगलेकर यास वर्षासन कैलासवासी रावसाहेब सवाई माधवराव याचे कारकीर्दीत करून दिल्हे ते रावसाहेब आसतां सलास तिसैन पावेतो पावले पुढे बाजीराव-साहेब यांचे कारकिर्दीत मागील भोगवटा मनास आणून सन आर्बा तिसैन शके १७१५ पासून सन सीत आशर पावेतो पावले शके १७३७

[ पाठीवरील मजकूर* ]

केशवभट जोगलेकर याचे तीर्थरूप गणेशभट जोगलेकर यास धर्मादाव दोनसें रुपये पावत होते त्यास धाकटे राव याचे कारकीर्दीत छ २१ सवाल सन आर्बा समानीनात धर्मादाव दूर करून वर्षासन करून दिल्हे पुढे आर्बा तिसैनापासून गणेशभट याचे पुत्र केशवभट यास पावत आले त्याप्रो बाजीरावसाहेब याणी सन सीत अशर पावेतो दिल्हे

---

ले. ४. मु. १२३७ }
फ. १२४६ }

५८
श्री

{ श. १७५९ चैत्र वद्य १२
{ इ. १८३७ मे १

नकल

अर्जी समस्त ब्राह्मण वर्षासनदार जिल्हा पुणे सुहुा सचा सलासीन मयातैन व अलफ सन १२४६ फसली ल्याहावयासी कारण ऐसीजे सरकारातून जाहिरनामा ता। ३० माहे नवंबर सन १८३५ इसवीचा लागला आहे त्यातील पाचवे कलमात ताह्यात पेनसीन व परंपराचे वर्षासन धर्मादाय ज्यास आहे त्याणी वर्षांत येक वेळ कलकटर साहेब अगर असिष्टण साहेब याजपासी हजर व्हावे अप्रेल महिन्यांत म्हणोन हासील मजकूर आहे त्याजवरून हाली आम्ही १८३७ ईसवींत हजर व्हावयास आलों आहो तरी......

ता। २७ माहे अप्रेल सन

१ केशवभट बिन गणेशभट जोगलेकर वा। पेठ शनवार घर खाजगत

१ रामचंद्रभट बिन धोंडभट लेले वा। पेठ शनवार

१ धोंडभट बिन विश्वनाथभट लेले वा। पेठ शनिवार

१ बापुभट बिन चितामणभट लेले थेऊरकर वा। पेठ शुक्रवार

१ गणजोसी बिन जनार्दन जोसी निवेलीकर

१ मोरभट बिन निलकंठभट जामखेडकर

१ बाल दिक्षीत बिन चितामण दिक्षीत दाते वा। का। खेड

१ नारायणभट बिन विठलभट फडके का। इंदापूर वा। पुणे

२ वीरेस्वरभट बिन कासीनाथभट जोगलेकर व जनार्दनभट बिन मोरभट जोगलेकर

१ नारायणभट बिन विठलभट फडके का। इदापूर

या प्रो मा। ची अर्जी लिहून मेहेरबान गोलइस्मटसाहेब बाहादूर याजकडे पुणे मुकामी हजर जाहालो परतु आमची नावे रुजू केली नाही व हुकु[ म ]ही दिला नाही

च्यार पाच रोज गारपिरास खेपा घालतो हाली आप्रेल महिनाहि आखेर जाहाला सबब साइबास जाहीर व्हावया करिता आर्ज लिहीला आहे तर मेहेरबानी करून आम्हास काय तो हुकूम यावा ता १ माहे मे सन १८३७ ईसवी

---

ले. ५. '५९ श्री
श. १७५९ कार्तिक व ११
इ. १८३७ नोव्हेंबर २३

याप्रो पावती देऊन ही नकल स्मरणार्थ ठेविली असे

सरकार कुंपणी इंग्रज बहादूर विा प्रनसिपाल कलेक्टर सुभा पुणे

पावती बो केशवभट बिन गणेशभट जोगलेकर... पुणे पेठ शनवार सुा समान सलासीन मयातैन अलफ आम्हास सरकारातुन सालीना रु. २०० वर्षासन बाा पावत आहे त्याप्रो सन १२४५ फसली पावेतो पावले सन १२४६ फसली बाा घेणे ते हाली हुजूर जामदारखान्यातुन रोख रु २०० दोनसे दिल्हे ते आम्ही खुद भरून पावलो ताा २३ माहे नवंबर सन १८३७ द्याा हस्ताक्षर आबाजी रामचंद्र आठवले

सई केशवभट बिन गणेशभट जोगलेकर दाा खुद

---

ले. ६. ६० नकल
श. १८०३ आषाढ वद्य ४
इ. १८८१ जुलई १५

मेहेरबान कलेकटर साहेब बाहादुर जिल्हा पुणे याजकडुन सन १२६० फसलीची पोलिटिक्याल देवस्थान वर्षासन वगैरेबद्दल यादी आली त्यात वर्षासन सदरात ताहायतीचे पेट्यात १९२ रु. केशवभट बिन गणेशभट जोगलेकर याचे नावाने दाखल आहे सदरहुबद्दल इसम मजकूर याची कैफियत घेणे ती

सुरु तारीख ३१ माहे ज्यानेवारी सन १८६० ईसम मजकूर खुद केशवभट बिन गणेशभट जोगलेकर हे हजर जाल्यावरून त्याचे म्हणे रुबरु आहे ते खाली लिहिल्याप्रमाणे

१ आमचे नाव केशवभट आमचे बापाचे नाव गणेशभट अज्याचे नाव बालंभट आडनाव जोगलेकर जात कोकणस्त ब्राम्हण कसब भिक्षुकी उमर वर्षे अजमासे ७७

२ आमचा जन्म शहर पुणे तालुके हवेली येथे जाहला आमचे मूळ वतनाची जागा मौजे हेदवी तालुके अंजणवेल जिल्हा रत्नागिरी हाली राहाण्याची ठिकाण शहर पुणे तालुके हवेली जिल्हा पुणे

३ आम्हास हुजूर खजिना जिल्हा पुणे येथून वर्षासन दरसाल रुपये कपणी १९२ मिळावयाचे आहेत. ते आम्हाकडे वंशपरंपरा चालावयाचे आहेत

४ सदरहु वर्षासन मूळ पेशवाईत आमचे वडील गणेशभट विन बालंभट यास भाऊसाहेब पेशवे याचे कारकिर्दीत मिळाले असो कोणी कोणते साली दिल्हे ते आम्हास माहीत नाही. परंतु शभर वर्षे अजमासे जाली असावीत असे ऐकून माहीत आहे

५ सदरहु वर्षासन मूळ आमचे वडील गणेशभट विन बालंभट हे थोर विद्वान सिवाय कुटुंबवत्छल याज करिता कुटुंबाचे पोषणार्थ दिल्हे आहे काही कामाकरिता दिल्हे नाही सबब काम वगैरे करावयाचे नाही

६ सदरहु वर्षासन मूळ गणेशभट विन बालंभट जोगलेकर यास मिळाले आसोन ते आमचे तीर्थरूप होतात.

७ ज्या दिवशी माजी अमल दूर जाला त्या दिवसी म्हणजे सन १२२७ फसली साली सदरहु वर्षासनाचा पैसा आम्ही खुद घेतला आहे. ते आम्ही मूळ संपादकाचे मुलगे आहोत.

८ सदरहु वर्षासन मिळाले दिवसापासून इंग्रजी अमल सुरु हाइतोपरियत सदरहु वर्षासन जप्त वगैरे कारणाने बंद वगैरे कधी दिकत जाली नवती.

९ इंग्रजी अमल सन १२२७ फसली साली बसला त्या दिवसापासून अज परियंन सदरहु वर्षासनाचा पैसा आज परियंत घेत आहो कधी बंद वगैरे जाला नाही.

१० इंग्रजी अमल सन २२२७ फसली सालास जाहला त्या दिवसापासून अज परियत सदरहु वर्षासन आम्हीच आज परियत घेत आहो.

११ सदरहु वर लिहिलेला मजकूर खरा करण्यास आम्हाजवल-पुरावा अहे तो

१ कलेकटर साहेब बाहादुर सुभा पुणे याचा हुकूम आमचे नावे नंबर ४ तारीख छ २९ सपटंबर सन १८१९ चा असल

• लग ——————————————————

यकूण येक कागद पुराव्यास दिला आहे यासीवाये आम्हापासी सदरहुबदल पुराव्याचे कागदपत्र वगैरे नसोन साक्षी व पुरावणी मजकूर द्यावयाचा नाही

१२ सदरहु वर्षासनात आमचेशिवाये दुसरे कोणा भावाचा हीसा नाही

१३ सदरहु वर्षासन संपादन करणार याचे अज्यापासून वौशावल इनाम कमीशनर याचे नमुन्या प्रमाणे हजर केली आहे-ती खाली लिहील्याप्रमाणे

१ सदरहु वंशावलीत यक मनुष्यास येकाहून जाजती मुले नसल्यामुळे-वडील-असी अक्षरे लिहीली नसोन वशावलीत दाखल जाले मूळ पुरुषापासून १।२।३।४।५ या अनुक्रमाने अंक घातले आहेत.

२ सदरहु वंशावलीतील जे इसम माजी अमलात म्हणजे इंग्रजी अमल होण्या-पूर्वी मयत जाले आहेत त्याचे साल माहीत नसल्यामुळे त्याचे नावाचे चौकटीत ( * ) या प्रमाणे फुलीची खूण केली आहे त्याजवरून समजावे

३ सदरहु वंशावलीत इंग्रजी अमलात कोणी मेले नाहीत

४ सदरहु दुसरे कलमातील इसम किती वर्षांचे उमरीचे मयत जाले ते माहीत नसल्यामुळे लिहीले नाही

५ जे इसम हाली जिवंत आहेत त्याचे नावालगत चौकटीतच कायम असी आक्षरे लिहून त्याची उमर किती वर्षाची आहे हे चौकटीलगत लिहिले आहे

६ सदरहु वंशावलीत दत्तक वगैरे नाही येणेप्रमाणे तपसील सदरहु वंशावलीत लिहून दिल्हा आहे.

१४ माजी अमलात सदरहु वर्षासनाचा पैसा चांदवड चलणी मिलत होता व हाल आमलातही कुंपणी रुपये चालू होई परियत चांदवड चलणीच मिलत होते कंपणी रुपये चालु जाल्यावर शेकडा ४ रु प्रमाणे बटा वजा होऊन बाकी कपणी तिसरे कलमात लिहील्या प्रमाणे रुपये १९२ पावत आहेत

१५ सदरहु वर्षासन मूळ चांदवड रुपये २०० मिळाले असोन हाली त्याचे बटा वजा होऊन कपणी रुपये १९२ पावत आहेत व आमचे तीर्थरूप गणेशभट बिन बाळंभट यास पेशवे सरकारचे कोठीतुन दररोज दोन पात्राचा सिधा तूप गूळ दाळ तादूळ वगैरे या प्रमाणे असोन तो सिधा यकदम महिन्याचा कोठीतून येत होता तो सिध्धा आमचे वडील मयत होई परियंत त्याजला मिलत होता. तो सिध्धा दररोज मेहूण सांगण्याबद्दल मिलत होता. ते मयत जाल्यावर आम्ही लाहान असल्यामुळे आमचे लग्न जाले नवते सबब आम्हाकडे चालला नसोन फक्त वर्षासन मात्र मिलत आहे

१६ सदरहू वर्षासन मिळाले दिवसापासून माजी अमल अखेर परियत पुण्याहून पेशवे याचे जामदारखान्यातुन मिलत होते पुढे हाल अमल जाल्यावर सदरहु वर्षासनाचा पैसा हुजूर खजीना जिल्हा पुणे येथून आज परियंत आम्हास पावत आहे

येणे प्रमाणे सवालाचे जबाब देण्यास आरंभ केला व पुरी केली

तारीख ३१ माहे ज्यानेवारी सन १८६० इसवी

दस्तुर पिलाजी गोविंद कारकून [सही जॉन...]

तपासनार हरी कृष्ण हुजूर कारकून

सही ता। १ फेब्रुवारी सन १८६०

सवाल

सदरी तुम्ही आकावे जबाबात पुराव्यास येक कागद दिल्हा त्याची नकल घेऊन असल कागदावर इंग्रजी नंबर ४२८६ व इनाम कमिशनर [ए] याच अक्षरीचा सिक्का करून तुम्हास परत दिल्हा असे तरी पावल्या बदल या खाली जबाब द्यावा

जबाब

सदरहू अम्ही दिल्हेला कागद आम्हास दिल्हा तो आम्ही घेऊन मरून पावलों तारीख १ माहे फेब्रुवारी सन १८६० इसवी

दस्तुर पिलाजी गोविंद कारकून ——————

सही केशवभट बिन गणेशभट जोगलेकर दस्तुर खुद

Signed before me at Poona on the 1st February 1860 signed Peter Dods Captain Acting Inam Commissioner...

नकल करणार चिंतामण माहादेव कारकून ता। १४ माहे जुलई सन १८८१ इसवी

अवनुपवार(?) विष्णु पांडुरंग कारकून गोविंदभट बिन गणेशभट जोगलेकर रा। पुणे पेठ शनवार याणी अर्ज तारीख ७ माहे जुलई सन १८८१ चा केल्या वरुन ही खरी नकल देण्यात आली आहे व ता। २० माहे डिसबर सन १८७८ च साली अन्वये रोख फी बा। १६८६ चक रुपाया साहा पै फी नोंदणी बुका २. नंबर ५५७ पानास जमा जाली आहे व कायद्यान्वये कोर्ट फी टिकट २ दोन रुपयाचे सदरहू नकलेस लावले आहे तारीख १५ माहे जुलई सन १८८१ इसवी

विष्णु पांडुरंग कारकून — त्रिंबक मोरेश्वर हुजूर कारकून

इंग्रजी सही यत. अ. कमिशनर — इंग्रजी सही कमिशनर मध्यभाग

---

## ५. सातारा—फडणीस

ले. १. मु.१२०१ — ६१ श्री — श. १७२२–२३ इ. १८००–१

याद़ी नक्षा जबानी राजश्री बालोजी कुंजीर सुा इहिदे मयातेन व अलफ

डौलाचे खर्चास ५ लक्षपर्यंत सरंजाम माहाल नेहमी लाऊन द्यावे कलम १

माहालची तहगीरी बाहाली हुजुरून होत असावी कलमे १

राजश्री चतुरसिंग राजे भोसले यांस भेटीस आणून नंतर त्याचे फौजेचा बंदोबस्त करून देऊन मातबर कामकाज मोहिमेचे सांगावे कलम १

स्वामींची व राजेश्री पंतप्रधान यांची भेट होऊन निखालसता जाली म्हणजे स्वामींची स्वारी शिकारी पंचक्रोशी होऊन वर अथवा साली मर्जीस येईल तेथे राहात जावे कलम १

डौलाचे व किल्याचे कामकाजास कारभारी राहील त्याणी स्वामींचे आज्ञे-प्रमाणे वर्तणूक करावी कलम १

डौलाचा खर्च कोणास! कमी अथवा जाजती करणे ते हुजूरचे आज्ञेने करीत जावे कलम १

लें. २.
सु. १२०१

६२
श्री

श. १७२२–२३
इ. १८००–०१

यादी निा राजश्री चतरसिंगराव राजे भोसले सुा इहिदे मयातेन व अलफ सरकारच्या सनदा पत्रे

१ माधवराव अनंत रास्ते यांस की हुजरातीकडील व राजश्री चतरसिंगराव राजे भोसले याजकडील मराठे व ब्राह्मण मंडली व सिलेदार व पायलोक याचे इनाम सरंजाम व वतन व घरे वगैरे तुम्ही जप्त करून यैवज घेतला त्याची मोकळीक करून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी जप्तीची मोकळीक करून देऊन यैवज घेतला असेल तो राजश्री चतरसिंग राजे भोसले याजकडील कारकुनाचे विद्यमाने माघारा देऊन कबज घेणे म्हणून पत्र

१ आबाजी माहादेव काळे यास की रामचंद्र चिंतामण देवस्थळी दिम्मत हुजरात याजकडील मौजे सासुवे सम्मत कोरेगांव प्रांत वाई व मौजे सुने ताा तारले प्रांत कराड येथील व निलकंठराव मोहिते याजकडील मौजे आरफल व गोवे येथील जप्ती तुम्हाकडे आहे त्याची मोकळीक करून हे पत्र तुम्हास सादर असे तर सदरहू गांवची मोकळीक करून ऐवज घेतला असेल तो राजश्री चतरसिंग राजे भोसले याजकडील कारकुनाचे विद्यमाने माघारा देऊन कबज घेणे व हुजरातीकडील व भोसले मशारनिले याजकडील लोकाची गुरे व घोडी आणिली असतील ती माघारे देणे म्हणोन

१ नारो बल्लाळ किले परळी यांस की हुजरातीकडील व राजश्री चतरसिंगराजे याजकडील चाकरमाने, राघोजी नाईक कदम व बाळूजी जाधव वगैरे याचे इनाम वतने व घरे तुम्ही जप्त करून ऐवज घेतला त्याची मोकळीक करून हे पत्र सादर. केले असे तर जप्तीची मोकळीक करून जाबाजरा राजश्री चत्रसिंग राजे भोसले याजकडील कारकुनाचे विद्यमाने माघारा देऊन कबज घेणे विहस्त लेकर (?) किला येक स(?) ठेविला आहे तो सोडून देणे म्हणोन

१ बाजी गणेश यास की वासुदेव बल्लाळ दिम्मत हुजरात याजकडील मौजे कलकाडी ताा देवळे तालुके रत्नागिरी हा गांव इनाम आहे तो व भवानराव शिर्के याजकडील मौजे डेरवणे ताा सावर्डे ताा अंजनवेल येथील खोती व मोकासा चवथाई व गुलाम महमद याजकडील मौजे परचुरे (?) ताा व वलेक (?) व मौजे गिलावी ताा मर (?) ताा अंजनवेल येथील मोकासा व खोती वगैरे हुजरातीकडील चाकरमाने याचे इनाम घरे तुम्ही जप्त करून यैवज घेतला त्याची मोकळीक करून हे पत्र तुम्हास सादर असे तर मोकळीक करून यैवज घेतला असेल तो राजश्री चतरसिंगराव राजे भोसले याचे कारकुनाचे विद्यमाने माघारा देऊन कबज घेणे म्हणून

१ कमाविसदार ताा अंजनवेल यांस की मौजे डेरवण ताा सावर्डे येथील खोती व चौथाई मोकासा राजश्री भवानराव शिर्के याजकडे आहे ताा मौजे परचुरे ताा मजकूर

येथील खोती व मौजे गिलावी ता मजकूर तालुके मजकूर येथील मोकासा गुलाम महंमद याजकडे आहे तो तुम्ही जप्त केला आहे त्याची मोकळीक करून हे पत्र सादर केले असे तर मोकळीक करून घेतला ऐवज माधारा देणे आणि पुन्हा येकंदर उपसर्ग न करणे म्हणोन

१ मोरो अनंत दिम्मत प्रतिनिधि यांस की हुजरातीकडील व राजश्री चतरसिंग राजे भोसले याजकडील भवानराव यादव देशमूख कर्यात औंद याचे वतन व घर वगैरे लोकाची जप्ती करून यैवज तुम्ही घेतला त्याजवरून हे पत्र सादर केले असे तर जप्तीची मोकळीक करून यैवज घेतला तो चतरसिंग राजे भोसले याचे कारकुनाचे विद्यमाने माघारे देऊन कब्ज घेणे म्हणोन

५ मोकदमानी देहाय यास की मौजे मजकूरची जप्ती मोकळी केली असे तर वसूल मशारनिलेकडे सुदामत देत जाणे म्हणोन

२ मौजे सासूवे समत कोरेगांव प्रांत वाई व मौजे तुने ता तारले प्रांत कराड येथील वसूल रामचंद्र चिंतामण याजकडे सुरलीत देत जाणे म्हणोन पत्रे

२ मौजे आरफल व मौजे गोवे येथील अमल निलकंठराव मोहिते याजकडे सुदामत देत जाणे म्हणोन पत्रे

१ मौजे मारूल प्रांत कराड येथील अमल नरसिंगराव गुजर याजकडे सुदामत देत जाणे म्हणून पत्र

५

१ किल्ले वंदन यांस की हुजरातीकडील व राजश्री चत्रसिंगराव राजे भोसले याजकडे मराठे व कारकून व चाकरमाने याजकडील सरंजाम वगैरे जप्त होते त्याची मोकळीक करून आलाहिदा पत्रे सादर आहेत त्या प्रमाणे मोकळीक करतील दिक्कत करील त्यास किलाहून ताकीद करून बंदोबस्त करून देणे व हैबतराव मोहिते याचे कुटुंब मौजे गोवे येथे आहे त्यास हरएकविसी उपसर्ग न करणे म्हणोन पत्र

१ सदाशीव [ मो. जा. ] किल्ले सातारा यास की, हुजरातचे मराठे व कारकून व आश्रीत व लोक याचे सरंजाम व इनाम व नेमणूक चालत आहेत त्यास तुम्ही किलाहून हरयेकविसी उपसर्ग न देता सुदामतप्रमाणे चालवणे व राजश्री चतरसिंगराव राजे भोसले व भवानराव शिर्के व लिंगोजी कसार यांची कुटुंबे किला आहेत ती खाली येऊन पूर्ववत्प्रमाणे राहातील त्याचा खर्चाचा वगैरे बंदोबस्त पेशजी चालत आहे त्याप्रमाणे चालवणे येविसी बोभाट येऊं न देणे म्हणोन

१ लक्ष्मण संकपाल आहीर याचे गांव मोकाशाचे वगैरे ता बामणोली येथील तुम्ही जप्त करून वसूल घेता त्याची मोकळीक केली असे तर वसूल घेतला असेल तो माघारा देऊन पुन्हा उपसर्ग न करणे म्हणोन वाकडे याचे नावे पत्र

१४ एकूण

ले. ३.
मु. १२०१

६३
श्री

श १७२२-२३
इ १८००-०१

यादी राजश्री चतुरसिंग राजे भोसले यांस फौजसुद्धा कामकाजास रवाना केले सुा इहिदे मयातेन व अलफ फौजेचे खर्चाचा बंदोबस्त——

लढाईत कामकाजास येईल त्यास बक्षीस व बालपर्वेसी योग्यतेनरूप करून देऊन चालविले पाहिजे कलम १

बहुमान सरकारातून

१ हत्ती
१ घोडा
१ कंठी
१ सिरपेच
१ तुरा
१ पोपाख सणगे

५

६

२ तरवार ढाल

८

समागमे मराठे व मानकरी आहेत त्याचा बंदोबस्त योग्यतेनरूप करून दिल्हा पाहिजे कलम १

तूर्त कामकाजाची नेमणूक जाली आहे. याचा बंदोबस्त जाल्यानंतर मुख्याचे हजार फौजेनिशी नेहमीचा + + + सरंजामास + + + कलम १

समागमे मानकरी आहेत त्यास पोपाख

१ नरसिंगराव गुजर
१ भवानराव राजे शिर्के
१ रघुनाथराव गुजर
१ भवानसिंग
१ केशवराव भोसले समशेर बहाद्दर
१ बाजीराव भोसले.
१ चिमणाजी राजे शिर्के
१ त्र्यंबकराव खानविलकर
१ हैबतराव जाधव
१ गोपाळराव
१ त्र्यंबकराव गोपाळ डबीर
१ चिटको कानो फडणीस

१२

१ कुसाजीराजे महाडिक

१३

ले. ४. } ६४ { श. १७२२-२३
सु. १२०१ } श्री श्रीसुद { इ. १८००-०१

तैनात जाबता चत्रसिंग राजे भोसले सिलेदार हुजरात जदीद स्वारी कोल्हापूर सुा इहिदे मयातेन व अलफ स्वार आसामी १५२१ पंधराशे येकवीस आसामी खाशा-खुद्दा यासी सालीना बोली रुपये

२२५०० खुद्द जातीस सालीना बोली नक्त आसामी येक यासी रुपये
१८०० जातसि खर्चास दरमाहा १५०० रुपये प्रमाणे बारमाही
९०० पालखीबदल दरमाहा ७५ रु प्रमाणे बारमाही
२४०० शागीर्द पेशाबद्दल दरमाहास रु २०० प्रमाणे बारमाही
१२०० हाती नग १ यासी सालीना दरमाहा रु १०० प्रमाणे
२२५००

३५७०० मानकरी खासे आसामी २० यासी सालीना बोली जातीस रुपये
३६०० नरसिंगराव गुजर यासी दरमाहा रु ३०० प्रमाणे बारमाही
२४०० जगदेवराव जाधव आसामी १ यासी सालीना दरमाहा रु २०० प्रमाणे
३००० भवानराव सिर्के यांसी दरमाहा रु २५० प्रमाणे बारमाही
३००० राजेश्वर लक्ष्मण दरमाहा रु. २५०
२४०० रघुनाथराव गुजर यांसी दरमाहा २०० रु प्रमाणे बारमाही
१८०० बाजीराव भोसले यांसी सालीना रु १८००
१५०० हैबतराव मोहिते यांसी दरमाहा १२५ रु प्रमाणे बारमाही
१५०० रंगराव मोहिते यांसी सालीना
१२०० लिंगोजी कासकर यांसी सालीना
१२०० गोपाळराव शामराव यांसी सालीना
१२०० चिटको कानदेव ( कान्हो ) यांसी सालीना १२००
१८०० व्यासराव गोपाल यांसी सालीना दरमाहा १५० रु
१८०० त्र्यंबकराव डबीर यांसी सालीना दरमाहा १५० रु
१५०० भवानराव यादव यांसी सालीना रु १५००
१८०० बापूराव पडणीस सालीना दरमाहा १५० प्रमाणे
१२०० कृष्णराव राम यांसी सालीना रु १२००
२४०० मालोजीराजे मुंगीकर यांसी सालीना रु.
१८०० तुकोजी रुपये
१२०० भगवंतराव महाडिक यांसी सालीना रुपये
१२०० दौलतराव सूर्यवंशी यासी सालीना रुपये
३५७०० २० आसामी

## ५. सातारा-फडणीस

| | |
|---|---|
| १०५००० | किता खासे आसामी १५० यांसी दर आसामीस सरासरी सालीना शेरा रु ७०० प्रमाणे सालीना |
| ३३७५०० | स्वार येकंदर १३५० आसामी यासी तैनात सालीना शेरा सरासरी २५० रु प्रमाणे सालीना रुपये |
| ६६०० | पालख्या खाशास आसामी ११ यांसी दर सालीना ६०० रुपये रुपये प्रमाणे |
| १९२०० | कारकून व दिवाण आसामी यांसी सालीना रुपये |
| | १२०० दिवाण आसामी १ यांसी सालीना दरमाहा २०० प्रमाणे |
| | १८००० कारकून दर शेकडा आसामी ४ प्रमाणे येकंदर आसामी ६० यांसी दर आसामीस सालीना तैनात रु ३०० प्रमाणे |
| | १९२०० |
| ५२६५०० | |

आसामी स्वार १५२१
शिवाय कारकून २१
१५४२

---

ले. ५.
सु. १२०२

६५

नकल श्री

श. १७२३-२४
इ. १८०१-२

यादी शिलेदार सुा इसने मयातैन व अलफ

२० स्वार फालकेकडील
- ८ विठ्ठलराव
- ६ हरीबा
- नारायणराव
- आरोबा
- सखोबा

१४

११ हैबतराव भोसले असामी
- ३ मुकुंदराव मुके
- ३ जिऊबा निकम
- २ मान्ये निा मुकुंदराव
- २ बडेखान
- १ सुलाजी माने

- २ नारूजी शिंदे
- २ सुलतानजी मोरे
- १ कादरखान
- १ आल्लीखान
- ५ पठाण असामी दाऊ भावे (?)
- ४ मोती भारती
- १ अवनी नाईक
- ३ भगवंतराव भोसले
- १ विठूजी भोसले
- २ विठूजी राजे भोसले
- २ राघोजी भोसले
- ३ आवजी कणसे आसामी ३
- १ सुलतानखान

---

| | | |
|---|---|---|
| ले. ६.<br>सु. १२०३ जखर ५ | ६६<br>श्री | श. १७२४ आश्विन शुद्ध ६<br>इ. १८०२ आक्टोबर ३ |

पो छ ५ जमादिलाखर सन सलास मयातेन आश्वीन मुा मरढे

विनंति उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कलला ऐसीयास तुम्हास संकेतपत्र खुणेचे यावे त्यास खाजगत हातचिठी येईल त्यास हातचिठीचे अक्षर लिहून पाठवितो व दुसरे पत्रहि त्या महस्थास उपद्रव होऊ नये म्हणून नावाची चिठ्ठी पाठवितो खुणेची चिठी पावल्याखेरीज कोणतेहि ठीक नाही येथून नाना प्रकारे संकेत येईल परंतु खरेपणा नाही बहुत काय लिहिणे हे विनंति लिहिल्या अन्वये करावे.

---

| | | |
|---|---|---|
| ले. ७.<br>सु. १२०३ जखर १७ | ६७<br>श्री नकल | श. १७२४ आश्विन वद्य ४<br>इ. १८०२ आक्टोबर १५ |

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्रराव गोसावी यासीं

[ मो.जा* ] स्नो यशवंतराव होळकर दंडवत विनाति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष आपल्याकडून राजश्री लक्ष्मण हरी आले याणी सर्व अर्थ सांगितले ऐसीयास आपण ज्यास अनुकूल आहा त्यासी इकडूनहि दुसरा अर्थ नाही तेव्हा सर्वांनी मिलोन स्वामीसेवा करून दाखवावी यात सर्वोपरी चांगले आहे इकडून कोणेविशी संशय मनांत न आणिता खात्रजमा राखून हमराहा असावे श्रीकृपेने उत्तम तेंच घडेल रवाना छ १७ जमादिलाखर सुरू सलास मयातेन व अलफ बहूत काय लिहिणे हे विनंती मोर्तब असे.

[ पत्रावर यशवंतरावाचा शिक्का आहे* ]

---

| | | |
|---|---|---|
| ले. ८.<br>सु. १२०३ आश्विन वद्य ५ शनि. | ६८<br>श्री | श. १७२४ आश्विन वद्य ५ नंतर<br>इ. १८०२ आक्टोबर १६ नंतर |

यादी राजश्री लक्ष्मण धोंडदेव सुा सलास मयातेन व अलफ राजश्री चत्रसिंग राजे याजकडून खातर जमेचा निश्चय आमचे येजमान श्रीमंत राजश्री बाजीराव याणी प्रतिबंधात ठेऊन आम्हावर कसाला चालविला आहे त्यात आमचे येजमानाचे चिरंजीव राजश्री बाळासाहेब यास बहुत विषाद जाहला आहे ऐसे असता आपण कृपा करून मेणोलीचे मुक्कामी आश्विन बा। ५ शनिवारी रात्रौ येऊन भेट घेऊन आमची व आमचे जमीयेतेचे लोकांची खातरजमा केली की माधवराव रास्ते यांचा व आमचा भाऊपणा ते प्रतिबंधान बलवंतराव मात्र बाहीर निघोन आले दौलतीचा बंदोबस्त

करून माधवराव याची वगैरे याची मुक्तता जाहाली पाहिजे येविसी तुम्ही व आम्ही येक विचारे फौज व सिबंदी कदीम आहे ती व नवीन जमा करून दौलतीचा बंदोबस्त करून बलवंतराव रास्ते याची भेट घेऊ ते व आम्ही व तुम्ही माधवराव याची मुक्तता होऊन भेट होई तो पर्यंत अकृत्रीम शपथ पुरस्कर येक विचारे प्रतरणा न करिता वर्तणूक करू त्याजवरून आम्ही विनंति केली की दौलतीचा भ्रम तुटला पदरी द्रव्य नाही आपण थोर कसे चालेल त्यास आपण आज्ञा केली की भाऊपणा घर आमचे मिळेल ते मेळऊन भाजी भाकरी तुम्ही आम्ही खाऊ परंतु अंतर द्यावयाचे नाही म्हणोन खातरजमा श्री कृष्णा व श्री शंभू महादेव व महाराज यांचे चरण स्मरोन आम्हास पदरात घेतले त्याप्रमाणे आकृत्रिम निभावणी करावी

---

| | | |
|---|---|---|
| ले. ९. सु. १२०३ जखर २० | ६९ श्री | श. १७२४ आश्विन वद्य ७ इ. १८०२ आक्टोबर १८ |

पौ छ १८ जमादिलाखर सन सलास मयातेन व अलफ मुक्काम परछदी

विनंति उपरी तुम्ही बाा द्वितीयेचे पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कलला तुम्ही राजश्री येशवंतराव याजकडे जाणार होता ते टाकून इकडे जाऊन तपसील लिहिता अपूर्व आहे राजश्री चतरसिंग यांचा मुक्काम मेणवलीस व्हावयाचा नाही येथील सिबंदीचा व त्यांचा संशय पडून खटला माजेल त्यानी आपले तिकडे माने यांजकडेच जावे हे चांगले ते चादकावर येताच येथे सिबंदीस संशय पडून खटलाच व्हावयाचे जाले त्यांनी तिकडे जावे हे बरें तुम्हीहि त्यास लिहून पाठवावे किल्ल्यानजीक यास्तव संशयाचे कारण करू नये येथूनहि त्यास सांगून पाठऊ तुम्ही येशवंतराव याजपासी जाऊन यजमानाची मुक्तता होय ते करावे रवाना छ २० जमादिलाखर लोभ करावा हे विनंति.

---

| | | |
|---|---|---|
| ले. १०. श. १७२४ सु. [१]२०३ जखर २९ | ७० श्री | श. १७२४ आश्विन वद्य ३० इ. १८०२ आक्टोबर २६ |

पौ छ ३० जमादिलाखर सन सलास मयातेन शके १७२४ मुक्काम कडेगांव

वडिलाचे सेवेसी चरणी मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना ताा छ २९ जमादिलाखर रोज मंगळवार प्रातःकाल जाणून वडिलांचे आसीर्वादे येथास्थित असे विशेष आपण चोतार्टीबारदार याजसमागमे पत्र पाठविले ते छ २७ रोज रविवार तृतीय प्रहरी प्रविष्ट जाले पत्री जे शिरोळ येथे राजेश्री नारायणराव माने याचे + + + कमेज (?) त्यासी ताकीद + + + सावा त्यासी + + + + पाा बंदोबस्त केला आहे + + वरूनहि उभयेता माने यासी बोलून सांगून बंदोबस्त करावेला आहे फौज ताफा

येणेचा पर्याय तरी शाह निवारण जाला म्हणजे ते क्षणी फौज तोफा देऊन रवानगी करितो ऐसे मुख्य माने याचे वचन आहे येसियासी काल सोमवारी प्रहर दिवसापासून दोन प्रहरपर्यंत मोठीच लडाई होऊन लडाई सिकस्त होऊन मुख्य पार होऊन गेले घोडे मनुष्य बहुतच सिकस्ताचे पावले मुखजबानी + + + करील असो आपल्या आज्ञेप्रमाणे प्रतिपदा + + द्वितीयेस लिहिले अन्वये सरंजामसुद्धा घेऊन येतो चिंता नाही परंतु या प्रसंगास आपण जमीयतसुधा आसावे यात योग्य आहे कैसेहि करून जमयत करावी अनमान नसावा सध्या हा योग घडला तेव्हा आपले मुख्यासी ते आपल्या समीप नेणेचा बेत करतील त्यापेक्षा आपण मुख्य स्थानास सूचना अगोदर पाठवावी जे कैसेहि जाले तरी चिताची खंबीरता करून त्या जाग्यास खाईम असावे नाही तरी आवघाच बेत विघडेल तो + + पक्केपणे रा + + घच जाले तरी उतम आ + कोणी महस्त आगत्य पाठवून यावा संधान असावा राजेश्री [मो. जा.] येथील मुख्याची भेटी आपले त्यासी पत्र आले तेव्हाच घ्यावयाची होती परंतु आम्ही ज्याजपासी आहोत त्याणी चार वेळ सांगितले जे इतकी लढाई होयेपर्यंत भेटी घेऊ नका आजी भेटीची परवानगी घेतली भेटी घेऊन बंदोबस्त करून येतो वरकड अर्थ मुखोद्गत निवेदन करीन सेवेसी श्रुत होय आम्ही येथून मोहरताने निघालो म्हणजे आगोदर देशमुखास पाठवून देऊ हे विज्ञापना मुख्य माने याचे पत्र आगोदरचे आहे ते पाठविले आहे पाहावे हाली उभयता मुख्यास खातरजमेची पत्रे दोन पाठवावी हे विज्ञापना

---

ले. ११.<br>रजब १ गुरु. } ७१<br>श्री { श. १७२४ कार्तिक शुद्ध २<br>इ. १८०२ ऑक्टोबर २८

पौा छ ६ रजब मंगळवार कार्तिक शुा ८

वडिलाचे सेवेसी चरणी मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना ताा छ १ रजब रोज गुरुवार दीड प्रहर जागून वर्तमान येथास्थित असे विशेष सदू गिरमकर याजबरोबर पत्रे पाठविली त्याप्रमाणे करावे हाली माने याचे पत्र आपणास आहे ते पाठवून यावे राजश्री नारायेणराव माने याचे कूच उद्यीक तूर्त कामगारीस बारामतीकडे खंडणीच्या वसुलापैकी बाकी राहिली त्याजकरिता करितात तेथे वसुलाकरिता पथके लोक ठेऊन आपल्याकडे येणार त्याची नेमणूकच करून घेतली पाच तोफा व हजार बाराशे फौज काही पायदळ याप्रमाणे आहे जडजूड काम लागल्या राजश्री रामचंद्रराव घोरपडे दोन हजार फौज फलटणाकडे कामगिरीस नेमली त्याणी कुमक करावी याजप्रमाणे जाले आहे उद्यीक प्रातःकाली कूच होऊन तूर्त बारामतीकडे जाऊ माने याचे पत्र घेतले ते मानयुक्त नाही म्हणोन त्या पत्राची नकल करून पाठविली दुसरे पत्र घेऊन पाठवून देऊ नारायेणराव माने प्रतिपदेसच निघणार होते परंतु त्याचे पतकातील

चोडी लोक जखमी आहे त्या गवगव्यामुळे दोन रोज लागले लिहिल्याप्रमाणे निघून जाऊ हे काम जाले याजमुळे येथील उतार आगदी मोडला कोणतीहि गोष्टी बेपर्वा आहे अस्तु आम्ही कार्यार्थी त्यापेक्षा रंगावर पडेल त्याप्रमाणे करावयाचे कार्यासी कारण पुणियाहून वडिलाची बातमी आली बाहीर परागंदा फौज घेऊन आहेत कांही फौज त्या देशात येणार आणि मुख्याची नेणेची घालमेल करणार कोणते काय असेल कळेना परंतु तमाम पश्चम उतर पूर्व घाटबंदी असावी हा बेत पकेपणे असावा सूचना लिहिली असे येथील मुख्यास जखमा चार आहेत हालक्या आहेत त्याचेहि पत्र घेऊन पाठवून देतो येथे येक पलटणच मागितले होते परंतु त्याच्या खर्चाचा बेत जाला पाहिजे याची वाट काय म्हणतात त्यासी याचा पर्याय काय तो आपण सत्वर कळवावा हा बेत जाल्यास पलटण सामानयुक्त आणावयासी येईल त्या मुख्याची भेटी घेतलीहि असती परंतु येथे ज्याजपाशी आहोत त्याचे म्हणणे येक दिवस भेटीस जा म्हणतात येक दिवस नका म्हणतात या आंदेशामुळे भेटी घेतली नाही आजो भेटीस जाऊ आमची खर्चाची तारांबळा येकादसीसी गाठ आहे उपाय नाही सेवेसी श्रुत होये सारांश जमयेत करावी आणि नगबंदी करावी हे विज्ञापना

---

ले. १२. ७२ { श. १७२४ कार्तिक शुद्ध ७
पौा सु. [१]२०३ रजब ५ भौम. श्री { इ. १८०२ नोव्हेंबर २

पौा छ ७ रजब सन सलास मयातैन मुा केडगांव

वडिलांचे सेवेसी चरणी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना ताा छ ५ रजब पावेतो भोमवार प्रातःकाळ जाणोन वर्तमान येथास्थित असे विशेष आपण गिरमकर व मोरु जामूद व राजेश्री लक्ष्मण हरी याजसमागमे पत्रे पाठविली ते पावली लिहिला मजकूर ध्यानांत आला सारांश फौज तोफासुद्धा अविलंबे यावे म्हणजे कार्यासिधी होती म्हणून आज्ञा येसियासी राजश्री नारायेणराव माने हजार दीड हजार फौज व तोफा पांच कांही पायदळ येणेप्रमाणे राजश्री माने यांचे विचारें घेऊन वाल्हेचे मोकामावर येत आलो उभयेता मुख्याची पत्रे आपणाकडे पाठविली आहेत घ्यावी माने याची शरीरप्रकृत आद्यापी ठीक नाही भ्रमिस्त कारभार जाला आता बोलावे येक घटिका भरा बोलावे येक स्मरणात गोष्टी राहत नाही अशाश्वती आणि उतार राहिला नाही अशी गोष्टी आहे असो या फौजेची रवानगी आपलेकडील कार्याबदल जाली परंतु पैसा मिळवावयाच्या प्रयत्नी लागले आहेत तनमप (?) वाई देशातहि फौज येईल परंतु फौज येताच कार्य जाल्यास उतम आपल्या कार्यास दिनावधी लागल्यास त्या देशात वस्ती राहणार नाही आपल्या संमही पैसा नाही जमयत होणार नाही राहाणार नाही याचा आंदेशा कशी ते पाहावी आम्ही वानवडीच्या मोकामास जाऊन राा होलकर याची भेटी घेतली येकांत जाऊन

बोलणेहि बहुताप्रकारे जाले बोलणेचा भाव इतका पडला जे आठ रोज दम धरावा जसमेचे पाणी घेतले म्हणजे तुमचे समागमे सरंजाम देऊन तिकडे रवानगी करून देतो माजे लक्ष सर्वस्वे त्या पायापासी आहे येसे आहे परंतु त्यातील क्षोक रायेगडाकडे आणावयासी गेले आहेत ते यावयाचे आहेत ते न आले तरी आकारपूर्वकास आणावयासी गेले आहेत त्या बेतास आणणार आम्ही बोललो जे उभयतातुन कोणी आल्यास आमचे कार्याची तऱ्हा काय त्याणी उत्तर केले जे ते जरी आले तरी आपले कार्य सरंजाम देऊन रवानगी करून कार्य करू याप्रमाणे आहे येसियासी आपणास काय करावयाचे सुचित यापेक्षा दिवसगत येकंदर न करिता सत्वर जाले पाहिजे पुढे कसे घडेल काही कलेना आगोदर तो प्रयत्न करावा उतर सत्वर पाठवून यावे उदयीक देशमूख याची रवानगीहि करुन देतो राजश्री लक्ष्मण हरी आपली पत्रे घेऊन वानवडीस काल सोमवारी गिरिमकर समागमे घेऊन गेले तेही पत्रे घेऊन आजी उद्या येतील आम्हास वानवडीस चला म्हणाले परंतु आम्ही उभयताचा निरोप घेतला म्हणून गेलो नाही कळावे उगेच जावे तरी फतेसिंगराव माने याणी नारायणराव माने यासमागमे आम्हास दिल्हे तेन्हा न गेल्यास त्याचे चितास विकृत काय येईल कळेना म्हणून वानवडीस गेलो नाही सारांश आपली कार्यसिधी आधी सत्वर करावी नारायेणराव माने यासी कुमक लागल्यास घोरपडे दोन हजार फौजेनिशी आहेत कुमक राहील त्याच्या लोकाना ... मालचा (?) बोरघाट ... आजी जवळ ... खूप व्हावयाजोगे पत्रे पाठवून यावे प्रसंगी नारूकाका बजाबाचे भाऊ येथेच आहेत त्यासी पत्र पाठवावे जे तुम्ही ... त्यापेक्षा नारायणराव माने यासी समजावून आमची कार्यसिधी होय ते करावे हे विज्ञापना

---

| | | | |
|---|---|---|---|
| ले. १३. | } | ७३ | { श. १७२४ कार्तिक शुद्ध ११ |
| रजब ९ मंद. | } | श्री | { इ. १८०२ नोव्हेंबर ६ |

वडिलांचे सेवेसी चरणी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना ता। छ ९ रजब मंदवार प्रातःकाल जाणून वर्तमान येथास्थित आहे विशेष आपणाकडे देशमूख आले ते सर्व निवेदन करितील तिकडील कांही फौज सालप्याचे घाटाने वर्ती गेली म्हणोन येकिले फौज तिकडे यावयाची येविसी सूचना पेशजी आपणास दोन चार पत्री लिहिली होती तिकडे फौज गेली येविसी राजश्री नारायणराव याणी शब्द ठेविला जे तेथे आपण असता घाटाचा बंदोबस्त [ होत नाही ] अपूर्व आहे आम्ही येथे कितेक प्रकारे याजपासी याचे मुख्यापासी सांगत आलो जे घाटाची चिंता नाही घाट बंद आहेत असो तिकडे फौज आली असलिया कोणत्या मार्गे घाटाने काढून घेऊन जातील कळेना त्यापेक्षा रामोशी याशी बोलून तमाम पाराशरपर्यंत बंदी व्हावी यामार्गे येऊ पावणार नाहीत असो आपल्या विचारास आला तरी हा बंदोबस्त चांगला करावा ककाराचे पकारास इकडील उभयेता मुख्याची पत्रे पाहिजे तरी पाराशेरापर्यंत आणा-

वयासी येतील आणि तिकडील वाटेचा बंदोबस्त करावा पत्रास चार रोज लागतील त्यापेक्षा त्याचे नांवे आपण पत्र लिहिले तरी चिंता नाही निकडीमुळे लिहिले म्हणावयासी येईल फकाराचे मात्र लिहिणे जाले तरी त्याहावे या वितरिक्ति बंदोबस्त होत असल्यास करावा याप्रमाणें पत्रें कोणी तरी जाऊन आणावयासी येतील आणखी येक वर्तमान नारायेणराव याणी कानांत सांगितले जे नकार काकास नगावरील विप्राचे पत्र आले जे आमचा माहात्म्य आमचेकडे असू द्यावा म्हणजे वेव्हार आपल्याकडे घ्यावा याप्रमाणे आहे माघे ठिकाणेस कोणी तरी असावा बाजीपंत हे तरी कांही परिछिन्न जात नाहीं राजश्री रावजीस पाठविले तरी त्याचे वस्त्रावीण आणि त्याचा सोईर (?) याजमुळे संकोच होतात येरवी कोणत्या कार्यास नाही म्हणावयाचे नाहीत तापत्रयांत आहेत तेथून राजश्री वकार उभयेता व आकार आथवा दुसरे कोणी तरी येकास पाठवून द्यावयाचे करावे आकार पुर्वकास आणावयासी पाठविले परंतु येणार न येणार आदेशा आहे आलीकडील मुख्याचा उतार मोडला परंतु नेहमी सूचनेस असता आपलेविशी अंतःकरणापासून आहेत असो इतका पर्याय आम्हास त्याहावयासी कारण नाही देशमूखच निवेदन करतील त्या प्रमाणेच केले पाहिजे नारायणराव याणी कानांत जे सांगितले खरे खोटे त्याचे त्यासी ठाऊक असेल सांगितले तितके लिहिले सालपेने फौज गेली ही पळाची किंवा कामाची गेली हे समजत नाही परंतु नारायणराव यानी शब्द + + + लावला जे घाटाची परवानगी तुमची आणावी पत्राचे उत्तर रातोरात पा + + व रावजीस माघारे पाठविले असते परंतु आमचे जवळ कोणी नाही असो हे येऊन पोहचले असते परंतु तोफाचा सरंजाम जेजोरीस होतो याजकरिता दोन दिवस अधीक लागले कळावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

| | | |
|---|---|---|
| ले. १४. कार्तिक शुद्ध १३ रवि. | ७४ श्री | श. १७२४ कार्तिक शुद्ध १३ इ. १८०२ नोव्हेंबर ७ |

पै।। छ १३ रजब कार्तिक मास

विनंति उपरी ता। कार्तिक शुद्ध १३ रविवार २ प्रहर पावेतो मुकाम वानवडी यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावे विशेष आपण आणाजी जासूद याजबरोबर छ।। ३ रजब शनिवारची पत्रे पाठविली ती छ ९ शुक्रवारी सातवे रोजीं पावली राजश्री जगदेवराव याजसमागमे राजश्री नारायणराव माने सरंजामसुधा गेलेच आहेत येथील वर्तमान तरी आम्ही येथे आलो गेल्या मंगळवारी रात्री साहेबांची भेट जाली भेटी होताच संकेताप्रमाणे बोलणे जाले व हुजूरची फौज येक पथक मजसमागमे द्यावे या अन्वये ... बैठकेस ठरवून पथकास तेव्हाच ताकीद जाली दुसरे दिवशी प्रातःकाळी पत्रे

यादीप्रमाणे आपल्या मतलबाचे उपयोगी मसुदे करून पाहिजेत तशी तयार करून शिके करून घेतली नंतर त्यातील काही गुणगुण फडणीताकडून श्रीमंत राजश्री आमृतराव साहेबाकडील कारकून यास कळली त्याने साशापासी बोलून पाहिले तेथे कांही त्याचा यत्न चालला नाही नंतर फडणीसासी बोलिला फडणीसानी मजपासी पत्र मागून घेतली म्हणाले की तुम्हाबरोबर पथक द्यावयाचे त्या पथकाची तुमची परस्परे गाठ साशा समक्ष घालून निरोप द्यावयाचा त्या समयी पत्रे देऊ असे बोलून पत्रे घेऊन ठेविली ती अजून हातास येत नाही गणपतराव येथे नाहीत माधवराव आले आहेत पुणियास आहेत त्याचे वस्तु रेटत नाही फडणीसाचे आर्जव पाहिजे तितके केले परंतु आमचे आर्जव शुष्क पडते तेव्हा रंग पडत नाही हाली परहस्ते बोलून फडणीसानी आमचे कार्यास येकंदर हिस्के घेऊ नयेत म्हणोन हजार रुपये कबूल केले आहेत त्यास २॥ शे रुपये चांद्वड द्यावे आणि कागद् व पथक स्वाधीन व्हावे नंतर पथक तुम्हापासी पोंचताच बाकी हजारांचे भरतीचा ऐवज द्यावा याप्रमाणे करार करून पत्र लिहिले आहे तरी कसेही करून २५० रुपये पत्र पावताच पाठवावे वाटेस दंगा आहे यास दोन स्वार याजपासी रोख देऊन पाठवावे माने व यशवंतराव यांचे लक्ष करावयाचे त्यास यशवंतरायाकरवी माने यास बलावून आणून समक्ष सांगितले की तुम्हाकडील तोफखाना व सरंजामसुधा तुम्ही महाराजाकडे सेवेसी जावे त्याजवरून माने याणी उत्तर केले तुर्त मजला समाधान नाही काही सरंजाम रवाना केला आणि दोन चार दिवसांत मीच जातो याप्रमाणे केले याहून ऐक्यतेची बाकी राहिलीशी वाटत नाही सारांश येथील कारकून [ येथून पुरवणी बंद २ चा मजकूर सुरू* ] याची वृसता जालियावाचून कोणताहि जाबसाल सुप्रवर्त उलगडत नाही चोपदार भालदार वगैरे चौकीदार यांचे हिस्के येकंदर निरोप किंवा चिठी पाठविली असता पोहोचत नाही कदाचित प्रयत्न करून येखादे वेळेस साशाची गाठ सर्वत्रास गाळून घातली तर सारे कारखानीस रात्रंदिवस जवळ असतात त्याचे बोलणे की श्रीमंतासी सख्य करणे आणि सातारियाचे उर्जित कल्पणे कसे ठीक पडेल त्यास याची तोंडे धरल्यावाचून परिणाम नाही आपण म्हणतील की माने याचे लक्ष पके आहे व यशवंतराव यांनीहि सांगितले आता यशवंतराव यांचे मंडळचे किंवा साशांचे तरी आर्जव पाहिजे कशास तरी चाकरमाने याचे वस्तु परिणाम लागेलसा वाटत नाही तत्रापि आपली मर्जी असेल तसे करील मजला काही खर्चास युक्तीस आल्यास पाठवावे किंवा माघारे येणे म्हणून तरी लिहावे परकी स्थळी हालविपत्ती सोसवीत नाही आपले ध्यानांत येत नाही म्हणोन शब्द लावावा तरी आमचे दैव सानुकूल नाही तेव्हा दुसरेयास लिहून फळ नाही उत्तर जरूर पाठवावे पेशजी पत्रे रवाना जाल्यापासून सातवे रोजी पोचली असे नसावे आपण यजमानाचे पत्र माझे नांवे पाठविले त्यास याप्रमाणे पत्र लिहावयाचा सांप्रदाय नाही नागपूरवाले भोसले यांची पत्रे माझे नांवे व पंतप्रतिनिधी यांचीहि दाखवीन कदाचित अवघड वाटले तरी आपण आपली नांवे लिहितात इतकेच पुरे यजमानाचे पत्रांचे कारण नाही कळले पाहिजे आमृतराव साहेब

आज आले भांबवड्यावर मुकाम आहे आज भेटी तृतीय प्रहरी होणार पुण्यातील बाजीराव साहेबाचे कारकिर्दीतील सारे बंदिवान यांची मुक्तता करावी म्हणोन ताकीद जाली शहरात जे कोणी होते त्यांची मुक्तता जाली मोरोबादादा व बाबा फडणीस किल्ल्यावर होते तो किल्लेदार होळकरास सापडला त्याजमुळे उभयता सुटून पुण्यांयास काल आले त्यांचीहि भेटी आज होणार पुढे काय घडेल ते खरे बहुत कार्य लिहिणे राजेश्री बाबा फडणीस यास पत्र पाठविले. आहे हे त्याजकडे पाठऊन उत्तर घेऊन पाठवावे हे विनंति

---

| लें. १५. | ७५ | श. १७२४ कार्तिक शुद्ध १३ |
|---|---|---|
| कार्तिक शुद्ध १३ रवि. | श्री | इ. १८०२ नोव्हेंबर ७ |

येथील कुशल ता कार्तिक शुद्ध १३ रविवार दोन प्रहर पावेतो यथास्थित असे विशेष इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री छत्रसिंग राजे बाबा याचे कार्यासाटी येथे आलो श्रीमंत राजेश्री येशवंतराव यांची भेट जाली भेटी होताच त्यानी विचारले की रास्ते यांचे पत्राचे व मिरजकरांचे पत्राचे उत्तर आले नाही हे काय त्याजवरून मी बोलिलो की आपण पेशजी पत्र दिल्हे व समक्ष आज्ञा केली उपरांत राजेश्री कृष्णाजी-पंत बापू आले त्याजलाहि आज्ञा केली त्यास बापू .... यजमानाकडे गेले आहेत व आपण पत्रे दिल्ही ती व राजेश्री बाबा फडणीस याणी पत्रे देऊन यजमानाकडे पाठविली तेथून आपणास सांगितल्याप्रमाणे येखादा घाट घडून यावा त्यास तेथे गोखले याचे लढाईचा प्रसंग पडून लढाई सिकस्त केली गोखले पडले ऐसेहि वर्तमान आहे परंतु लेख आला नाही आपलेहि सांगणे की गोखल्यास मारून परत करावा त्याजवरून यजमानांनी निकड करून आपले मनोद्यानुरूपच केले त्या शहास गुंतले याजमुळे उत्तर काही आले नाही या उपर सत्वरच काय तो निश्चय होऊन येईल याप्रमाणे लपेटीखाली बोलिलो आपणास कळावे गोखल्याची लढाई तुमचे सांगिल्यामुळे मोडली असे बोलिल्यावरून संतोष पावले यजमानास सत्वर आणवावे आता यावयास चिंता काय याप्रमाणे बोलिले ते लिहिले असे माधवराव तात्या भाषणसमयी जवळ नव्हते कामगिरीस गेले होते ते तिकडेच आहेत मी मुद्दाम माधवरायाकडे गेलो ते समयी त्याणी आपणास पत्र दिल्हे ते पाठविले आहे घनगडावर फडके व मोरोबादादा होते त्यास किलेदार होळकरास सापडला याजवरून उभयता सुटले काल प्रातःकाळी भांबवड्यानजीक वाकडे याचे बागात येऊन राहिले आहेत श्रीमंत राजेश्री आमृतरावसाहेब याचा मुकाम आजचा भांबवड्याचा आज सर्वत्रांच्या होलकरांच्या भेटी होणार त्याजकरिता स्वारी होळकराची वानवडीहून पुणियात आली बाजीरायाचे कारकिर्दीतील मंडळ बंदिवान सर्वत्र सोडावेसे ठरो शहरातील सर्वांची मुक्तता काल जाली वैजनाथभटमामा व आंतोबा खूल व

चिंतोपंत देशमुख व काळे आद्या यांची शोभा जाली ती पत्री लिहावयास प्रशस्त नव्हे अनिर्वाच्य पारिपत्ये केली पुण्यात घरपट्टीचा उपक्रम होता तो माफ केला याप्रमाणे वर्तमान आहे कुंजीर आदि नवे बाजीरायचे मंडळ यातील चार रुपयांचा चाकरसुधा पारपत्य करतात जाले वर्तमान लिहिले असे वहूत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

---

ले. १६. } ७६ { श. १७२४ कार्तिक शुद्ध १४
सु. १२०३ रजब ११ } श्री { इ. १८०२ नोव्हेंबर ८

पैा छ १८ रज्जब सुरू सलास मयातेन व अलक मुकाम पाटखल...

राजश्री चतरसिंग राजे भोसले गोसावी

अ. ल. अ. रा. [ मो. जा.* ] स्ने. फत्तेसिंगराव माने रामराम वि. उ. ये. कु. जा. स्व. कु. लि. जा. वि. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि याजकडील प्रगण्यास वगैरे तुम्हाकडून हरयेकविशी उपसर्ग तिलप्राय न लावणे पुन्हा पत्राचा आक्षेप न करावा रवाना छ ११ माहे रजब व का. लि. हे विनंति

[ खंडेराव होळकराचा शिक्का* ] मोर्तब सूद

---

ले. १७. सु. [१]२०३ } ७७ { श. १७२४ कार्तिक शुद्ध १५
श. १७२४ कार्तिक शुद्ध १५ } श्री { इ. १८०२ नोव्हेंबर ९

पैा छ १५ रजब सन सलास मयातेन कार्तिक शके १७२४ मुा आइती प्रहर दिवस

विनंति उपरी तागाईत कार्तिक शुा १५ प्रातःकालपावेतो मुा वानवडी येथास्तित असे विशेष आण्णाजी समागमे पत्रे व याद पाठविली ती पावली पत्रे काल सोमवारी प्रहर दिवसास पावली तेंव्हाच खाशास दाखविली उदयीक जाबसाल होईल म्हणोन सांगितले ते लिहिले असे दुसरे वर्तमान रविवार तृतीय प्रहरी अमृतराव साहेब याची व होलकराची भेटी जाली काल फिरोन होलकरांची स्वारी त्याजकडे गेली होती भेटीचे दिवशी होलकर आधी शहरात जाऊन सरकारवाडियात जाऊन गादीस मुजरा करून नंतर भांबवड्यास अमृतराव साहेबास जाऊन भेटले हा काळपर्यंत ..... पेशजी आपणाकडे पत्रे रवाना केलियावर येक वेळा मोठ्या श्रमाने गाठ घातली भाषण जाले त्यासमयी बोलिले की आधी आमृतरायांचा तह मिटत नाही तत्रापि जाल्यास श्रीमंत माहाराज छत्रपतीकडे पांचपन्नास लक्षांचा मुलूख नेमून बंदोबस्त करून घेऊ तेव्हा तह करू कदाचित तह जाला नाही तरी आणिले आहेत यांस नजरबंद करून महाराज धणी आहेत याप्रमाणे बोलले सारांश फडणीस मंडळ दरोबस्त आपले वाईटावर व

भीड जबरदस्त याजमुळे उपाय करिता प्रतिबंद होतो याचा बंदोबस्त जालियाविना हिस्केबंद होत नाहीत माने याची पत्रे पाठवावी म्हणोन ... लिहिले त्यांची उत्तरे आलाहिदा कलमबंदी लिहिली आहे पाहून उत्तर सत्वर पाठवावे व चैवजाची कांही तरतुद होऊन यावी पंतप्रधाना ... तह होणेच कठीण तत्रापि जाला तर महाराजांनी स्वतंत्र वागावे पाच पन्नास लक्षाचा मुलूख घावा या प्रमाणे बंदोबस्त करून देऊ म्हणोन खातर जमेने गणपतराव नारायण व रांझेकर व येशवंतरायाचे चुलते आनंदराव होलकर हे त्रिवर्ग खातरजमेने बोलत आहेत घडेल ते पाहावे बहूत काय लिहिणे पेशजी रामो ( ? ) याचे कारभारी यांस पत्र पाठविले आहे त्याचे उत्तर घेऊन पाठवावे जरूर कार्य असे ही विनंति

[ या पत्रासोबत यादी जोडली आहे तिच्यांतील मजकूर ]

यादी

आपण यादी पाठविली त्या प्रमाणे पत्रे घ्यावी. त्यास पेशजी पत्रे लिहून तयार जाली आहेत बितपशील

१ रास्ते
१ चत्रसिंग बाबा
२ प्रतिनिधी रवकले ( ? )
१ बळवंतराव निसबत प्रतिनिधी
१ रास्ते
१ पटवर्धन चिंतामणराव आप्पा
२ उभयता छत्रपति.

याप्रमाणे पत्रे घेतली आहेत सातारकर स्वामीस ... आज्ञेवरून शेवेसी सरंजाम तोफखानासुद्धा पाठविला आहे इतका मजकूर आहे इतरास की येथून सरंजाम तोफखानासुद्धा सातान्यास रवाना केला आहे तुम्ही सरंजामसुद्धा जाऊन तेथील आज्ञेप्रमाणे शेवा करावी या प्रमाणे आहेत परंतु ती पत्रे आजून हातास येत नाही कारण पेशजी लिहिलेच आहे कलम १

प्रतिनिधीचा कारकून कोणी येथे

सोनोबाजी यास व माने यास पत्र पाठवावे त्यास सोनोबाजी नाऊकाका शिरवळकर याज पासून गेले आहेत इकडे विठ्ठलगिरी किमपी रांझेकर यासुद्धा नाही त्यास ताकीद करणे तेव्हा मान्यास ताकीद व्हावी त्यास येशवंतरायांची ताकीद मान्यास करणे तेव्हा कसे पडेल समजत नाही कलम १

माने याजकडे जाऊन पत्रे पाहावी म्हणोन लिहिले त्यास मान्याचे लष्कर दोन कोसावर आहे रोज पाई येरजारा घालणे घडत नाही येक दोन दिवस त्या लष्करात राहावे तर भोजनाची वगैरे सोय नाही पहिले माने ते नव्हत आलिकडे खोली किती आहे ती सविस्तर राजेश्री जगदेवराव बाजींनी सांगितलीच असेल कलम १

माणिकचंदाबरोबर पत्रे पाठविली म्हणून लिहिले ती पत्रे व तो मजकडे आला नाही कलम १

खाशाचे सांगणे की तुम्ही येथे

आला नाही व पत्रेहि पोचली नाहीत कलम १

होईल वर्तमान ते प्रसंगोपात्त लिहावयास दोन जासूद नेहमी असावे त्यास युर्कास आलीयास खर्चाचा त्यांचा बंदोबस्त करून पाठवावे कलम १

+ +ण सातारा नजीक राहावे ते घाटतोंडी का आले त्यांणी निकड पोचविली की काय म्हणोन खासे पुसत होते म्हणोन लिहिले असे कलम १

वरकड वर्तमान सदाशिव तोंड जबानी सांगेल कळले पाहिजे कलम १

आसावे त्यास आपले मर्जिस आल्यास येथे राहाण्याचा बंदोबस्त बितपशील एक ब्राह्मण दोन माणसे एक मशालची १ घोडे इतक्यांचे खर्चाचा बंदोबस्त होऊन आलीयास राहावयास येईल नाहीतर पत्राचे उत्तर आले म्हणजे निघोन येईन कलम १

याद पाहून उत्तर कलम बंदीवर यावे हे विनंती

---

| | | |
|---|---|---|
| ले. १८. रजब २१ नंतर | ७८ श्री | श. १७२४ कार्तिक वद्य ९. इ. १८०२ नोव्हेंबर १८ |

यादी स्मरणार्थ होलकराकडील पत्रे

७ पहिली छ ५ रजबाची बीतपसील

१ श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति यांस

२ पंत प्रतिनिधी

१ रास्ते

१ रामचंद्रराव पटवर्धन व चिंतामणराव येकूण पत्रे पैकी परभारे चिंतामणराव याचे पाठविले १ बाकी

१ चत्रसिंग राजे

१ करवीरकर छत्रपति स्वामीस

७

३ नवी छ २१ रजबची

१ छत्रपति स्वामीस

१ चत्रसिंग बाबा

१ चिंतामणराव मिरजकराचे पेशजीचे, पत्र आम्हाकडून आहे ते परभारे गेले सबब नवे लिहिले असे

३ एकूण पत्रे १०

ले. १९.
सु. १२०३ रजब २४

७२
श्री

श. १७२४ कार्तिक वद्य ११
इ. १८०२ नोव्हेंबर २१

आज्ञापत्र राजश्री चत्रसिंग राजे भोसले ता मोकदमानी देहाय प्रांत कराड बीतपसील

| | |
|---|---|
| २०० | मौजे वडोली निलेश्वर |
| १०० | मौजे तासवडे |
| ३०० | मौजे इंदोली |
| १०० | मौजे कोणेगांव |
| २०० | मौजे भिकार वडोली |
| २०० | मौजे आर्तात |
| २०० | मौजे हिंगणाले |
| २०० | मौजे सासपडे |
| ५०० | मौजे हेलगांव |
| १०० | मौजे मरली |
| १०० | मौजे वराडे |
| १०० | मौजे खराडे |
| २०० | मौजे कोपर्डे |
| २०० | मौजे परले |
| १०० | मौजे खोडद |
| १००, | मौजे वर्णे |
| ३०० | मौजे किरोली |
| ३७०० | |

देहे सतरा सुरू सलास मयातेन व अलफ राजश्री पंतसचीव याजकडून हुजरातचे पीलखान्याचा यैवज येणे त्यापैकी त्याणी राजश्री पंत प्रतिनिधी याजकडून सावोन्याचे यैवजी यैवज देविला आसता ते देत नाही सबब देहाय मजकुराकडे जिल्हेचा यैवज येणे त्यापैकी पीलखान्याचे खर्चास रुपये ३ हजार ७०० देविले असेत तरी देखत आज्ञापत्र सदरहू रुपयेचा वसूल देणे येविसी फिरून बोभाट येऊ न देणे जाणिजे छ २४ रजब परवानगी हुजूर

| | | |
|---|---|---|
| ले. २०.<br>सु. १२०३ रजब २७ | ८०<br>श्री | श. १७२४ कार्तिक वद्य १४<br>इ. १८०२ नोव्हेंबर २४ |

श्री राजा शाहू छत्रपती चरणकमल लनि चतुरसिंह राजे भोसले अविरत
[ अशी गोल मुद्रा* ]

आज्ञापत्र राजश्री चतरसिंग राजे भोसले ताा मोकदमानी मौजे येरड ता. पाटण सुरू सलास मयातेन व अलफ मौजे मजकूर येथील जिल्हेसेरीज साल मजकूरचा ऐवज फौजेचे खर्चास आणविला असे तर सदरहूचे ठरावास पाा कुलकर्णी लष्करचे मुक्कामी येणे या कामास लोक पाठविले यास मसाला रु. ५० आदा करणे जाणिजे छ २७ रजब पाा हुजूर [ म* ] लेखन । सीमा

बार.

---

| | | |
|---|---|---|
| ले. २१.<br>सु. १२०३ शाबान ५ | ८१<br>श्री | श. १७२४ मार्गशीर्ष शुद्ध ७<br>इ. १८०२ डिसेंबर १ |

पौा छ १३ साबान सन सलास मयातेन व अलफ

राजेश्री चतुरसिंगराव भोसले बाबा गोसावी यासी स. गु. क. अ. ल अ रा. स्नेहांकित प्रीतिराव चव्हाण उमदेतुल उमराव बहाद्दर रामराम विनंति उपरि ये. कु. जा. स्व. ले. क. अ. पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले व राजेश्री नरसिंगराव जगन्नाथ पाठविले त्याणी हुजूर विनंति केल्यावर सर्व कळो आले राजेश्री यशवंतराव होळकर याणी हुजूर विनंति पत्र पाठवणेंच राजश्री नारायणराव माने याजकडे पाठविलेत आपण पाठविल त्यावरून सर्व अर्थ हुजूरचे सेवेसी निवेदन जाहल हुजुरून राजश्री मालोजीबाबा निकम व गोविंद सखदेव याची रवानगी जाहली आहे सर्व अर्थ आपणास समजोन देतील त्यावरून कलो येईल की(ताबाचा ?) ताहाचा मजकूर लिहिला त्यास हुजूर विनंति करून मागाहून लिहून पाठवू स्वामीच्या मनोदयानुरूप काजकाम होवे ते करून फुरेस पात्र व्हावे रवाना+ छ ५ माहे शाबान बहूत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंति

---

| | | |
|---|---|---|
| ले. २२. मार्गशीर्ष<br>सु. १२०३ शाबान ५ | ८२<br>श्री | श. १७२४ मार्गशीर्ष शुद्ध ७<br>इ. १८०२ डिसेंबर १ |

चिरंजीव राजमान्य राजश्री चतरसिंगराव भोसले यासी आज्ञा केली येसीजे स्वामीचे सेवेसी तुम्ही विनंति पत्र पाठविले व राजश्री येशवंतराव होळकर याजकडील आलेले पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदनात आले व तुम्हाकडील राजश्री नरसिंगराव जगन्नाथ याणी विनंति केलेवरून सविस्तरार्थ विदित

जाहाले येसीयांसी येविसीची आज्ञा करून हुजूरने राजश्री मालजी निकम व गोविंद सखदेव यांसी होलकर मशारनिले व राजश्री फत्तेसिंगराव माने यांजकडे पाठविले आहेत मशारनिले व नरसिंगराव जगन्नाथ तुम्हाशी बोलतील त्यावरून सविस्तर कलो येईल येविसीचे विनंतिपत्र सत्वर पाठवावे उमयेताबरोबर तुम्हाकडील जासूदजोडी देऊन पुढे रवानगी करून यावी सदरहु स्वार व लोक पायेचे देऊन मार्गाने सुरक्षित जाऊन पोहचे येसे पाठवून द्यावे जाणिजे सुा सलास मयातेन व अलफ रवाना छ ५ माहे शाबान बहुत काय लिहिणे [ म* ] विलस । ति लेख । नावधी ।

बार

पैा छ १३ साबान सन सलास मयातेन मार्गसीर्श मु. पाल ता. सातारा

---

ले. २३.
सु. १२०३ शाबान ५

८३
श्री मार्तंड प्रसन्न

श. १७२४ मार्गशीर्ष शुद्ध ७
इ. १८०२ डिसेंबर १

पैा छ १३ साबान सन सलास मयातेन व अलफ मार्गशीर्ष मु० पाल ता. सातारा

राजश्री चतुरसिंगराव भोसले बाबा गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित हैबतराव गाइकवाड विश्वासराव रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावे विशेष बहुत दिवस आपणाकडून पत्रे येऊन वर्तमान कळत नव्हते हल्ली नारसिंगराव जगन्नाथ पागे हुजूर आले त्याजबराबर पत्र आले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ सर्व कळला याच प्रकारे निरंतर पत्र पाठवून संतोषवीत असावे हुजुरून जी आज्ञा होणे ती होऊन मशारनिल्हेस आपणाकडे पाठविले आहेत त्या अन्वये स्वामी सेवेचे लक्ष धरून धणीयाची मर्जी संतोष होये तो अर्थ करावा आपणास येथून जातेसमयी जे सांगणे ते सांगितलेच होते राज्याचे कल्याण होऊन धणीयाचे रुपेस पात्र होणे हा अर्थ करावा येविसी आपणास विशेष ल्याहावयचे नाही हा जागा सर्वस्वे आपला आहे सिंदेकडील फौजेचे व राजश्री यशवंतराव होळकर याचे फौजेचे व राजेश्री बाजीराव पंडित प्रधान याचे सविस्तर वृत्त लेहून कळवावे रवाना छ ५ माहे शाबान बहुत काय लिहिणे लोभ कीजे ही विनंति

---

ले. २४.
मार्गशीर्ष वद्य ४ रवि.

८४
श्री

श. १७२४ मार्गशीर्ष वद्य ४
इ. १८०२ डिसेंबर १२

शेवेसी विज्ञापना ताा मार्गसीर्ष वाा ४ रविवार प्रातःकाळ पावेतो वर्तमान यथास्थित आहे विशेष परवा शुक्रवारी प्रातःकाळींच राजश्री फत्तेसिंगराव माने आपणाकडे कूच करून गेले व च्यार घटका दिवसास होलकर वानवडीहून निघोन

पुण्यात रालगे (?) यांचे वाडियांत येऊन राहिले त्या दिवसी होलकरांची गाठ पडली परंतु विशेष बोलणे जाले नाही काल शनवारी प्रातःकाळी निवळ गांठ पडली बोलणे जाले त्यातील आशय की ज्या अर्थी आम्ही होलकर सातारप्रकरणीं मसलतीत आहो त्यापक्षीं इतःपर प्रतिबंध राहणार नाहीं खातरजमा आणि शफतेनिसी करून पत्रें हुजूर मामल्याचे मजकुराचे कराडकरास व रा। राघो शंकर व खासगत पत्रांचा जाचता प्रा। दि ... म्हा उभयतास निरोप जाला आहे स ... शेवेसी येऊन पोचतो तों आपला उत्क ... नसावा ह्या कृतसंकेत श्रीमंत सहकुटुंब सह परिवार याचे मनांत आहेच त्याचे मंडळचे वर्तमान आहे कीं चत्रसिंग राजे याचा उपमर्द माने चार्णी वारावा यामो होलकरांचा करार अमृतरायांसी आहे होलकर याणी तर प्रत्यक्ष शफतच केली की स्वामिसेवा मनोद्‌यानुरूप करावयाची स्वामींनी स्वसत्तेने वर्तावे ऐसे आहे ऐकिले वर्तमान लिहिले असे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

---

ले. २५. श. १७२४ मार्गसीर्ष } ८५ { श. १७२४ मार्गशीर्ष वद्य ६
सु. १२०३ साबान १९ } श्री गणराज { इ. १८०२ डिसेंबर १५

पै।। छ २४ साबान सन सलास मयातैन अलफ मार्गसीर्ष मु।। कोडोली नजिक सातारा शके १७२४

राजश्री चत्रसिंग भोसले राजे गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [ मोजा* ] स्ने।। विठ्ठलराव पांडुरंग आशीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तीर्थस्वरूप राजश्री चिंतामणराव आप्पा यांचे पत्र आपले नांवे आले ते पाठविले आहे उत्तर पाठवावे वरचेवर पत्र येत जावे रवाना छ १९ साबान बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

---

ले. २६. श. १७२४ मार्गशीर्ष } ८६ { श. १७२४ मार्गशीर्ष वद्य ६
सु. १२०३ साबान १९ } श्री गणपतिर्जयति { इ. १८०२ डिसेंबर १५

छ २४ साबान सन सलास मयातैन व अलफ मार्गशीर्ष मु. कोडोली नजिक सातारा शके १७२४

राजश्री चत्रसिंग भोसले राजे गोसावी यांसी

स. गु. अ. ल. आ. रा. [ मो. जा.* ] स्ने. चिंतामणराव पांडुरंग आशीर्वाद विनंति उपरि ये. कु. जा. स्व. कु. लि. जा. वि. आपणाकडून आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाही तर सविस्त[र*] लिहावे सातार्‍याचे रोसे घेण्याविसी सरकारची आज्ञा आल्यावरून चि. राजश्री विठ्ठलराव बापु याजबरोबर फौज देऊन रवानगी

केली आहे न्यूनाधिक कळेल ते वरचेवर चिरंजीवाकडे लिहून कळवीत जावे रवाना छ १९ साबान ब. का. लि. हे वि.

[पत्रावर*] श्री गणपतिर्जयति श्रीपंतप्रधान चरणी तत्पर पांडुरंगरायस्य सुत चिंतामणराव निरंतर [असा वाटोळा शिक्का व*] मोर्तब ! सुद [चा शिक्का*]

---

ले. २७. रमजान १६ } ८७ ॥ श्री ॥ { श. १७२४ पौष वद्य ३ इ. १८०३ जानेवारी ११

राजश्री चत्रसिंग राजे गोसावी यांसी रामराम विनंति उपरी तुम्ही चिठ्ठी पाठविला ती पावली त्यावरून येथून कारकून व हुजरे पाठविले आहे तुम्ही याचे अणुमते विचार करावा रवाना छ १६ माहे रमजान बहुत काय लिहिणे हे विनंति

---

ले. २८. पौष पै. सु. [१]२०३ रमजान २२ } ८८ श्री { श.१७२४ पौष वद्य ९ इ. १८०३ जानेवारी १७

पौा छ २२ रमजान सन सलास मयातेन पौष मुकाम सातारा

राजश्री राजे छत्रसिंगबाबा गोसावी यांसी

